25-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

NTK 10:00

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.**: राज्यातील विविध गुन्ह्यांमध्ये झालेली लक्षणीय वाढ

**मु.शी.**: राज्यातील विविध गुन्ह्यांमध्ये झालेली लक्षणीय वाढ या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स.नियम 260 अन्वये माझा प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्रामध्ये मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर इत्यादी शहरात सोनसाखळी चोऱ्या, अपहरण, चोऱ्या, खून, दंगली, इत्यादींच्या प्रमाणात झालेली लक्षणीय वाढ, मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मास्टर माईंड हाफिज सईद याचे चिथावणीखोर व धार्मिक भावना भडकाविणाऱ्या भाषणाचे ध्वनिमुद्रण आणि दृकश्राव्य फितीचा मोबाईलद्वारे धुळे येथे मोठ्या प्रमाणात प्रसार करण्यात आल्याने दिनांक 6 जानेवारी, 2013 रोजी धुळे येथील मछली बाजार येथे दंगल उसळणे, या दंगलीत दंगेखोरांकडे तीक्ष्ण धारदार शस्त्रास्त्रे व विशिष्ट प्रकारचे ॲसिड सापडणे, आंध्र प्रदेश राज्यातील एम.आय.एम. या पक्षाचे लोकप्रतिनिधी अकबरुद्दीन ओवेसी यांनी नांदेड येथे केलेल्या प्रक्षोभक भाषणाप्रकरणी संबंधीत पोलीस स्थानकामार्फत अद्यापी कोणतीही कारवाई केलेली नसणे, एकूण गुन्हेगारीत वाढ झालेली असताना पोलिसांच्या व विधी व न्याय खात्याच्या संशयास्पद भूमिकेमुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण गतवर्षी केवळ 9 टक्के असताना या वर्षी ते 9 टक्क्याच्याही खाली आलेले असणे, शिक्षा झालेले अनेक आरोपी पॅरोलच्या नियमांचे उल्लंघन करून फरार होवून गंभीर गुन्हे करीत असल्याचे निदर्शनास येणे, दिल्ली येथील निर्भया प्रकरण ताजे असताना मुंबईत भर अधिवेशन कालावधीत म्हणजेच दिनांक 15 मार्च, 2013 व दिनांक 16

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मार्च, 2013 अनुक्रमे विलेपार्ले आणि माटुंगा येथे सामूहिक बलात्काराच्या घडलेल्या गंभीर घटना, भंडारा जिल्ह्यात तीन अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून त्यांचा खून करण्यात आल्याप्रकरणी गृह खात्याच्या व फॉरेन्सिक खात्याच्या तपासणी अहवालात नसलेली एकवाक्यता, राज्यात महिला, अल्पवयीन मुली, दलित व बालकांवरील अत्याचारात वाढ होवून यामध्ये पुरोगामी महाराष्ट्राने मागास राज्यांनाही मागे टाकले, नवी मुंबईतील सुनील लाहोरिया खून प्रकरण, संध्या सिंग खून प्रकरण, सिडकोतील लिपिक श्री.अतुल म्हात्रे खून प्रकरणांसह अनेक गंभीर खून प्रकरणांचा तपास लावण्यास गृह खात्यास आलेले अपयश, डान्सबार बंद करण्याची घोषणा करुन देखील समाज शासनाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुंबई महानगरक्षेत्रात डान्सबार सुरु असणे, सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटनेत देखील वाढ झालेली असणे, मुंबई शहरातील खाजगी आस्थापनांवर तैनात असलेल्या 21 खाजगी सुरक्षारक्षकांकडून दिनांक 10 जानेवारी, 2013 रोजी बेकायदेशीर शस्त्रास्त्रांचा जप्त केलेला साठा, 26/11 च्या हल्ल्यानंतर सीसीटिव्ही यंत्रणा बसविण्याची घोषणा करुन देखील अद्यापपर्यंत सीसीटिव्ही यंत्रणा बसविलेली नसणे, एकूणच राम प्रधान समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत शासनाची असलेली उदासीन भूमिका, यासर्व बाबींमुळे पोलीस दलाबाबत संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील कायदा व सुव्यवस्था या विषयावर चर्चा करीत असताना माझ्या आठवणीमध्ये गेली पाच अधिवेशने अशी होती की, त्यामध्ये नक्षलवाद व नक्षलग्रस्त भागाबाबत चर्चा झाली नाही असे घडलेले नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी नक्षलग्रस्त भागासंबंधी तारांकित प्रश्न असो, लक्षवेधी सूचना असो की नियम 93 अन्वयेची सूचना असो तो प्रश्न अत्यंत आक्रमकपणे मांडलेला आहे. कारण त्यांना ते भोगावे लागते, अनुभवावे लागते. मी सुरुवातीलाच असे सांगतो की, गेले 7-8 महिने नक्षलग्रस्त भागामध्ये कोणत्याही प्रकारे महाराष्ट्राच्या भूमीमध्ये पोलिसांनी योग्य पध्दतीचा बंदोबस्त केला असावा. त्यामुळे नक्षलग्रस्त कारवायांना मोठ्या प्रमाणात निर्बंध घालण्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या पोलीस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

यशस्वी ठरले आहेत. एवढेच नव्हे तर गेल्या 7-8 महिन्यामध्ये नक्षलग्रस्त भागातील वैफल्यग्रस्त झालेले तरुण शस्त्र खाली ठेवून पुन्हा समाजामध्ये काम करण्यासाठी सामील झाल्याचे दृश्य उभे झाले तेवढ्या पुरतेच मी राज्याचे माननीय गृहमंत्री आणि गडचिरोली जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांना मी धन्यवाद देतो. याच पध्दतीने त्या भागामध्ये नको असलेल्या पोलिसांना पाठविण्यापेक्षा कर्तृत्ववान पोलिसांना पाठविले तर पोलिसांना आणखी यश येईल. सांगलीतील आपले आवडते कर्मकठीण व कायद्याचे तंतोतंत पालन करण्याची इच्छा असलेले श्री.सूर्यवंशी हे बरे झाल्यानंतर हॉस्पिटलमधून परतल्यानंतर त्यांना तातडीने गडचिरोली जिल्ह्यात पाठविले तर ते 2-4 लोकांना धडा शिकवतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, माझ्याकडे बार व हुक्का बारची माहिती आलेली आहे. मुंबईतील बारबाबत मी बोलणार नाही. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.ढोबळे यांची काय अवस्था झाली ? त्यांच्या कामाची पध्दत चुकीची असेल, मान्य आहे. परंतु त्यांची क्रयशक्ती जबरदस्त आहे. ती समाजाला भावली होती. त्यांना असे सांगावयास लागत असे की, तुम्ही हातामध्ये हॉकी घेऊ नका. पोलिसांना जी काठी दिलेली आहे ती तुम्ही हातात घ्यावी. चकचकणारी काठी हातात घेऊन ते फिरले तर रात्रीच्या वेळी ती काठी ठळकपणे दिसून तरी येईल. परंतु तसे न करता त्यांचाही बंदोबस्त करण्याची व्यवस्था शासन करते तेव्हा कायदा व सुव्यवस्थेकडे शासन किती गंभीरपणे पाहते हे लक्षात येते.

मुंबई शहरामध्ये रस्त्यावर किंवा फूपाथवर उघड्यावर संध्याकाळचे 6 वाजल्यानंतर दारु प्यायची. रस्त्यावर दारुचा बार उघडल्यासारखी वागणूक केली जाते. बाजारामध्ये येणाऱ्या महिला व मुलींना कुचेष्टेला सामोरे जावे लागते एवढी ही गंभीर बाब आहे. यासंबंधी तक्रार झाल्यानंतर, पोलिसांकडे गेल्यानंतर पोलिसही लक्ष देत नाहीत. एखाद्या भागामध्ये विनयभंगाचे प्रकरण झ ाल्यानंतर कायदा व सुव्यवस्था बिघडल्यावर व तेथे हल्ला झाल्यानंतरच पोलीस लक्ष देणार आहेत काय असा प्रश्न माझ्यासमोर निर्माण झाला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 10:05

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, माझ्याकडे अधिकृत तक्रार आहे. अमृत नगर वेल्फेअर असोसिएशन यांनी ही तक्रार केलेली आहे.रेखा अपार्टमेंट, 90 फूट रोड, अमृत नगर, सागर पार्क या भागामध्ये उषा व्हिला, सेठ बिल्डर क्लब हाऊस, रेखा अपार्टमेण्ट, हर्षा अर्पाटमेंण्ट अशा इमारती आहेत. तेथील रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्किंग आहे. एका बाजूला हॉकर्स आहेत. फूटपाथवर संध्याकाळी काही लोक दारु पिण्यासाठी बसतात आणि महिलांची आणि मुलींची छेडछाड करतात, टिंगलटवाळी करतात. या बाबतीत अनेक तक्रारी करण्यात आल्या. पोलीस त्या लोकांना पकडतात, दंड करतात आणि दुस-या दिवशी सोडून देतात. पुन्हा दुस-या दिवसापासून तोच प्रकार सुरु असतो. फूटपाथवर राजरोसपणे हे जे दारु पिणे चालू आहे त्यावर तातडीने नियंत्रण घातले नाही तर मुंबईचे सर्व फूटपाथ हे दारुचे अड्डे होतील आणि लोकांना जगणे कठीण होईल. हे एकच उदाहरण मी दिलेल आहे. अशी 10-15 उदाहरणे मी नावासहीत देऊ शकेन . याकडे पोलिसांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा महिलांच्या बाबतीत गंभीर परिस्थिती निर्माण होईल. सामुदायिक बलात्काराच्या घटना वाढत चालल्या आहेत. त्याबाबतीत लोकांना काही वाटेनासे झाले आहे. घाटकोपर पश्चिम येथील अमृतनगर वेलफेअर असोसिएसशन या भागामध्ये ज्या काही समाजाला घातक अशा अवैध गोष्टी चाललेल्या आहेत त्या तातडीने बंद करण्यासाठी त्या भागाकडे लक्ष देण्याची गरज आहे. तेथील रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेले पार्किंग हटविण्यासाठी आदरणीय सूर्यवंशी यांना तेथे पाठविले तर ते तातडीने आपला हिसका दाखवतील. मुंबईचे हे एकच उदाहरण देऊन मी पुढच्या विषयाकडे वळतो.

सभापती महोदय, आंध्र प्रदेश राज्यतील एम.आय.एम. या पक्षाचे लोकप्रतिनिधी अकबरुद्दीन ओवेसी याच्या संबंधीचा विषय फार गंभीर आहे. धर्माच्या संरक्षणाच्या बाबतीत जे कलम आहे त्या कलमानुसार मी हा विषय येथे मांडत आहे. धर्माचे संरक्षण सर्वांना दिलेले आहेत. कोणत्याही धर्माचा अवमान करणे हे घटनेच्या विरुध्द आहे. सभापती महोदय, आपण मला परवानगी दिली तर ओवेसी यानी आंध्रप्रदेशमध्ये केलेली दोन्ही भाषणे मी येथे वाजवून दाखवायला तयार आहे. त्यांनी हिंदूंना आव्हान करणारे भाषण केले. त्यांनी आपल्या भाषणामध्ये असे वक्तव्य केले की, तुम्ही 100 कोटी हिंदू असलात तरी 15 मिनिटाकरिता पोलीस हटवा, आम्ही कोण आहोत ते या देशाला

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

दाखवू. अशा प्रकारचे भाष्य त्यांनी आंध्रमध्ये केल्यानंतर ते लंडनला जाऊन आले. अशा प्रकारचे भाष्य केल्यानंतर केवळ मुसलमानांच्या भावना दुखावतील म्हणून त्यांना अटक कशी करायची यावरच 15-20 दिवस खल झाला आणि नाईलाजाने त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल झाला. नंतर ते जामिनावर बाहेर आले. दुसरे त्यांचे बंधू हे खासदार आहेत. या ओवेसी आणि औरंगजेब यांचे नाते काय आहे हे मला माहीत नाही. त्यांनी एम.आय.एम.च्या नावाखाली निवडणुकीमध्ये भाग घेतला.

महाराष्ट्राचे दुर्भाग्य हे आहे की, एम.आय.एम. ही संघटना हैद्राबादच्या लढ्यामध्ये उतरली होती. त्यावेळच्या रझाकाराची निर्मिती करणारी ही एम.आय.एम. संघटना आहे. त्यावेळी ब्रिटीश सरकारने या संघटनेवर बंदी घातली होती, एवढी ही खतरनक संघटना आहे. त्यानंतर एम.आय.एम.चे पुनरुज्जीवन झाले नाही. पण या ओवेसीने या एम.आय.एम.संघटनेचे पुनरुज्जीवन केले. एम.आय.एम.ही संघटना सुप्तावस्थेत होती.आता त्यांनी आक्रमकता निर्माण केली आहे.

त्या ओवेसीने जे काही भाष्य केलेले आहे त्यामुळे संपूर्ण हिंदुस्थानभर एक वेगळा संदेश गेलेला आहे. या हिंदुस्थानामध्ये आपण संघटित झाल्यानंतर कोणालाही दाबू शकतो, मारु शकतो. स्वतंत्र देशाची निर्मिती करण्यासंदर्भातील त्याने घोषणा केलेली आहे. त्याने देशामध्ये काही केले हा या ठिकाणी प्रश्न नाही. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये एम.आय.एम.मैदानात उतरली. नांदेडच्या निवडणुकीमध्ये आम्हाला जातीय ठरविण्यात आले. आम्ही जातीय कसे हे आम्हाला अजून समजले नाही. हा चर्चेचा विषय असू शकेल. आम्हाला जातीय ठरवून अछूत अछूत करत फिरणा-या काँग्रेसवाल्यांनी एम.आय.एम.बरोबर युती केली. एम.आय.एम.चे निवडून आलेले 11 नगरसेवक आता तेथे थैमान घालत आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्या लोकांमध्ये हिंमत आली.

महोदय, सन्माननीय खासदार श्री.अकबरबुद्दीन हे नांदेडला आले. माननीय उच्च न्यायालयाने त्यांना शहरात येण्यास बंदी घातली होती. त्यांना संपूर्ण जिल्हा बंदीची मागणी होत असताना ते बाहेरच्या मार्गाने औरंगजेबाच्या कबरीपुढे नतमस्तक होण्यासाठी आले. संपूर्ण मराठवाड्यात निजामोद्दीनच्या काळामध्ये संघर्ष करण्याऱ्या मुसलमानांना एकत्र करुन हिंदुंना आव्हान देण्यासाठी एक मोठी चाल खेळली. एमआयएमच्या माध्यमातून ज्या घटना घडविल्या जात आहेत, त्या अतिशय गंभीर आहेत. या गोटीचा संदर्भात फार वेगळा आहे. शासनाचे इंटिलिजन्स बुरो या गोष्टींचा शोध घेत आहे काय असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय,एम.आय.एमचा उदय आज झालेला नाही. तो ब्रिटीशांपासून आहे. हैद्राबाद संस्थानच्या रझाकारांनी अनन्वित अत्याचार करुन आया-बहिणींना पळवून नेऊन, त्यांना बाटवून त्यांचा सत्यानाश केला अशी एमआयएम संघटना आहे. 1999 साली संभाजीनगर येथे झालेल्या दंगलीच्या संदर्भाची मला आठवण येते. त्यावेळी तत्कालीन उप मुख्यमत्री श्री.छगन भुजबळ साहेब होते. त्यांच्याकडे गृह विभाग होता. त्या वेळी झालेल्या दंगलीचे अतिशय क्लिष्ट स्वरुप होते. हे शासन त्यावेळी दंगलीच्या खोलात का गेले नाही हे मला कळत नाही. त्यावेळच्या दंगलीमध्ये त्यांचे लक्ष्य कोण होते, कोणावर त्यांनी निशाणा साधला होता, तर तो निशाणा हिंदूंवर साधला नव्हता, पोलिसांवर त्यांचा खरा निशाणा होता. पोलिसांच्या घरात घुसून त्यांच्या आई-बहिणींची निर्भत्सना केली ती या ठिकाणी सांगण्यासारखी नाही. त्या भगिनीही आपली झालेली निर्भत्सना व्यक्त करु शकत नाही, अशी कोंडमारा करणारी त्यावेळची परिस्थिती होती. तो समाज अतिशय आक्रमक झालेला होता. तत्कालीनन मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ हे त्यावेळी संभाजीनगर येथे गेले, त्यावेळी टपावर उभे राहून त्यांच्याशी संवाद केल्यानंतर त्यांची माफी मागून त्यांना या सभागृहात यावे लागले. त्यावेळी ज्या मुस्लीम जमावाने पोलिसांच्या आया-बहिणींची इज्जत लुटली. त्यांच्या घरामध्ये घुसले, महिलांची वाट लावली. तसेच पोलिसांना रस्त्यांवर मारहाण करण्यात आली. त्या मुस्लीम जमावापुढे महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना गुडघे टेकून माफी मागून परत यावे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

लागले. ती सुरुवात होती.

सभापती महोदय, त्यानंतर आझाद मैदान येथे दंगल झाली, आझाद मैदानामध्ये काय इतिहास घडला याची सर्वांना माहिती आहे. त्याही वेळी पोलिसांवर हल्ला झाला. आमच्या पोलीस भगिनींवर हल्ला केला गेला. त्या पोलीस भगिनींबाबत महाराष्ट्राला चर्चा करण्यास लाज वाटावी अशा प्रकारचे चित्र निर्माण झाले. यात पोलिसांना लक्ष्य करण्याचा इरादा होता काय या बाबतची सखोल माहिती घ्यावयास पाहिजे होती. आझाद मैदानात झालेल्या दंगलीच्या संदर्भात शासनाने नेमकी कोणती भूमिका घेतलेली आहे याची माहिती आम्हाला अजून मिळालेली नाही. सी.सी.कॅमेऱ्याच्या फुटेजध्ये जे गुन्हेगार दिसून येतात, त्या गुन्हेगारांना अद्यापर्यंत अटक का करण्यात आलेली नाही, त्यात फक्त 5-25 गुन्हेगारांना अटक केली आहे, इतरांना का अटक केली नाही याची आम्हाला माहिती मिळू शकलेली नाही. या बाबतची सखोल माहिती या सदनाला मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आमच्या हुतात्मा स्मारकाला लाथ मारणाऱ्यांना पकडले. त्यांच्या विरुध्द देशाचा अवमान केला म्हणून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता. परंतु त्यांच्या विरुध्द तो गुन्हा दाखल केला नाही. तुम्ही त्या गुन्हेगारांविरुध्द कोणती तरी साधी कलमे लावली. ती कलमे तुम्हाला पाठ आहेत. मी काही कलमी आंबा नाही, त्यामुळे मला कलमांची माहिती नाही. दु:ख एकाच गोष्टीचे होते की, आपल्या मनाचा झालेला कोंडमारा आमच्या भगिनीने कवितेच्या माध्यमातून व्यक्त केला. पोलीस जर्नेलच्या संपादकांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी त्या भगिनीची कविता छापण्याची हिंमत दाखविली. माझ्या भगिनीचा मनाचा कोंडमारा व्यक्त झाला. त्या कवितेत शब्द असा होता की, " सापो कों दूध नही पिलाना " ही म्हण साध्या लहान मुलाला देखील कळते. या शब्दामुळे एका समाजाच्या भावना दुखावल्या आणि त्यामुळे आमच्या भगिनीला माफी मागावी लागली. त्यावेळी श्री.सत्यपाल सिंह तेथे आयुक्त होते की काय हे मला माहिती नाही. परंतु आयुक्तांनी जर त्या भगिनीस माफी मागावयास लावली असेल अथवा अन्य कोणी माफी मागावयास लावली असेत त्याचा आम्ही निषेध करतो. तिने भावना व्यक्त केल्या की, शेकडो भगिनींवर अत्याचार झाले. ते अतिशय वाईट आहे.

3...

श्री.दिवाकर रावते...

महोदय, हे लोक पुन्हा हिंमत करुन कोर्टात जातात. "सापो को दूध नही पिलाना" ही सापाची औलाद आहे, ते या देशाच्या विरोधात उभे राहिले आहेत. ही सापाची नतद्रष्ट औलाद आहे, जाती-पातीच्या नावाखाली या हिंदुस्थानात आतंक माजवित आहेत. ही सापाची औलाद आहे, त्यांनी 1992-93 पासून आजपर्यंत सतत आणि सातत्याने बॉम्बस्फोटाची मालिका सुरु करुन हजारो निरपराध लोकांना मारले.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

यांना साप नाही म्हणायचे तर काय म्हणायचे? अशा वेळेला खंबीर भूमिका माननीय गृहमंत्र्यांनी घेणे अपेक्षित होते. तशी त्यांनी भूमिका घेतली तर अधिक चांगले होईल. माफी कशाला? जे काही झाले त्याबद्दलची भावना माझ्या भगिनीने व्यक्त केली, हा आमच्या भाषेतील अलंकार वापरलेला आहे. मुस्लिमांना काय वाटेल या भीतीने सरकार वागते त्यामुळे आणखी एक घटना घडली. या घटनेचा परवा प्रश्नोत्तराच्या तासात ओझरता उल्लेख झाला होता. यापूर्वी पाच वेळा दंगली घडल्या होत्या.

सभापती महोदय, धुळ्याला दंगल झाली. त्या अगोदर देखील तेथे दंगल झाली होती. पाच ठिकाणी झालेल्या दंगलींपैकी मी तीन ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी गेलो होतो. एका ठिकाणच्या दंगल प्रकरणी माझ्याबरोबर माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे होत्या. त्यांनी तेथील महिलांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला होता. धुळे येथील दंगल कशावरुन झाली? धुळे येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थानिक नेत्यांचे हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये 15-20 रुपयाचे बिल देण्यावरुन वाद निर्माण झाला. बिलावरुन भांडण कोणी केले? गिऱ्हाईक आणि वेटर हे दोघेही मुस्लीम समाजाचे होते. त्यांच्या बिलाच्या रक्कमेवरुन भांडण झाले. सुटे पैसे देण्यावरुन अनेक ठिकाणी वादावादी होत असते. त्या भांडणाचे निमित्त करुन 15 मिनिटात प्रचंड जमाव शस्त्रानिशी तेथे गोळा झाला. ही दंगल पूर्वनियोजित होती. सकाळी 11.00 वाजता सुरु झालेली दंगल दुपारी 4.00 वाजता आवाक्याबाहेर गेल्यानंतर पोलिसांना गोळीबार करावा लागला.

सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात कुठेही दंगल झाली, काही अघटित घडले तरी आजपर्यंत एवढ्या मोठ्या संख्येने पोलीस जखमी झालेले नव्हते, पोलिसांना मार लागला नव्हता. धुळ्याच्या दंगलीमध्ये 252 पोलिसांनी मार खाल्ला. एस.पी.च्या हनुवटीला मार लागला. ही हिंदू-मुस्लीम दंगल नव्हती. पोलीस आणि स्थानिक मुस्लीम समाज यांच्यातील दंगल होती. मुस्लिमांबाबत बोलणाऱ्या एका व्यक्तीबद्दल राग धरुन त्यांच्या घराच्या आजूबाजूच्या सर्व हिंदू लोकांची घरे जाळण्याचा प्रयत्न झाला.

सभापती महोदय, मी स्वत: घटनास्थळी गेलो होतो. मी तिथे जाऊन काय केले हे सांगण्याकरिता मी येथे उभा राहिलेलो नाही. परंतु या दंगलीमध्ये 252 पोलिसांना मार खाल्ला. असे असताना समसमान अटका कशासाठी? जेवढे मुस्लीम अटकेत तेवढेच हिंदू आत गेले.......

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

पाहिजेत ही भूमिका का? सगळीकडे तुम्ही हे असे का करता? संभाजीनगर येथील घटना 1999 पासून मांडत आहे. पोलिसांना हतबल करायचे, पोलिसांची नीतिधैर्य संपवून टाकायचे ही भूमिका कधी बदलणार आहात? धुळ्याच्या दंगलीमध्ये ओवेसी यांची सीडी फिरत होती. मी एस.पी.ना दाखविले आहे. सगळ्या मुस्लीम तरुणांच्या मोबाईलमध्ये ओवेसीच्या भाषणाच्या क्लिप्स होत्या. ओवेसी म्हणतो "15 मिनट के लिए हटा दो, हम 100 करोड़ को खत्म करेंगे". ही सीडी जाणीवपूर्वक फिरवली जात होती. त्याच्याही पलीकडे जाऊन निर्माण केलेल्या आणखी एका सीडीचा प्रकार हा अत्यंत वाईट आहे. ओवेसीच्या भाषणाची सीडी ही वेगळी आहे. रामाच्या संदर्भात एक सीडी निर्माण केलेली आहे. ती अत्यंत गंभीर आहे. गृहमंत्र्यांनी ती सीडी तपासली आहे का? आमच्या हिंदू धर्मावर ज्या पध्दतीने आघात करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु झाला आहे तो एमआयएम या संघटनेच्या माध्यमातून झाला असावा अशा प्रकारचा संशय व्यक्त करावा का असा प्रश्न आहे.

सभापती महोदय, त्या सीडीमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, हमारी बाबरी मस्जिद शहीद हुई. अलाहाबाद हाई कोर्ट का फैसला कैसा आया ? मुझे सुनकर, पढ़कर हैरत होती है. कहते हैं कि अखलियत की बुनियाद का मिलकियत का फैसला होता है. राम कब पैदा हुए. 9 लाख साल पहले ? मेरे भाई 8-10 हजार साल पहले का न अता रहता है न पता रहता है. यह 9 लाख साल पहले का राम पैदा कैसे हुआ ?

नंतर इ.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्या सीडीमध्ये हिंदू धर्मावर हिडीस पध्दतीने भाष्य केले असून त्यावर बंदी घातल्याचे माझ्या तरी ऐकीवात नाही. 100 कोटी हिंदूना मारुन टाकण्याची धमकी देणाऱ्या ओवेसीवर तुम्ही काय कारवाई केली आहे ? ओवेसीने अल्लाच्या संदर्भात फार चांगले लिहिले आहे. मला कोणाच्या धर्मावर बोलावयाचे नाही. या सभागृहात त्यांच्यातले कोणीच हजर नाहीत. आम्ही काही बोललो की, त्यांच्या भावना दुखावल्या जातात. हिंदू धर्माचा अशा प्रकारे अवमान करणे हे घटने प्रमाणे निषिद्ध आहे. आजपर्यंत ओवेसीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविला गेलेला नाही. असे असतांना तुमचे पोलीस काय करीत आहेत ? तुमचे पोलीस एका बाजूला हिंदूना हैराण करतात व दुसरीकडे हिंदूची निर्भत्सना करतात. आमचा देव एक असतांना तुमच्या देवांची संख्या एवढी का ? आमच्या 33 कोटी देवांच्या संदर्भात अद्वातद्वा जाहीर रित्या बोलून ते संपूर्ण हिंदुस्थानातील मुस्लीम बांधवाकडे पाठवून द्वेश निर्माण करण्याचे षड्यंत्र उभे करण्याचे काम ओवेसी करीत आहे.

सभापती महोदय, धुळयाची दंगल 15 मिनिटात उभी राहिली होती. सीसीटीव्हीमध्ये शासनाला आमचे 15-20 पोलीस दिसले आणि त्यांना सस्पेंड केले. या पोलिसांवर मोटर सायकल जाळल्याचाही गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. परंतु या पोलिसांनी मोटरसायकल जाळल्या नव्हत्या पोलिसांनी जर गुन्हा केला असेल तर त्यांच्यावर कारवाई करा परंतु ज्यांनी दंगल केली, जे दंगलखोर सीसीटीव्हीमध्ये दिसून आले परंतु त्यांच्यावर मात्र काहीही कारवाई करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, धुळे दंगलीच्या संदर्भात सत्यशोधन समितीचा अहवाल शासनाकडे आलेला आहे. काश्मीरमध्ये दंगल झाली की, त्या ठिकाणचे हिंदू मोठया प्रमाणात विस्थापित होतात असा इतिहास आहे. त्यांची घरे दारे जाळली, हिंदू विस्थापित झाले की त्यांची घरे, मालमत्ता मुस्लीम लोकांनी ताब्याची घ्यायची असाच प्रकार काश्मीर मध्ये सुरु आहे व तसाच प्रकार धुळयातही निर्माण झालेली आहे. त्यामुळे धुळे दंगलीच्या संदर्भात शासनाचा काय दृष्टिकोन राहणार आहे हा प्रश्न आहे. धुळे दंगलीच्या सत्यशोधन समितीवर निवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. वाय.सी.पवार, निवृत्त न्यायाधीश श्री. सुधाकर चपळगावकर, ज्येष्ठ पत्रकार श्री. अरविंद

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. दिवाकर रावते .....

कुलकर्णी, उच्च न्ययालयाचे अधिवक्ता श्री. सुरेश कुलकर्णी, पत्रकार श्री. अरविंद शंकर पानसरे तसेच श्री. मिश्रा हे होते. सत्यशोधन समितीने धुळे दंगलीच्या संदर्भातील अहवाल शासनाला दिलेला असून शासन या अहवालाची कशी छाननी करेल हे मला माहिती नाही.

सभापती महोदय, पोलीस खात्याला मोडस ऑपरेंडी हा शब्द बरोबर लागू होतो. पोलीस लोक मुसलमानांच्या बाबतीमध्ये नीतिमत्ता निर्माण करीत आहेत. मुसलमानांना काय झाले आहे ते मला काही कळत नाही. मुसलमान झगडा कशासाठी निर्माण करीत आहेत ते सुध्दा कळत नाही. ते जन्माला येतात तेव्हा ते हिंदूच असतात. सुंता झाल्यानंतर ते मुसमान होत असतात. आपल्यामध्ये बाळाचे कान टोचल्यानंतर तो हिंदू होत असतो.

सभापती महोदय, श्री. दीपक मदनलाला हिवरे, वय वर्षे-19, राहणार ग्रामपंचायत जवळा, जि. वर्धा. या तरुणाच्या फेस बुकवर श्री. इमरान शेख, राहणार मुंबई यांच्या कॉम्प्युटरवरून रात्री 11.03 वाजता ई-मेल पाठविण्यात आला होता. या ई-मेल वर त्याने इतक्या शिव्या पाठविल्या होत्या त्या मी येथे उच्चारु सुध्दा शकत नाही. या शेखने ई-मेल मध्ये तुम्हारी बहिन का xxx तुम हिंदू xxx पता नहीं कितने भगवान हैं xxxx कभी तो एक xxxअशा किती तरी शिव्या हिंदूना दिलेल्या असून श्री.हिवरे यांनी यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

फेसबुकवरील हा युवक मुंबईतील असून त्याला पोलिसांनी शोधून देखील काढला आहे. पण त्याला अजून अटक झालेली नाही. याबाबत पोलिसांना म्हणायचे तरी काय ? आपण हे सर्व फोफावणार आहात काय ? हिंदू-मुसलमान यांच्यामध्ये द्वेष वाढीला लावणाऱ्या एमआयएमच्या संमत्तीने हे सर्व होत आहे. हिंदू-मुसलमान यांच्यामध्ये द्वेष निर्माण करणारे जे जे समाजकंटक आहेत त्यांना आपण संरक्षण देणार असाल तर ते चुकीचे आहे. आम्ही इकडे-तिकडे काही केले तर आम्हाला कलम लावून कलमबहाद्दूर ठरविणार असाल तर हा देश नेमका कोणाचा आहे ? आपण कोणाला संरक्षण देणार आहात ? आपण कोणत्या मानसिकतेने जाणार आहात ? राज्यकर्त्यांना निवडणुकीत मते पाहिजे असतील तर ती जरूर घ्यावीत. परंतु, हिंदुंच्या माना मुरगळून अशा प्रकारे अत्याचार करणार असाल ती अत्यंत गंभीर बाब आहे.

मी आणखी एका गंभीर विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. हा विषय फारच गंभीर आहे. लव्ह जिहाद हे फारच गंभीर प्रकरण आहे. मुस्लीम तरूण हे सातत्याने हिंदू मुलींना कॉलेजच्या परिसरात गाठतात आणि पळवून नेण्याचे प्रकार करीत आहेत. श्री रामदास स्वामींनी छत्रपतींच्या काळात हिंदू स्त्रियांच्या तत्कालीन स्थितीचे वर्णन करताना म्हटले होते की,

किती गुज्रिणी, ब्राह्मणी भ्रष्टविल्या, किती शांमुखी जाहजी फाकविल्या

कितीयेक देशांतरी त्या विकील्या, किती सुंदरा हाल होवोनि मेल्या.

असे त्यावेळी दिल्लीपती असलेल्या औरंगजेबाचे कल्चर होते. तसाच प्रकार लव्ह जिहादच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. फाटके मुसलमानांना ऑफर दिली आहे की, हिंदू मुलीला पकडायचे, तिला बाटवायचे, तिच्याशी लग्न करायचे. यासाठी त्यांना पाच ते दहा लाख इतक्या मोठ्या प्रमाणावर रक्कम दिली जाते. ही रक्कम देखील धर्माप्रमाणे असते. लव्ह जिहाद संबंधी आपली भूमिका काय आहे हे मी समजून घेणे अत्यंत चूक आहे. संभाजीनगरला प्रकरण झाले होते तेव्हा आमची शिवसेना गेली होती. एका मुलीला पळवून नेले होते. शेवटी, आम्ही त्यांना पकडून आणले. त्यावेळी आमच्या खासदारांसह सर्वजण तेथे गेले होते. तेव्हा पोलिसांनी सांगितले की, ते दोघेही अठरा वर्षा पेक्षा मोठे आहेत. त्या मुलीचे वय मोठे असल्यामुळे आम्ही काहीही बोलू शकत नाही. कायद्या प्रमाणे हे सर्व बरोबरच आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

लव्ह जिहाद प्रकरण न्यायालयात गेले होते. तो विषय मी येथे मांडायचा प्रयत्न करणार आहे. मला वाटते म्हणून मी ते प्रकरण येथे मांडणार नाही. मुसलमान पोर हिंदुंच्या मुलींना पळवत आहे म्हणून मी हे प्रकरण येथे मांडत आहे असे नाही. केरळच्या उच्च न्यायालयाने देशात व महाराष्ट्रात हिंदुंच्या मुलींना पळविणारे इस्लामी संकट कसे आहे याबाबत निर्णय दिलेला आहे. न्यायालयाने इंग्रजीमध्ये निर्णय दिला असून त्याची संपूर्ण प्रत माझ्याकडे आहे. त्यातील थोडासा मराठी अनुवाद मी येथे वाचू इच्छितो. "देशातील विविध भागामध्ये विशेषत: महाराष्ट्रात लव्ह जिहादचे चिंताजनक प्रकार घडत असल्यामुळे त्यासंबंधातील बातम्या येत आहेत. लव्ह जिहाद म्हणजे केवळ हिंदू अथवा बुद्ध, जैन, शीख, लिंगायत धर्मातील मुलींना बाटवण्याचे कारस्थान." दिनांक 6.11.2009 चे शहान शाह व सिराजउद्दीन विरूद्ध केरळ राज्य सरकार या प्रकरणातील दिलेले निकालपत्र आलेले आहे. केरळ राज्यातील अशा प्रकरणाची भयावह स्थिती त्यात दिली आहे. प्यॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, शाहीन फ्रंट, कँपस फ्रंट अशा अनेक संघटनांचा त्यात उल्लेख आहे. आमदारांना विधान मंडळामध्ये पकडण्यासाठी धाव घेणारे क्राईम ब्रँचचे तत्पर हुशार अधिकारी याबाबत काय करणार आहेत हे देखील जाणून घेण्यासाठी मी उत्सुक आहे.

सन 2006 ते 2009 पर्यंत लव्ह जिहादच्या पद्धतीने 3 ते 4 हजार मुली बाटवल्या गेल्या होत्या. अशा कारवायांसाठी विदेशातून पैसा येतो याचाही उल्लेख त्यात आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की, अशा पद्धतीच्या कारवाया केवळ केरळमध्ये चालत नाहीत तर उत्तर प्रदेश, कर्नाटकातील बंगलोर आणि आपल्या महाराष्ट्रातील पुणे शहर अशा ठिकाणी सुद्धा अशा पद्धतीने लव्ह जिहादच्या माध्यमातून महिलांचे घातक शोषण होत आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अशाप्रकारचा निष्कर्ष उच्च न्यायालय केरळ यांनी "लव्ह जिहाद"च्या बाबतीत काढलेला आहे.

सभापती महोदय, अशा प्रकरणांत आघाडीवर असणाऱ्या "पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया" या संघटनेने महाराष्ट्रात ठिकठिकाणी आपले जाळे पसरले आहे. या संघटनेबाबत देशांतर्गत सुरक्षा यंत्रणांना धास्ती आहे. केंद्रीय गृह खाते, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद अशांकडे देण्यात आलेल्या सरकारी माहितीनुसार यांच्याकडे दहशतवादी कृत्य करणारीही शाखा आहे असे केंद्रीय शाखेचे मत झालेले आहे. अशी ही संघटना आज महाराष्ट्रात पाय रोवत असताना या संघटनेचे कार्यक्रम सोलापुरात होतात. पीरपाशा इनामदार कोण आहेत हे आपणास माहीत आहे. आपल्या राष्ट्रीय नेत्याच्या जवळचे आहेत. पीरपाशा इनामदार या इसमाच्या अधिपत्याखालील आझम कँपस, पुणे येथे "पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया" या संघटनेची शिबिरे आणि बैठका होतात. पुण्यामध्ये पीरपाशा इनामदार यांना कोणाचे कवच आहे , ते कोणत्या पक्षा बरोबर संघटीत आहेत याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्याचा शोध घेतल्यावर संबंधितांवर कारवाई होईल काय ?

सभापती महोदय, श्री.सुधांशू जोशी यांनी माहितीच्या अधिकाराखाली मागितलेल्या माहितीमध्ये श्री.देवेन भारती, प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी मोकळपणाने दिलेली माहिती वाचून दाखवितो. "माहितीचा अधिक्ार अधिनियम 2005 अंतर्गत मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यासन अधिकारी श्री.पी.ए.मालडीकर यांच्याशी दिनांक 19.1.2013 रोजी "लव्ह जिहाद" या विषयावर आपणाशी चर्चा करण्यात आली. आपल्या गृह विभागाने हा शब्द मान्य केलेला आहे. सदर चर्चेत आपण पुरविलेल्या माहितीमुळे आपले समाधान झ ाले आहे. तथापि, आपणास आवश्यक असलेली व या कार्यालयात उपलब्ध असलेली "लव्ह जिहाद" बाबतची सन 2008 ते 2011 पर्यंतची सांख्यिकी माहिती आपणास पुरविण्यात येत आहे." पुढे महाराष्ट्राचा तक्ता दिलेला आहे त्यामध्ये कोणत्या शहरात किती केसेस झाल्या त्याची माहिती दिलेली आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, मी या ठिकाणी केरळ उच्च न्यायालयाचा निर्णय सांगितला. सन 2009 केरळ उच्च न्यायालयाने शहानशहा व सिराजउद्दीन विरुध्द केरळ राज्य सरकार, ॲन्टीसिपेटरी बेल ॲप्लीकेशन क्रमांक 5288/2009 याखाली झालेला तो निर्णय आहे.

सभापती महोदय, लव्ह जिहाद हा संपूर्ण भारतात सक्रीय असून तो पुण्यामध्ये ही सक्रीय असल्याचे त्यांनी निदर्शनास आणलेले आहे. पोलीस अधिकारी श्री.देवेन भारती यांनी माहितीच्या अधिकाराखाली लव्ह जिहाद कोठे कोठे आहे याची माहिती दिलेली आहे. तेव्हा त्या ठिकाणी पोलीस विभागाचे लक्ष असे मी गृहीत धरतो.

सभापती महोदय, मला या संदर्भात एकच गोष्ट निदर्शनास आणावयाची आहे आणि ती अत्यंत गंभीर बाब आहे. आतंकवाद, फेसबुकवर हिंदूना चिथावणे, पोलिसांना मारुन त्यांचे नीतिधैर्य खच्ची करणे अशा गोष्टी घडत असतानाही सरकारची मनोवृत्ती मुसलमान समाजाच्या मताकरिता त्यांना सांभाळण्याची असल्यामुळे एक पाऊल मागे जा, परंतु त्यांना आता दुखवू नका अशी आहे. माननीय गृह मंत्र्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये कितीही खंडन केले तरी ते जनतेला आणि हिंदुस्थानला माहीत आहे आणि ते त्यांच्या हातामध्ये नाही. दुर्दैवाने वाईट एवढेच वाटते की, सर्व बाजूंनी आक्रमण करायचे, मुस्लिमांची लोकसंख्या वाढवावयाची आणि 100 कोटी जनतेला आव्हान देणारे आणखी मुस्लीम लोक तयार करायचे ही एमआयएमची पध्दत आहे. मी जास्त काही बोलणार नाही.

सभापती महोदय, माझी गृहमंत्री महोदयांना विनंती आहे. त्यांनी नक्षलवाद्यांच्या संदर्भात जे कर्तृत्व दाखविले आहे, त्यासाठी दोन-तीन वर्षाचा कालावधी गेला, पण त्यांनी निर्धाराने काम केले. या कामाच्या पाठिमागे सर्व सभागृह त्यांच्या बरोबर राहिले. आम्ही कधी टीकेची झोड उठविण्याचे काम केले नाही. आमचे म्हणणे आहे की, धर्माचे स्वातंत्र्य सर्वांना आहे. आम्ही त्यांच्या मशिदीमध्ये जाऊन धुमाकूळ घालत नाही. ते धर्म का पाळतात हे विचारत नाही. परंतु आमच्या धर्माची उघड निर्भत्सना होत असेल त्या संदर्भात सरकारची भूमिका काय राहणार आहे हे मी माननीय गृह मंत्र्यांना विचारतो. ओवेसीने आमच्या धर्माची उघडपणे केलेल्या निर्भत्सनेची क्लिप माझ्याकडे आहे, ती मी आपणास वाजून दाखवितो. यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 10:35

श्री.दिवाकर रावते....

नाही तर ती सी.डी. आपल्याकडे पाठवून देतो. कदाचित आपल्याकडे सुध्दा त्या बाबतची नोंद असेल. रामाच्या नावाने शंख करणाऱ्या ओवेसीच्या बाबतीत आपण कोणती भूमिका घेणार आहात, महाराष्ट्रात त्याच्यावर गुन्हा दाखल करणार आहात काय ?

ज्याच्यावर राष्ट्रदोही म्हणून गुन्हा दाखल केला आहे त्या एमआयएम संघटनेवर ब्रिटिश काळापासून बंदी होती. परंतु एमआयएम संघटनेवर या महाराष्ट्रात केवळ बंदी घालून चालणार नाही. नांदेडला एमआयएम पक्षाचे 9 नगरसेवक निवडून आले आहेत. त्या 9 सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले पाहिजे. एमआयएम पक्षाची मान्यता तातडीने रद्द करण्यासाठी शासन काही हालचाल करणार आहे की नाही ? नाही तर भविष्यात रस्त्यावर अशा प्रकारचे आव्हान निर्माण होत असेल, धुळ्यासारखी परिस्थिती निर्माण होत असेल, पोलिसांचे बळी जाणार असतील आणि हिंदूनांच जर मार खावा लागत असेल तर, 'अब हिंदु मार नही खायेगा' हे माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे शिवतीर्थावरील वाक्य मला आठवते. परंतु यामुळे एखादी कृती निर्माण झाली तर तुमच्या आवाक्याबाहेरची, हाताबाहेरची असेल.

महोदय, आज आमदारांच्या आणि विधिमंडळाच्या प्रश्नावर पोलीस एकरुपता दाखवित आहेत. परंतु ज्यांच्या घरातील मायाबहिणीवर अत्याचार झाले त्या बाबत आपण काहीच केले नाही याचे दु:ख आहे. या घटनांचा आपण कानोसा घ्यावयास हवा होता. संभाजी नगरमध्ये घडलेल्या घटनांची आम्ही माहिती घेतली. त्या ठिकाणी महिलांच्या घरात येऊन त्यांनी काय केले हे त्या सांगू शकत नाहीत. इतक्या हिडीस पध्दतीने काम झाले आहे. त्यांना कोणी सावरले नाही, कोणी त्यांचे अश्रू पुसले नाही. पोलिसांनी गप्प बसावे म्हणून त्यांनाच दट्टया मारल्या. त्यांच्या आक्रमकतेला 1999 मध्ये रोखले असते तर एमआयएमच्या रुपाने हा राक्षस महाराष्ट्रात जो पसरु पाहत आहे त्याने कदाचित विचार केला असता की, आपली आंध्र प्रदेशचीच भूमी वापरु या. महाराष्ट्रात पाऊल टाकले तर आपल्या तंगड्या तोडल्या जातील. परंतु तशी भूमिका सरकारच्या माध्यमातून घेतली नाही. या बाबत गंभीरतेने दखल घेऊन भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रात आक्रमक अशा राष्ट्रद्रोही प्रवृत्तीच्या लोकांबरोबर लढताना पोलीस आणि समाजाला एकत्र येऊन रस्त्यावर उतरावे लागेल. मी पुन्हा मागणी करतो की, तातडीने एमआयएम संघटनेबाबत विचार करावा आणि त्या संघटनेच्या माध्यमातून सर्व ठिकाणी ज्या क्लीप फिरतात त्या संदर्भात तातडीने कारवाई करावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

महोदय, पोलीस अधिकारी श्री.हिमांशू रॉय यांनी लव्ह जिहादच्या बाबतीत लक्ष घातले आहे. त्यांना मी मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो. परंतु त्यांना हेही सांगू इच्छितो की, आता या प्रकरणी पुढील कारवाई करण्याची वेळ आली आहे.

महोदय, हिंदू मुलीला पळवून नेण्याचे प्रकरण संभाजी नगर मध्ये घडले. संभाजी नगर मधून एक फोन आला होता. ते लोक 40 लाख रुपयांमध्ये अकोला येथील मुलगी विकत घेत होते. संभाजी नगर आणि अकोल्यामध्ये शिवसेना त्या लोकांबरोबर भिडली. महोदय, मुलीची खरेदी कोण करतो आणि त्या मुलीची खरेदी करण्यासाठी त्याला पैसे कोणी दिले ? अकोला येथील स्टेशनवर हमाली करणारा मुस्लीम तरुण मुलगी पळून घेऊन जातो. परंतु पोलीस काही करु शकत नाहीत. शेवटी आमच्या पक्षाने आमच्या पध्दतीने त्या व्यक्तीला तुडविले. महोदय, पळून नेलेली मुलगी घरी आल्यानंतर तिची काय अवस्था होते, याचा आपण विचार करणार आहोत की नाही ? कॉलेजच्या नाक्या-नाक्यावर ज्या पध्दतीने टोळक्यांनी हे काम सुरु केले आहे त्यावर निर्बंध आणणार की नाही ? आपल्या राज्याचे पोलीस हुशार आहेत. माननीय गृह मंत्री, आपण इशारा केला की, हे पोलीस जे काय पेकाट मोडायचे आहे ते मोडल्याशिवाय राहणार नाहीत. परंतु इशारा देण्याचे सामर्थ्य तुमच्यात आहे काय ?

आबा, आपण या प्रस्तावाला उत्तर देताना नेहमीसारखे भाषण करणार. परंतु राजनीती ज्या पध्दतीने चालते त्या पध्दतीत तुमचे भाषण ओढ्यासारखे वाहून जाते आणि शेवटी केवळ शेवाळे उरते. शेवटी आम्हाला राजकीय प्रवृत्तीचे शेवाळे पाहावे लागतात. मी हे अत्यंत खेदाने हे सांगत असून, त्याची नोंद घ्यावी. लव्ह जिहाद आणि एमआयएम पक्षाच्या बाबतीत ठोस भूमिका घेतली नाही तर धुळ्याच्या दंगलीची पुनरावृत्ती होत राहील, एवढेच या निमित्ताने लक्षात आणून देऊ इच्छितो.

धन्यवाद.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे

महोदय, महाराष्ट्र राज्य हे शाहू-फुले-आंबेडकरांचा प्रभाव असलेले पुरोगामी राज्य आहे. या राज्यामध्ये काम करीत असताना सरकार कल्पना करते, अपेक्षा करते किंवा स्वप्न पाहते की, राज्यात अत्याचार होऊ नयेत, अन्याय होऊ नयेत व लोकांनी गुण्यागोविंदाने नांदावे. किंबहुना सुखी-समृध्द महाराष्ट्र दिसला पहिजे. परंतु काही ठिकाणी मनाला चटका लावणाऱ्या घटना घडतात आणि मन विषण्ण होते. अलीकडच्या कालखंडात आपण पाहिले की, महाराष्ट्रात जे गुन्हे घडले, अत्याचार झाले, त्यामध्ये मग भंडारा येथे घडलेली सामूहिक बलात्काराची घटना असेल ती आपल्या सर्वांना गंभीरपणे विचार करण्यास भाग पाडते. नगरमध्ये महिलेवर अन्याय झाला आणि सोनई मध्ये वाल्मिकी समाजाच्या 3 तरुणांना ठार मारण्यात आले.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड ....

ज्यावेळेला या बातम्या येतात तेव्हा आपण पाहतो की, समाजामध्ये अशी पध्दत आहे, कोणाचा खून झाला, कोणावर बलात्कार झाला, कोणावर अन्याय झाला तर अशा प्रकारच्या बातम्या येतात आणि मग त्या त्या समूहाच्या भावना दुखावल्या जातात. वाल्मिकी समाजावर अन्याय अन्याय झाला म्हणून वाल्मिकी समाजाचे लोक पुढे यावयास लागतात आणि अत्याचाराचा निषेध करु लागतात. बौध्द समाजावर अन्याय झाला तर बौध्द समाजाचे मोर्चे निघतात. ते अत्याचाराचा तीव्र निषेध करु लागतात. या सर्व घटना पाहिल्यानंतर असे का होते ? असे सारखे घडते म्हणून त्यांच्या भावना अधिक तीव्र होतात आणि ते सरकारला धारेवर धरावयास लागतात. त्यामध्ये प्रशासनावर आरोप करु लागतात असे एक चित्र आपलला सातत्याने पहावयास मिळते.

सभापती महोदय, माझ्यापुढे नेहमी मूलभूत प्रश्न पडतो की, या ज्या घटना घडतात त्यामध्ये संख्येचा विचार केला तर अशा प्रकारे मागासवर्गीयांवरच हल्ले का होतात आणि हे आपण टाळू शकतो की नाही, त्याला काही प्रतिबंध करु शकतो की नाही, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज असते. तो तपास करीत असताना आणि त्या कालखंडामध्ये सरकारने त्याकडे अतिशय गंभीरपणे पाहण्याची गरज असते. परंतु नेहमी माझ्या असे निदर्शनास येते की, तेवढ्या तीव्रतेने, तेवढ्या गंभीरपणे या घटनाकडे पाहिले जात नाही, असे काही वेळा होते. मी या घटनांबद्दल बोलणार नाही. मी सर्वसाधारणपणे बोलत आहे. अशा घटनांनंतर लोकाचे मत अधिक तीव्र होत जाते आणि ते मोर्चे, आंदोलने करु लागतात. त्यातील गुन्हेगार पकडले पाहिजे, त्यांना शासन झ ाले पाहिजे, या गोष्टीसाठी त्यांनी जे सहकार्य केले पाहिजे किंवा काही क्रियेटीव्ह मदत करावयास पाहिजे ते करावयाचे सोडून पोलिसांच्या मागे लागतात. पोलीसच त्यामध्ये आरोपी आहेत, पोलीसच त्यांना पाठीशी घालतात अशी चर्चा सर्व समाजामध्ये होत राहते.

सातत्याने असा प्रश्न येतो की, दलित, मागासवर्गीय माणसांवर अन्याय का होतो ? खरे म्हणजे आपण सर्वांनी या गोष्टीचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. हा अन्याय होत असेल तर त्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे. या दलित, मागासवर्गीयांवर अन्याय होण्यामागे त्यांची आर्थिक परिस्थिती कारणीभूत आहे का, सामाजिक स्थिती कारणीभूत आहे का ? जर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ॲड. जयदेव गायकवाड ....

आर्थिक परिस्थिती कारणीभूत असेल तर त्याचा आपण विचार केला पाहिजे. अशा प्रकारे जे दीनदलित आहेत त्यांच्यावर कोणी दिवसाढवळ्या अन्याय करीत असतील तर त्या अवस्थेबद्दल आपल्याला विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी की, ज्या पध्दतीची समाज व्यवस्था आहे त्यामध्ये जातीमधून निर्माण होणारा जो व्देष असेल, त्या विव्देषमूलक भावनेतून अन्याय होत आहे का, याच्या देखील खोलामध्ये जाऊन पाहिले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये आणि संपूर्ण देशभर खैरलांजीसारख्या घटनेने आपल्याला विचार करावयास लावले. त्यामध्ये माझ्या सारख्याला प्रश्न पडतो की, दलितांचे संरक्षण करण्यासाठी तसेच जातीपातीचे व्यवहार होऊ नये म्हणून ॲट्रॉसिटी ॲक्ट सारखे कायदे आपण निर्माण केले. परंतु त्यातून काय झाले ? मला तर अलीकडे असे पहावयास मिळते की, त्यामुळे उलट दलितांवर जास्त अन्यास होऊ लागले. खैरलांजीमध्ये असेच झाले. श्री. सिध्दार्थ गजभीये यांनी ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा नोंदविला. त्यामध्ये त्या बाईने साक्ष दिली आणि त्यामुळे 8 लोकांना अटक झाली. त्यांना अटक झाल्यानंतर संपूर्ण गाव त्या कुटुंबावर चालून केला आणि त्यांनी चार माणसे दिवसाढवळ्या ठार मारली.

सभापती महोदय, ही जी घटना आहे, त्या घटनेच्या मुलभूत खोलात गेल्यानंतर आपल्याला पहावयास मिळते की, ज्या ॲट्रॉसिटी ॲक्टने या देशातील जातीव्यवस्थेला लगाम घालावयास पाहिजे, त्या ठिकाणी व्देष निर्माण होणार नाही हे पाहिले पाहिजे तसे न होता उलटच झाले. जातीवाद झाला म्हणून तक्रार केल्यानंतर संपूर्ण गाव त्या कुटुंबावर चालून गेला आणि चार माणसे ठार मारली. हा कायदा या समाजाचे संरक्षण करतो का असा प्रश्न निर्माण होतो. हा कायदा समाजाचे संरक्षण का करीत नाही, त्या समाजाला किंवा त्या संपूर्ण गावाला एवढा राग येण्याचे काय कारण आहे, या सर्व गोष्टींची अतिशय मूलभूत अशी चर्चा आणि विचार होण्याची गरज आहे. परंतु अशी चर्चा होताना पहावयास मिळत नाही. मग घटनाक्रमाप्रमाणे जो काही गुन्ह्याचा तपास होतो आणि नंतर ज्या काही शिक्षा होतात, जे काही निकाल लागतात त्यावर देखील आपण असमाधानी असतो. आपल्याला अनेक गोष्टी पटत नाही हे खैरलांजीच्या संदर्भात आपल्याला पहावयास मिळते.

...3...

RDB/ D/ KTG/

ॲड. जयदेव गायकवाड .....

हे जे गुन्हे आहेत त्यांच्या संदर्भात मला असे सांगावेसे वाटते की, सरकार कितीही पुरोगामी असले तरी प्रशासनाने देखील त्यांच्या हातात हात घालून तेवढ्या तडफेने काम करण्याची गरज आहे. मला नेहमी पहावयास मिळते की, कधी कधी प्रशासनाच्या चुका होतात, मग पोलीस यंत्रणा असेल, शिक्षण क्षेत्रातील यंत्रणा असेल आणि अन्य विषयातील यंत्रणा असेल, प्रशासनाने व्यवस्थित काम केले नाही तर त्याचे सर्व आरोप किंवा त्याची सर्व जबाबदारी राज्यकर्त्यांवर येऊन पडते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

सार्वजनिक चळवळीतील हा अनुभव आहे. कोणत्याही माणसावर अन्याय झाल्यानंतर तो जर पोलीस स्टेशनमध्ये गेला तर तेथे असलेल्या पोलिसांकडून त्याची तक्रार तडफेने नोंदवून घेतली जात नाही. त्यामुळे तो माणूस हताश होतो. हे असे का होते ? वर्षानुवर्षे या तक्रारींबाबत आम्ही ऐकत आलो आहे. पोलिसांकडे गुन्हा नोंदविण्यासाठी गेलो तर गुन्हा नोंदविला जात नाही. हरविलेल्या मुलीसाठीची तक्रार असेल किंवा दोघांमध्ये झालेले भांडण असेल, परंतु दुबळ्या माणसांची तक्रार नोंदवून घेतली जात नाही. त्यामुळे ही प्रशासकीय यंत्रणा तक्रारींबाबत संवेदनशील का होत नाही ? यासंबंधी मूलभूत विचार केला पाहिजे.

अनेक ठिकाणी सातत्याने गुन्हे घडत असतात. त्याचे पहिले कारण असे आहे की, आरोपी निर्दोष सुटत असतात. आरोपीने दिवसा ढवळ्या गुन्हा केलेला असतो. परंतु त्या गुन्ह्यातील साक्षीदार पुढे येत नोहीत. दिवसा ढवळ्या घटना घडलेली असते, सर्वसामान्य लोकांना माहीत असते परंतु गुन्हेगार सुटलेले असतात. ही जी पोलीस यंत्रणा आहे, प्रशासकीय यंत्रणा आहे त्यांनी यामध्ये लक्ष घातले पाहिजे. त्यामुळे गुन्हेगारांच्या मुसक्या बांधल्या तर पुन्हा तेथे तशा प्रकारचा गुन्हा घडू शकेल असे मला वाटत नाही. ही यंत्रणा अधिक सक्षम, अधिक संवेदनशील व कोणत्याही प्रकारचा भेदभाव वा फरक न करता समान न्याय देणारी, सेक्युलर यंत्रणा असावयास पाहिजे. हिंदू व मुस्लीम असा फरक करता येणार नाही. हे राज्य सेक्युलर राज्य आहे. कायद्यासमोर सर्व समान आहेत अशा पध्दतीने सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळाले पाहिजे व न्याय मिळाला पाहिजे एवढेच सांगून मी या ठिकाणी थांबतो.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सभागृहात अत्यंत महत्वाच्या व जिव्हाळ्याच्या विषयावर नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी व चर्चा उपस्थित करणाऱ्या सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, लव्ह, जिहाद हा विषय आपल्यासमोर आलेला आहे. या विषयाबाबत मी अभ्यास केला आहे. केरळमध्ये हा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरु होता. त्या ठिकाणी इंजिनिअरिंग झालेली, पोस्ट ग्रॅज्यूएट झालेली किंवा एमबीए झालेली मुलगी असो अशा मुलींची फसवणूक करुन प्रेमाचे नाटक करावयाचे, तिच्याबरोबर निकाह करावयाचा, सहा महिने तिच्याबरोबर रहावयाचे, त्यानंतर तिला तू आत्महत्या कर किंवा घरा बाहेर जा असे सांगावयाचे, अनेक साक्षीदार मुलींनी असा जबाब दिल्याचे मी स्वत: ऐकलेले आहे. असे प्रकार महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी सुरु आहेत. मुस्लीम मुलांना असे सांगितले जाते की, जी चांगल्या घरातील मुलगी असेल, मग हिंदू असली तरी तिला पळवून न्यावयाचे. तिच्यावर बलात्कार करुन तिचा खून करावयाचा किंवा तिच्या बरोबर लग्न करुन तिला सोडून द्यावयाचे. लव्ह जिहादच्या माध्यमातून असे प्रकार सुरु आहेत. त्यामुळे माझी अशी मागणी आहे की, पोलिसांना मुक्तपणे त्यांचे काम करु द्यावे. त्यांना राजकीय दबावाखाली काम करण्यास लागू नये. आपले पोलीस सक्षम आहेत. परंतु केवळ राजकीय दबावामुळे ते काम करीत नाहीत. त्यांना मुक्तपणे काम करण्याची संधी द्यावी.

आज गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या कारवाया कमी झाल्याचे दिसत आहे. परंतु ही वादळा पूर्वीची शांतता आहे की काय, अशी भीती माझ्या मनाला वाटत आहे. कारण गडचिरोली हा जिल्हा आजही धगधगत आहे. त्याचा कधी स्फोट होईल ते सांगता येत नाही. तेथील कोणतीही निवडणूक मुक्त वातावरणात होत नाही. आदिवासींमध्ये निवडणुकीला उभे राहण्याची ताकद नाही. जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचायत समितीचे सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच यांनी मोठ्या प्रमाणात राजीनामे दिलेले आहेत. त्या भागात आमदार सुध्दा राहत नाहीत. तेथून निवडून आलेले आमदार गडचिरोली शहरामध्ये स्वत:च्या संरक्षणासाठी राहत आहेत. सर्व लोकप्रतिनिधींना मुक्त वातावरणात वावरता यावे. लोकशाही पध्दतीने तेथील कारभार सुरु रहावा अशी मी मागणी करते.

3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस......

सभापती महोदय, भंडारा जिल्ह्यातील तीन बहिणींच्या मृत्यूचा विषय पोलिसांच्या दुर्लक्षामुळे व राजकारणामुळे पूर्णपणे संपलेला आहे. यासंबंधी सभागृहात झालेल्या चर्चेला मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले की, त्या मुली खेळखेळता विहिरीत पडल्या आहेत. त्या मुली खेळताखेळता विहिरीत पडल्या असे संपूर्ण जगाला सांगितले तरी त्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

कारण दोन कि.मी.वर ती विहीर आहे. मुख्य रस्त्यापासून ती विहीर कमीत कमी 1 कि.मी. आतमध्ये आहे. तेथे शेती आहे आणि त्या विहिरीला कठडा आहे. अशा पध्दतीने पोलिसांनी खोटे सांगून पाप झाकण्याचे काम कृपा करुन करु नये. पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करीत आहेत हा खरा प्रश्न आहे. त्या मुलींच्या मृत्यूला न्याय द्यावा अशी या ठिकाणी मी पुनश्च विनंती करते.

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयातील तिरोडा येथे 5.3.2013 रोजी सार्वजनिक नळावर रहिना बेगम आणि जिनसा या दोन महिलांचे भांडण झाले. आरोपीने महिलेच्या डोक्यावर वीट मारली. ती महिला जखमी झाली. या घटनेबाबत त्या महिलेची सून पोलीस स्टेशनला तक्रार करण्यास गेली त्यावेळी तिची तक्रार नोंदवून घेण्यात आली नाही. ती महिला दवाखान्यामध्ये गेली परंतु दुखापत गंभीर झाल्यामुळे तिला शहरातील हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. एक गरीब महिला तिला झालेल्या जखमाबाबत तक्रार करण्यास पोलीस स्टेशनला गेलेली असताना पोलिसांनी तिची तक्रार नोंदवून घेतली नाही ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे.

सभापती महोदय, आझाद मैदानावर रझा अकादमीने मोर्चा काढला. त्या मोर्चाच्या वेळी काही समाजकंटकांनी महिला पोलिसांचा विनंयभंग केला. त्यांना वाईट पध्दतीने त्रास देण्याचा प्रयत्न केला. त्या समाजकंटाकावर काय कारवाई करण्यात आली ? एखाद्या गरीब माणसाने एखादी थापड मारली असेल तर त्याला पोलीस कोठडीत डांबून ठेवले जाते, एखादे साधे भांडण झाले तरी त्याबाबतीत पोलीस कारवाई करतात. मग एवढया मोठया प्रमाणावर अल्पसंख्याकाच्या मोर्चाने महिला पोलिसांवर अत्याचार केला असताना तो गुन्हा होऊ शकत नाही काय ? ही महिला या पध्दतीची, ती महिला त्या पध्दतीची अशा पध्दतीने तुम्ही महिलांचे वर्गीकरण करणार आहात काय ? त्या महिलेने स्वत:च्या भावना कवितेतून मांडल्यानंतर तिला त्याबाबतीत माफी मागायला लावण्याचे मोठे पाप या राज्य सरकारने केलेले आहे. का म्हणून तिने माफी मागावी ? अशा पध्दतीने तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करायचा असेल तर या राज्यात कधीही सुरक्षितता मिळणार नाही. पोलिसांवर काम करताना दबाव आणला, त्यांना काम करताना अडविले तर राज्यात असे प्रकार होत रहातील आणि मस्तवाल लोक कुणाच्याही घरात घुसून अत्याचार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

करायला मागेपुढे पाहणार नाहीत. या मस्तवाल लोकांना आजच दाबण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, धुळयाची दंगल असो अथवा ओवेसीचे दहशतवादी भाषण असो, रझा अकादकमीचे महिला पोलिसांवरील अत्याचार असोत, केवळ तुमच्या राजकीय मताचा जोगवा मागण्यासाठी तुम्ही पोलिसांचा वापर करीत असाल तर ते मोठे पाप आहे. ते कृपा करुन न करता पोलिसांना राजकीय दबावापासून मुक्त करा. आजही आम्हाला असा विश्वास आहे की आमचे पोलीस हे फार चांगले काम करु शकतात. परंतु त्यांच्यावर राजकीय दबाव असता कामा नये.

सभापती महोदय, मी परवा नाशिकला गेले होते. त्या ठिकाणच्या एका बिल्डरने 350 शेतक-यांच्या जमिनी स्वत:च्या नावावर करुन घेतल्या. शेतक-यांना याबाबतीत काहीच माहिती नाही. त्या बिल्डरने 30-30 वर्षापूर्वी मृत पावलेल्या लोकांच्या देखील खोट्या सह्या करुन घेतलेल्या आहेत. या प्रकरणी शेतक-यांनी कोर्टामध्ये केस दाखल केली. शेतक-यांनी कोर्टात केस दाखल केली म्हणून या बिल्डरने पोलिसांना हाताशी धरले. तुकाराम राणू गवळी, त्र्यंबक राणू गवळी आणि दत्तू राणू गवळी या तीन भावांना अटक करुन तीन दिवस जेलमध्ये ठेवले. त्यामधील एक 70 वर्षाचा आहे तर एक आंधळा आणि एक अपंग आहे. हे लोक बिल्डरकडे खंडणी मागतात म्हणून त्यांना पोलिसांनी अटक केली. 70 वर्षाचे गृहस्थ, आंधळे-पांगळे हे जर बिल्डरकडे खंडणी मागण्यासाठी गेले तर बिल्डर त्यांना जिवंत सोडणार आहे काय ? पोलीस त्या शेतक-यांना असे सांगतात की तुम्ही त्या बिल्डरशी जमवून घ्या, नाही तर आम्ही तुम्हाला शिक्षा करु. अशा त-हेने पोलीस बिल्डरच्या हाताखाली काम करीत असतील तर समाजातील सर्वसामान्य माणसाने कुणाकडे न्याय मागतील ?

सभापती महोदय, असेच एक प्रकरण मी आपल्या निदर्शनास आणत आहे. तीन दिवसापूर्वी नवनाथ भास्कर काळे या शेतक-याने मला सांगितले की त्याच्यासहीत त्याच्या बायको आणि मुलीवर केस करुन कुठल्याही क्षणी तुम्हाला अटक करु असे पोलिसांनी सांगितले. अटक करण्याचे कारण काय तर या कुटुंबाने बिल्डरला जीवे मारण्याची धमकी दिली. बिल्डरच्या हाताखाली पोलीस काम करीत आहेत काय, बिल्डरसाठी पोलीस काम करीत आहे काय, या सर्व गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता आहे. अशा पध्दतीने जर पोलीस स्टेशन चालत असेल तर समाजातील कोणतीही सर्वसामान्य महिला, कोणताही सर्वसामान्य माणूस सुरक्षित राहाणार नाही. केवळ

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राजकीय दबावाखाली पोलीस स्टेशन चालत असेल तर या पोलीस स्टेशनचा लिलाव झालेला आहे असेच आम्हाला म्हणावे लागेल आणि या समाजाला केवळ ईश्वरच वाचवू शकेल असे सांगून मी माझे दोन शब्द संपविते.

---

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त ) : सभापती महोदय,सन्माननीय माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 260 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे, अतिशय महत्वाची आहे. सोनसाखळी चोरी, अपहरण, खून दंगली, दहशतवादी हल्ले मग ती धुळे शहरातील दंगल असो, आंध्र प्रदेशातील ओवेसी यांची प्रक्षोभक भाषणे असो, ओवेसी यांनी ध्वनीमुद्रीत केलेला मॅसेज असो, सदरहू मॅसेज विशिष्ट समाजातील लोकांना पाठवून त्यांच्या भावना भडकविणे, चिथावणीखोर भाषणे करणे, इत्यादी सर्व बाबींचा या प्रस्तावात उल्लेख केलेला आहे. या ज्या गोष्टी केल्या जातात, त्याबाबतीत शासनाने निश्चितच कारवाई केली पाहिजे असे माझ ो स्पष्ट मत आहे. मला आठवते या गोष्टी या राज्यात अनेक वर्षांपासून सुरु आहेत. आम्ही मध्यमवर्गीय, चाकरमानी या दंग्यांचे शिकार होतो आहे. दंगलीची झळ मुंबई शहराला फार मोठया प्रमाणात बसलेली आहे. परंतु महाराष्ट्रातील वातावरण खराब न होऊ देणे ही गृह विभागाची अत्यंत महत्वाची जबाबदारी आहे. आज या चिथावणीखोर भाषणांचे आणि दंगलीचे स्वॉफ्ट टार्गेट हे महिला आणि लहान मुले असतात. आपण गेल्या अनेक वर्षाच्या इतिहासातून शिकलो आहोत. बाबरी मशीद तोडल्यानंतर मुंबई शहरात बॉम्बस्फोट झाले, तेव्हापासून मुंबई शहरात बॉम्बफोटाची मालिका सुरु झ ाली आहे, ती आजपर्यंत थांबण्याचे नाव घेत नाही. जे चिथावणीखोर भाषणे करणारे असतात, ते मोठे होतात.नेते मंडळी बाजूला राहतात, परंतु यामध्ये सर्वसामान्य माणसे शिकार होतात. अशा प्रकारची भाषणे करणाऱ्या ज्या व्यक्ती आहेत, मग त्या कोणत्याही धर्माचे असो, ज्यांना मोठे व्हावयाचे असते त्या व्यक्ती अशा प्रकारची भाषण करीत असतात. मला वाटते की, ज्या व्यक्त्तीस मोठा नेता बनावयाचे असते, त्याला जातीचे, धर्माचे कसलेही बंधन नसते. त्याला फक्त मोठे होणे एवढेच त्याच्यासमोर लक्ष्य असते. आपले लक्ष्य साध्य करण्यासाठी त्याचा प्रयत्न असतो. महाराष्ट्रात गेल्या चाळीस वर्षापासून परंपरा सुरु झालेली आहे की, ती आजपर्यंत थांबत नाही. मी यासंदर्भाल कालचे एक उदाहरणे देणार आहे. काल इंडिया बूल कंपनीच्या लोअर परेल येथील कार्यालयाची तोडफोड करण्यात आली. मला या ठिकाणी गृहखात्याला प्रश्न विचारावयाचा आहे की, काल अमरावती येथे श्री.राज ठाकरे यांनी भाषण केले आणि कालच तेथे जोरदार तोडफोड झाली. आमचे तेथील पोलीस आयुक्त काय करीत आहेत, पोलीस काय करीत आहेत, तेथील पोलीस अधिकारी बांगडया घालून बसले आहेत काय असेही मी म्हणणार नाही. कारण बांगडया

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

भरणारे हात त्यांच्यापेक्षा फार मजबूत आहेत. पुरोगामी महाराष्ट्राला जिजामाता, ताराराणी, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी पासून ते काल परवापर्यंतच्या मृणालताई गोरे, अहिल्याताई रागणेकर असतील अशा प्रकारचे दंगे करणाऱ्यांना आणि चिथावणीखोर भाषणे करणाऱ्यांना वेळेत रोखण्याचे काम या बहादूर महिलांनी केले आहे ही गोष्ट या ठिकाणी स्वाभीमानाने सांगते. परंतु या राज्यात काय चाललेले आहे हे मला कळत नाही. श्री.राज ठाकरे हे कोण मोठे लागून गेले आहेत. ओवेसीची भाषणे मोबईलवर दाखविली जातात. परंतु श्री. राज ठाकरे यांची भाषणे रोज आपल्या विविध चॅनेलवर चार चार तास दाखविली जातात. संपूर्ण महाराष्ट्राचे वातावरण खराब करण्याचे काम स्वत:ला मोठे म्हणवून घेणाऱ्या नेत्यांनी सुरु केलेले आहे. त्याला आपण कोठे तरी थांबविणार आहोत की नाही...(अडथळा)

डॉ.नीलम गोऱ्हे : जी व्यक्ती या सभागृहाची सदस्य नाही त्यांच्या नावाचा उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना करता येणार नाही. तसे श्री. राज ठाकरे यांचा या विषयाशी काय संबंध आहे. त्यांचा या विषयाशी काहीही संबंध नाही. त्यांचे नाव घेऊन सन्माननीय सदस्यांना बोलता येणार नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : ते या सभागृहाचे सदस्य नसले तरी त्यांनी प्रेक्षोभक भाषणे करुन अशा प्रकारचे प्रकार रस्त्यावर सुरु केलेले आहेत. या गोष्टीची नोंद या सर्वोच्च सभागृहाने घेतली पाहिजे. (अडथळा) सभापती महोदय, माझ्या भाषणात कोणीही अडथळा आणू शकत नाही. सभापती महोदय, मला आपले संरक्षण हवे आहे. या सभागृहात मला माझे मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे.

श्री.चंद्रकात पाटील : ओवेसी हे अतिरेकी आहेत...

श्रीमती विद्या चव्हाण : यांना सुध्दा मी अतिरेकीच म्हणेन. स्वत:ला मोठे करण्यासाठी जे अतिरेक करता आहेत. भाषणात वाटेल तसे बोलावयाचे आणि वृत्तपत्राच्या फ्रंट पेजला बातम्या छापून आणावयाच्या....

3...



ABG/ MMP/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 10:55

श्री.चंद्रकांत पाटील : जे या सभागृहाचे सदस्य नाहीत, त्यांच्या बाबतीत आक्षेपाई अशी विधाने केली गेली आहत, ती रेकॉर्डमधून काढून टाकावीत.

**तालिका सभापती** : मी रेकॉर्ड तपासून घेतो आणि त्यात काही आक्षेपाई विधाने आढळून आली तरी ती रेकॉर्डमधून वगळयात येतील.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, 1993 मध्ये मुंबईमध्ये जातीय दंगल झाली. त्या घटनेचा मुंबईशी काही संबंध नव्हता. काल इंडिया बुल्स कंपनीच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आली..........(अडथळा)......मला बोलण्याचे स्वातंत्र्य आहे. त्याबद्दल तुम्हाला आक्षेप घेता येणार नाही. इंडिया बुल्स कंपनीच्या कार्यालयावर काल हल्ला झाला त्या घटनेचा निषेध केला पाहिजे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या सभागृहाची अशी परंपरा आहे की, भाषण करीत असताना माननीय सदस्यांकडून जे या सभागृहाचे सदस्य नाहीत त्यांच्या नावाचा उल्लेख केला जाऊ नये. त्यांच्याबद्दल काही मत व्यक्त करावयाचे असेल तर घटनेचा संदर्भ देता येईल. माननीय सदस्या वारंवार ज्यांच्या नावाचा उल्लेख करीत आहेत ते या सभागृहाचे सदस्य नाहीत. आपण माननीय सदस्यांना याबाबत समज द्यावी.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर बोलत असताना भाषणाच्या ओघात उदाहरण म्हणून ज्यांच्या नावाचा उल्लेख केला त्यांच्याबद्दल त्यांनी आरोप केलेला नाही. या सभागृहात सदस्य नसलेल्या व्यक्तींच्या नावाचा उल्लेख झाल्याबाबतचे अनेक दाखले देता येतील. आरोप करावयाचा असेल तर नोटीस देऊन नाव घेणे आवश्यक असते हे मला मान्य आहे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, श्री.भाई गिरकर यांना राज ठाकरे यांचा पुळका केव्हापासून येऊ लागला?

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी राज ठाकरे हे अतिरेकी आहेत असा उल्लेख केला आहे, तो उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकावा अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : आक्षेपार्ह उल्लेख रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला बोलण्याचा अधिकार आहे. माझा सांगण्याचा उद्देश हा आहे की, चिथावणीखोर भाषणातून जे दंगे होतात, जे अत्याचार होतात, ज्या सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान केले जाते, बसेसची तोडफोड केली जाते, सर्वसामान्य गरीब माणसे जखमी होतात, ज्यांच्या मालमत्तांचे नुकसान होते ते कोणी चिथावणीखोर भाषणे देणारे नेते नसतात. दंग्यामध्ये नेत्यांच्या घरातील कोणी मृत होत नाही. सर्वसामान्य रस्त्यावरील माणसे.....

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.........

दंग्यामध्ये बळी पडतात. ओवेसी असो की आणखी कोणी नेता असो, पोलिसांनी चिथावणीखोर भाषण करणाऱ्यांविरुध्द कारवाई केली पाहिजे. गेली 30-40 वर्षे या महाराष्ट्रात जी घाणेरडी पध्दत सुरु झालेली आहे, या संदर्भात गृह विभाग दखल घेणार आहे की नाही?

सभापती महोदय, सोनसाखळी चोरणाऱ्या, उपाशी पोटासाठी चोरी करणाऱ्यांना पोलीस त्वरेने पकडतात. छोट्या गुन्हेगारांना पकडायचे, मोठया गुन्हेगारांना वाटेल करायला लागले तरी ते करु द्यायचे आणि आम्ही महाराष्ट्राच्या गृहखात्याला जबाबदार धरायचे नाही हे चुकीचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्या आपल्या भाषणात असे म्हणाल्या की, सोनसाखळी चोरणाऱ्यांना आणि उपाशी पोटासाठी चोरी करणाऱ्या छोट्या गुन्हेगारांना पोलीस पकडतात. म्हणजे अशा गुन्हेगारांना पोलिसांनी पकडायचे नाही असे माननीय सदस्यांना म्हणावयाचे आहे का?

श्रीमती विद्या चव्हाण : माझे म्हणणे असे आहे की, गरीब माणूस आपल्या पोटासाठी चोरी करतो, त्याला पोलीस लगेच अटक करतात, त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदवितात.

नंतर एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

मला बोलण्याचा अधिकार आहे. या ठिकाणी मी अतिरेक्यांच्या संदर्भात विचार मांडत आहे. अतिरेकी विचाराच्या माणसांना कोणत्याही प्रकारचा धर्म नसतो. लोकांची डोकी, लोकांच्या भावना भडकवण्याचे काम हे लोक करीत असतात. त्यामुळे अशा नेत्यांवर गृहखाते काय कारवाई करणार आहे, याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणातून द्यावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

----

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी आपल्या भाषणाच्या ओघात पोलीस कमिशनरांनी "बांगडया वगैरे भरल्या आहेत" असा जो शब्द वापरलेला आहे तो कामकाजातून काढून टाकावा, अशी विनंती आहे.

----------------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला असून त्यांनी कायदा व सुव्यवस्थेची जी काही लक्तरे मांडली आहेत त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या प्रत्येक महत्वाच्या विषयावर मी विचार मांडणार आहे. सोनसाखळी, मंगळसूत्र चोऱ्या हा मुंबईतला तेजीचा व्यवसाय झालेला आहे. एक मंगळसूत्र चोरले की, साधारणत: 60 ते 70 हजार रुपये मिळतात त्यामुळे मुंबईमध्ये अशा चोऱ्यांचे प्रमाण सर्रास वाढले आहे. एकदा मंगळसूत्र किंवा सोनसाखळीची चोरी झाली की, आपल्याला ते परत मिळणार नाही, असा लोकांचा समज झालेला आहे. आपण पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर त्या ठिकाणी एक तक्ता लावलेला असतो व त्यावर प्रत्येक गुन्हयांची नोंद केलेली असते. सोनसाखळीचे किती गुन्हे झाले, किती पकडले, खून किती झाले, उघड किती झाले या सर्वांची माहिती दिलेली असते. परंतु मंगळसूत्र किंवा सोनसाखळी या चोरीच्या बाबतीत गुन्हे शोधण्याचे प्रमाण अतिशय अल्प आहे. हे गुन्हेगार कोण आहेत, याची माहिती पोलिसांना असते. मध्यमवर्गीयांच्या घरामध्ये चोरी झाल्यानंतर त्या घरातील महिला बाहेर पडण्यास धजावत नाही अशी परिस्थिती आहे. मंगळसूत्र किंवा सोनसाखळीच्या संदर्भात मोटर सायकलवरुन दोन मुले येतात, मंगळसूत्र किंवा सोनसाखळी खेचून निघून जातात व ते मिळत नाही. मंगळसूत्र चोरीच्या संदर्भात संपूर्ण राज्यात महिलांमध्ये अशाच प्रकारची दहशत निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, मंगळसूत्र किंवा सोनसाखळी चोरांना पोलीस का शोधू शकत नाही ? हे चोर कोण आहेत, याची माहिती पोलिसांना नाही असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरेल. हे चोर कोण आहेत याची सर्व माहिती पोलिसांना आहे. अशा प्रकारे मंगळसूत्र किंवा सोनसाखळी विकत घेणारे लोक कोण आहेत, याची देखील माहिती पोलिसांना आहे. जे मारवाडी किंवा सोनार अशा प्रकारचे सोने विकत घेतात त्यांची यादी पोलिसांकडे आहे. या मारवाडयांना, सोनारांना व्यवस्थित चाप लावले तर सर्व सोने परत मिळू शकते. पोलीस स्टेशनमध्ये रोज जाऊन तक्रार केली तर अशा लोकांना त्यांचे सोने मिळते.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब........

सभापती महोदय, मंगळसूत्र किंवा सोनसाखळी चोरणे हा आता एक मोठा धंदा झाला आहे. ज्यावेळेस मी या संदर्भात अभ्यास केला तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, मुंबईमध्ये मोठया प्रमाणात बाईक रेसींग लावल्या जातात. वरळी सी लिंक, नरिमन पॉईंट, कॉर्टर रोड, खेरवाडी नाका या ठिकाणी मोठया प्रमाणात बाईकच्या रेसेस लावल्या जातात. यासंदर्भात मी ॲडिशनल सीपी यांच्याकडे शिष्टमंडळ घेऊन गेलो होतो. त्या ठिकाणी दोन दिवस पोलिसांनी पहारा दिल्यामुळे 250 बाईक्स पकडल्या. या 250 बाईक्स पैकी 100 ते 150 बाईक्सचे मालक त्या नेण्यासाठी आलेच नाहीत. यामुळे त्या अद्याप पडून आहेत. कायद्यामध्ये यासंदर्भात तरतूद नसल्यामुळे पोलीस काही करु शकत नाहीत. रेस लावणारी मुले ही गॅरेजमध्ये काम करणारी आहेत. तसेच या रेसमध्ये मध्यमवर्गीयांची तसेच चांगल्या घरातील मुले सुध्दा हळूहळू जात आहे. अय्याशी करण्यासाठी लागणारा पैसा मिळवण्यासाठीचे सोपे साधन म्हणजे मंगळसूत्र किंवा सोनसाखळी चोरणे हे आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

मी कित्येक वस्त्यांमधील मुलांची नावे पोलिसांना दिली असून ही मुले कोण आहेत, काय करतात ते तपासण्यात यावे असे सांगितले आहे. परंतु, त्याकडे पोलीस लक्षच देत नाही. आम्ही जे सांगतो, त्याकडे पोलीस गांभीर्याने बघत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे प्रमाण प्रचंड वाढत चालले आहे हे दुर्दैवाने येथे सांगावेसे वाटते. ज्यावेळी आम्ही मुंबईच्या संबंधातील गोष्टी सभागृहात उपस्थित करतो त्यावेळी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे सभागृहात उपस्थित नसतात. ते पहिले भाषण ऐकल्यानंतर निघून जातात हे आम्हाला खेदाने सांगावेसे वाटते. त्यांचे ठरलेले उत्तर असल्यामुळे आम्हाला देखील आमचे विषय बंद करावे लागतात.

सभापती महोदय, मी येथे दंगलीच्या पार्श्वभूमी संबंधातील विषय मांडू इच्छितो. आज मुंबई पुन्हा दंगलीच्या तोंडावर उभी आहे असे मला म्हणावेसे वाटते. सन 1992-93 ची दंगल आम्ही अतिशय जवळून बघितली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी दंगलीमध्ये सर्वसामान्य माणूस भरडला जातो असे सांगितले आहे. त्याचा त्रास सर्वसामान्य माणसाला होतो ही वस्तुस्थिती आहे. दंगलीच्याबाबत आपण या वस्तीवर लक्ष ठेवा, या वस्ती मध्ये काय चालले आहे ते बघा असे आम्ही पोलिसांना सांगून सावध करीत असतो. मुंबईमध्ये भारतनगर, बेहरामपाडा, नवपाडा, बेहरामबाग, इत्यादी ठिकाणी बांगलादेशी प्रचंड प्रमाणावर घुसलेले आहेत. या ठिकाणी तीन माळ्याच्या झोपडपट्ट्या बनल्या आहेत. वरच्या माळ्यावर कोण राहते आहे याची तपासणी करण्याची पोलिसांची हिम्मतच नाही हे मला येथे खेदाने सांगावेसे वाटते. पोलिसांनी तेथे जाऊन पाहणी करावी असे प्रत्येक वेळी त्यांच्या निदर्शनास आणून देत असतो. आज मुंबईमध्ये जे बॉम्ब स्फोट घडविले जातात त्यावेळी याच भागातून आरोपी पकडले जात असल्याचे प्रकर्षाने समोर येते. बेहरामपाड्यामध्ये आरोपी आला, तो तेथे राहिला, त्याने बॉम्ब प्लँटरचे काम केले, बॉम्ब बनवायला मदत केली तेव्हा आजूबाजूच्या लोकांचे पोलिसांना कळविण्याचे कर्तव्यच नाही का? हिंदू वस्तीमध्ये एखादा नवीन माणूस आला की तो ताबडतोब पोलिसांना डिटेक्ट होतो. परंतु, मुस्लीम वस्तीमध्ये कोण येतो, कोण जातो, हे कधीच कळत नाही. आज बांगलादेशी मोठ्या प्रमाणावर मुंबईत घुसलेले आहेत. आपण वांद्रे स्टेशनला लागून असलेल्या तीन माळ्यांच्या झोपडपट्ट्या पहाव्यात. वरच्या दोन माळ्यांवर कोण राहते हे कोणालाच माहीत नाही. बाहेरून येऊन सर्वजण राहत आहेत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

मुंबईत काही दिवसांपूर्वी ईद झाली. मी देखील कायद्याचे पालन करणारा विद्यार्थी आहे. पोलीस आमच्या मिरवणुका रात्री 10.00 वाजता थांबवतात, दादागिरी करतात. यावेळी हिंदू समाजाला ताकद दाखविण्याचे काम ईदच्या मिरवणुकीद्वारे करण्यात आले. रस्ते अडवून मिरवणुका काढण्यात आल्या. मी पोलीस ठाण्याशी संपर्क साधला व त्यांना सांगितले की, साहेब रस्ते अडविले आहेत. त्यावेळी पोलिसांनी काहीच केले नाही. कारण पोलीस हतबल आहेत. अशाने पोलिसांचे मनोधैर्यांचे खच्चीकरण होत आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, दि. 11 ऑगस्ट रोजी आझाद मैदान येथे दंगल झाली. यात आपण 4 हजार आरोपी दाखविले आहेत. आपण किती जणांना पकडले हे मला माहीत नाही. परंतु, आरोपींना पकडण्यासाठी ईद नंतरची वेळ ठरविण्यात आली. ईदच्या आधी काहीही करू नका. आधी काही केले तर गडबड होईल. आमदारांनी पोलीस अधिकाऱ्याला मारल्यानंतर क्राईम ब्रँचचे अधिकारी विधान मंडळामध्ये लगेच आले. पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होऊ नये म्हणून त्या दिवशी पोलीस महासंचालकांनी बैठक घेतली. सगळे आयपीएस अधिकारी एकत्र आले. जेव्हा संपूर्ण पोलीस दलाला झोडपून काढले तेव्हा सगळे आयपीएस अधिकारी एकत्र का आले नाहीत ? मी पोलिसांचा जवळचा मित्र आहे. पोलीस आणि राजकीय पक्षाचा कार्यकर्ता हे रस्त्यावरचे कार्यकर्ते असतात. या दोघांनी एकमेकांच्या हातात हात घालून काम केले पाहिजे असे मी नेहमी म्हणत असतो.

आज पोलिसांचे मनोधैर्य हे सर्वात महत्त्वाचे आहे. आज पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण झालेले आहे. गँगवॉर आता थांबलेले आहेत. पण पोलीस दलातील गँगवॉर कधी थांबणार आहे ? हा माझा खरा प्रश्न आहे. आज पोलिसांमध्येच आपापसात गँगवॉर सुरू आहे. पोलीस दलामध्ये एक काम करणारा तर दुसरा काम न करणारा असे दोन गट आहेत. काम करणारा गट म्हणतो की, मी काम करीत असून काम केल्याची सजा भोगतो आहे. काम न करता तडजोडी केल्या तर मुंबईमध्ये जास्तीत जास्त पैसा कमावू शकतो असे आदर्श निर्माण झाले आहेत. मी नुकताच सकाळी पोलीस ठाण्यामध्ये गेलो होतो. त्यावेळी एक पोलीस अधिकारी मोठ्याने पूजा करत होता. मी त्यांना म्हणालो आपण पोलीस ठाण्यामध्ये पूजा कशी काय करतात ? तेव्हा ते म्हणाले की, धंदेवाले लोक जशी धंद्याची पूजा सकाळी करतात तशी आम्ही सुध्दा सकाळी पूजा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

करतो. रात्री पर्यंत चांगला गल्ला होण्यासाठी पूजा करतो. आम्हाला देखील व्यवस्थित पैसे मिळू दे, बायका मुले सुखी होऊ दे, अशा प्रकारची उत्तरे पोलीस दलातील अधिकाऱ्यांची आम्ही ऐकत आहोत. एका बाजूला पोलीस 180 चौ.फूटाच्या खोलीत रहात आहेत. मीरा रोड, मुलुंड, ठाणे येथून रेल्वेच्या गर्दीतून प्रवाशांच्या अंगाला घासत घासत पोलीस ठाण्यामध्ये येतात. जीवाचे रान करून आरोपींना पकडतात. आरोपीला पकडल्यानंतर का पकडला, का पकडला नाही अशी विचारणा त्यांच्याकडे होते. अशा मन:स्थितीत आज पोलीस काम करीत आहेत. त्यामुळे आज पोलिसांचे मनोधैर्य सावरण्याची गरज आहे. पोलिसांचे मनोधैर्य वाढले तरच त्याची उत्तरे आपोआप आपल्याला मिळू शकतील.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

मुंबई पोलीस दलाचे नाव जगात प्रसिध्द आहे. पोलिसांना मनात आणले तर काय करु शकतात हे मला चांगले माहीत आहे. परंतु आज पोलिसांच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे.. आपण मला खाली बसण्यास सांगत असाल तर मी खाली बसतो. मी पुढे काही बोलत नाही. मी एकाच विषयावर बोलत आहे. आपण मला या विषयावर सविस्तर बोलू द्यावे. मुंबईतील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )**: सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यास आणखी किती वेळ लागेल ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, प्रस्तावामध्ये जे विषय दिलेले आहेत त्यावर मी बोलत आहे. मी अन्य काही बोलत नाही. मला आणखी 20 मिनिटे द्यावेत.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणास 20 मिनिटे मिळणार नाहीत. सन्माननीय सदस्यांचे भाषण सुरु होऊन दहा मिनिटे झाली आहेत. आपणास आणखी पाच मिनिटे मिळतील. शिवसेना पक्षाच्या वतीने आपण शेवटचे बोलणार असाल तर मी आपणास वेळ वाढवून देतो. या विषयावर बोलण्यासाठी अन्य सन्माननीय सदस्यांना देखील संधी मिळाली पाहिजे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, ज्याच्या आशीर्वादाने मुंबईत दंगली झाल्या, बॉम्बस्फोट झाले तो दाऊद पाकिस्तानामध्ये बसून या सर्व गोष्टी करीत आहे. दाऊद पाकिस्तानात असला तरी त्याचे हस्तक दक्षिण मुंबईमध्ये काम करीत आहेत. तेव्हा प्रथम त्यांना ठेचून काढले पाहिजे. दाऊदकडे मुंबई शहरातून पैसा जात आहे आणि त्याच पैशाच्या जोरावर दाऊद मुंबईत बॉम्ब स्फोट घडवून आणत आहे. दाऊदचे मुंबईतील हस्तक कोण आहेत हे पोलिसांना माहीत नाही काय ? या हस्तकांशी कोणत्या तडजोडी होतात हे आम्हाला माहीत नाही काय ? या हस्तकांना ठेचण्याची जबाबदारी कोणाची आहे ? आपणास छोटे-मोठे आरोपी केव्हाही पकडता येतील. परंतु मुंबईतील पैशाच्या जोरावर दाऊद पाकिस्तानात बसून मुंबईत बॉम्बस्फोट घडवून आणत आहे. तेव्हा त्याचे हस्तक, त्याच्याशी संबंधित असलेले बिल्डर्स, बडे उद्योजक यांना प्रथम ठेचून काढले पाहिजे. आपण असे केल्यास आज मुंबईत जो जातीय तणाव निर्माण होतो तो आपोआप कमी होईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

सभापती महोदय, मी अन्य विषयांमध्ये जाणार नाही. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ओवेसीचा विषय मांडला. आज महाराष्ट्रात कन्व्हिक्शचा रेट किती आहे, ज्या पध्दतीने आरोपींना प्रोडयुस केले जाते, ज्या केसेसना उशीर होतो त्यासाठी मी पोलिसांना दोषी धरणार नाही. राज्य शासनाच्या वतीने वकिलांना पोलिसांची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी जी ताकद द्यायला पाहिजे ती दिली जात नाही.जे पोलिसांचे समर्थन न्यायालयात करतात त्यांना अकाऊन्टीबिलीटी नसल्यामुळे आज गुन्ह्यांचे प्रमाण जास्त आहे.

सभापती महोदय, दोन दिवसांनी जर्मन बेकरी बॉम्बस्फोटाचा निकाल आहे. या प्रकरणामध्ये पोलिसांनी प्रचंड मेहनत घेऊन आरोपींना पकडलेले आहे. पोलिसांनी घेतलेल्या परिश्रमाला यश मिळो. जर्मन बेकरी बॉम्बस्फोटातील सर्व आरोपींना शिक्षा होवो, त्यांची निर्दोष सुटका होऊ नये अशी माझी ईश्वराकडे प्रार्थना आहे.

सभापती महोदय, माननीय गृहमंत्री यांनी डान्स बार बंदीची घोषणी केली. त्या बाबत प्रचंड डंका वाजविण्यात आला. परंतु आजही काही ठिकाणी डान्स बार सुरु आहेत. मी आपणास त्या हॉटेल्सची नावे सांगतो. दीपक डोंगरी, डायमंड क्वीन, भायखळा, व्हाईट हाऊस, मेट्रो, टोपाज ग्रांट रोड, क्वीन, लाईव्ह बर्ड,जुहू, नटवर, सूरती, विलास, अंधेरी पूर्व, पायल, दहिसर, सी-क्वीन, गजल अशी कितीतरी हॉटेल्सची नावे सांगता येतील. डान्स बारवर बंदी असताना या हॉटेल्समध्ये डान्स बार सुरु आहेत. एकाबाजूने सरकार डंका वाजवून डान्स बारवर बंदी आहे असे सांगत आहे तर दुसऱ्या बाजूला आजही हॉटेल्समध्ये डान्सबार सुरु आहेत. जर डान्सबार सुरु असेल तर त्या भागातील सिनियर इन्स्पेक्टर आणि डीसीपींना सस्पेंड करण्यात येईल असे माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले होते. तेव्हा आतापर्यत किती पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई झाली, किती अधिकारी सस्पेंड झाले ? पोलीस अधिकारी सस्पेंड व्हावेत अशी आमची इच्छा नाही, परंतु, एका बाजूला डान्स बार बंदीचा डंका वाजविण्यात आल्यानंतर दुसऱ्या बाजूला त्याची अंमलबजावणी होते किंवा कसे हे पाहण्याची गरज आहे.

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

सभापती महोदय, आज ज्या आरोपिंना जामीन मिळतो किंवा जे पॅरोलवर आहेत त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड कोणालाच माहीत नाही. या आरोपींचा ट्रॅक रेकॉर्ड नसल्यामुळे त्यांना पुन्हा पुन्हा गुन्हे करण्याची सवलत दिली जात आहे. ही बाब मी यापूर्वी देखील सभागृहात सांगितलेली आहे. बॉम्बस्फोटातील आरोपी सुटल्यानंतर ते काय करतात याचा ट्रॅक रेकार्ड ठेवला पाहिजे. आमचा एका कार्यकर्ता वर्गणीच्या केसमध्ये सापडला तर

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब.....

तर त्याच्यावर खंडणी केस टाकून, दुसऱ्या दिवशी चॅप्टर केसच्या नावाखाली पोलीस स्टेशनमध्ये उभे केले जाते. महोदय, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना वेगळी वागणूक दिली जाते. परंतु जो आरोपी 302, 307 कलमाखाली सुटतो त्याला पोलीस स्टेशनमध्ये हजेरी लावण्यासाठी बोलाविले जात नाही. अशा प्रकारचा दुजाभाव पोलीस करीत आहे. पोलीस अशा प्रकारचे वर्तन करीत असताना त्यांची दुभंगलेली मानसिकता दिसून येते. त्यांची मानसिकता योग्य प्रकारे सांभाळली नाही तर या पोलीस दलाकडून कोणतीही अपेक्षा करणे शक्य नाही.

महोदय, असेच प्रकार होत राहिल्यास पुढे सुध्दा असेच प्रस्ताव सभागृहात येत राहतील आणि प्रत्येक वेळी आम्ही त्यावर चर्चा करीत राहू. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कठोरतेने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

महोदय, मुंबईच्या बाबतीत कसलाच विचार केला जात नाही. मुंबईकडे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी म्हणून पाहिले जाते. परंतु या कोंबडीचे अंडे घेऊन, कोंबडीला वाऱ्यावर सोडून दिले जाते. अशा प्रकारे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती मुंबईत झाली आहे. महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने बरेच विषय मांडता येतील. परंतु वेळे अभावी पोलीस दलाने भविष्यात चांगले काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून म.वि.प.नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पोलीस हा महाराष्ट्रात नेहमीच वादाचा विषय ठरलेला आहे. पोलिसांकडून चांगल्या गोष्टी घडल्या की त्यांचे कौतुकही होते. परंतु पोलिसांकडून दुर्दैवाने काही घटना अशा घडतात की, ज्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्याबद्दल वेगळ्या प्रकारचा संदेश जातो. परवा आमच्या बीड जिल्ह्यातील कुंभारी गावचे सरपंच श्री.उध्दव सुरवसे यांच्यावर राजरोसपणे वार करुन त्यांचा खून करण्यात आला. ते अतिशय चांगले लोकप्रतिनिधी होते. ते रस्त्यावरुन जात असताना मागून एका गाडीने त्यांना धडक दिली व त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात वार केले. परंतु अजूनपर्यंत या घटनेतील आरोपी पकडण्यात आलेले नाहीत. या बाबत शासनाने गंभीरपणे नोंद घ्यावी. अशा घटनांमुळे ग्रामीण भागात जो संदेश जातो तो चुकीचा आहे.

महोदय, पोलिसांच्या हातून चांगले काम होत असेल तर उदार अंत:करणाने त्यांचे कौतुक करण्याची भूमिका सभागृहातील सन्माननीय सदस्य व महाराष्ट्रातील जनता दाखविते. या निमित्ताने मी माननीय गृह मंत्री आणि गृह राज्य मंत्र्यांना विनंती करणार आहे की, महाराष्ट्रातील पोलिसांना मानसिक धडे देणारे संस्कार वर्ग सुरु करण्याची गरज आहे. सामान्य माणूस तक्रार नोंदविण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर त्याला पोलिसांकडून जी वागणूक मिळते ती निश्चितच स्पृहणीय नाही. सामान्य माणूस सोडून द्या. लोकप्रतिनिधी किंवा आमदारांना ज्या प्रकारे वागणूक मिळते ती महाराष्ट्रात चुकीचा संदेश देणारी आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, मध्यंतरी आमदार श्री. हर्षवर्धन जाधव माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्याचा प्रयत्न करु लागले, त्यांच्या ताफ्यामध्ये आपली गाडी घालण्याचा प्रयत्न करु लागले त्यानंतर त्यांना जी अमानुषपणे मारहाण करण्यात आली त्यामुळे तीन महिने ते रस्त्यावरुन चालू शकत नव्हते. कदाचित इंग्रजांच्या काळामध्ये सुध्दा अशा प्रकारची अमानुष मारहाण झाली नसेल. त्यांना आपण काय न्याय देऊ शकलो ? आपण नेहमी सांगत असतो की, पोलिसांचे मनोधैर्य वाढवावयाचे आहे. पण महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करावयाचे आहे का ? आज कोणताही लोकप्रतिनिधी पोलीस स्टेशनमध्ये जाताना दहा वेळा विचार करतो. सामान्य माणसाचे काम घेऊन जर आपण पोलीस स्टेशनमध्ये गेलो तर कदाचित त्याच्या समोरच आपल्याला अपमानास्पद वागणूक मिळेल की काय अशी भीती आज लोकप्रतिनिधींच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, त्यावेळी माननीय गृह मंत्र्यांनी विधानसभेमध्ये घोषणा केली होती की, त्या संबंधित अधिकाऱ्यावर 307 कलमान्वये खटला दाखल करु. ज्यांनी आमदार श्री. हर्षवर्धन जाधव यांना मारले त्यांच्यावर 307 कलमान्वये खटला दाखल झाला. त्यांना निलंबित केले. 307 अन्वये दाखल केलेल्या खटल्याची पुढची चौकशी केली का ? माझी अशी माहिती आहे की, ज्या ज्या अधिकाऱ्यांनी आमदार श्री. हर्षवर्धन जाधव यांना मारले ते सर्व अधिकारी आज प्रमोशनने वरच्या पदावर गेलेले आहेत. मग यातून आपण महाराष्ट्राला काय संदेश देत आहोत ? यापुढे आमदाराने कोणत्याही सामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न करावयाचा नाही का ? कोणताही आमदार माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी जाण्याचा प्रयत्न करीत असता जर व्यत्यय आला तर तो दूर करण्याचा प्रयत्न करावयाचा नाही का ?

सभापती महोदय, या निमित्ताने महाराष्ट्रासमोर गंभीर प्रश्न उभे आहेत. परवा जी घटना घडली, जे तथाकथित मारहाण प्रकरण घडले त्यामध्ये गांभीर्याने विचार करण्यासारखा मुद्दा आहे. त्या पोलीस अधिकाऱ्याच्या समक्ष आमदार त्यांना विनंती करीत होते. पोलीस अधिकाऱ्याला माहीत होते की, याचे शुटींग चालू आहे तरीही संबंधित अधिकारी उद्धटपणे आमदारांशी वागत होता. कदाचित त्याचे शुटींग होत नसते तर त्या आमदारांना मारहाण सुध्दा झाली असती. पण दुर्भाग्याने

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

प्रा. सुरेश नवले ....

आजपर्यंत त्या पोलीस अधिकाऱ्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. पहिला प्रसंग घडला त्यानंतर दुसरा प्रसंग घडला आणि त्यानंतर मीडियातील चर्चेचा तिसरा प्रसंग घडला. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींच्या मनोधैर्याचे खच्चीकरण झालेले आहे. हा महाराष्ट्रातील सार्वभौमतेचा प्रश्न आहे. आमच्या माननीय सभापतींना आणि माननीय अध्यक्षांना न विचारता पोलीस विधिमंडळामध्ये प्रवेश करतात, हे लोकशाहीला भूषणावह नाही. ही आपल्या अधिकारावर गदा आहे. अशाच प्रकारचे वर्तन जर होत राहिले तर यानंतर महाराष्ट्रामध्ये सामान्य माणसाला न्याय मिळणे दुरापास्त होऊन जाईल. मला माननीय गृह मंत्र्यांना विनंती करावयाची आहे की, जसा आपण पोलिसांना न्याय देता तशाच प्रकारचा न्याय आपण लोकप्रतिनिधींना सुध्दा द्यावा. महाराष्ट्रामध्ये एक चांगला संदेश जाऊ द्या. जे चुकत असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

आमदार श्री. हर्षवर्धन जाधव यांना झालेल्या मारहाणीच्या प्रकरणामध्ये ज्या अधिकाऱ्यावर 307 चा खटला दाखल झाला त्यांच्यावर काय कारवाई केली ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

त्यांना बढती देण्यात आली. त्यांना देण्यात आलेली बढती ही चूक होती असे तरी निदान शासनाने जाहीर करावे. कलम 307 चे आरोपी फरार आहेत काय आणि फरार नसतील तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. परंतु दुर्दैवाने तशी कारवाई झालेली नाही. या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाच्या निदर्शनास एक गोष्ट आणून द्यावयाची आहे की, महाराष्ट्रामध्ये लोकप्रतिनिधींचे राज्य आहे. लोकशाही आहे. जे उद्धट वर्तन करणारे पोलीस असतील, विविध खात्याचे अधिकारी असतील त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. त्याबाबत आदरणीय मंत्र्यांना व पोलीस खात्याला माझी सूचना आहे की, आता पोलिसांना माणुसकीचे धडे शिकविण्यासाठी पोलीस संस्कार शिबीर सुरु करावे. संस्कार शिबिरांची गरज आहे.

एखादा माणूस पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन गेल्यावर शिवीपासूनच त्याची सुरुवात होते. त्यामुळे तो माणूस पळूनच जातो. पोलिसांमध्ये असलेल्या चांगल्या गोष्टी सांगण्यासाठी 4 दिवस विचार करावा लागेल. परंतु त्यांच्यावर टिकाटिप्पणी करावयाची असेल तर सभागृहात दिवसभर बोलता येईल. म्हणून या निमित्ताने राज्य शासनाला माझी विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये विविध माध्यमातून जो चुकीचा संदेश गेलेला आहे त्या संदेशाला मजबूत करण्याचे काम शासनाने करु नये. त्या लोकप्रतिनिधींच्या भावना, जनतेमध्ये लोकप्रतिनिधींबाबत जनतेच्या मनामध्ये असलेली आदराची भावना या सर्व गोष्टींचा विचार करुन शासनाने यामध्ये सुधारण करावी एवढा आग्रह करुन मी येथेच थांबतो.

---------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, कमी वेळेमध्ये केवळ दोन महत्वाचे मुद्दे मी मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी लव्ह जिहादद्वारे समाजामध्ये भीषण स्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे समाजात कशा प्रकारच्या घडत आहेत ते सविस्तरपणे सांगितलेले आहे. त्यामुळे संपूर्ण हिंदू समाज भयभीत झालेला आहे अशा प्रकारची त्यांनी मांडणी केली आहे. त्याच्या खोलामध्ये गेल्यानंतर असे लक्षात येते की, अशा प्रकारचे जे तरुण सापडत आहेत त्यामध्ये मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक आहेत. बांगलादेशी नागरिकांचा विषय या सभागृहात वारंवार उपस्थित करण्यात आलेला आहे. या नागरिकांना शोधून त्यांना त्यांच्या मूळ देशामध्ये परत पाठविण्याची आवश्यकता आहे असे अनेकदा सांगण्यात आले आहे. परंतु त्यांना परत पाठविण्याची प्रक्रिया सोपी नाही असे शासनाकडून सांगितले जाते.

सभापती महोदय, कोल्हापूरमध्ये पोलीस जी घटना घडली आहे त्याबद्दल तेथील पोलिसांचे अभिनंदन केले पाहिजे. दसऱ्याच्या दिवशी 28 बांगलादेशी नागरिकांना शोधून काढण्यात पोलिसांना यश आलेले आहे. या नागरिकांची 4 दिवसात संपूर्ण चौकशी करुन आरोपपत्र दाखल झाले. पोलिसांनी न्यायालयाला या नागरिकांच्या प्रकरणासंबंधी एक दिवसामध्ये सुनावणी होऊन निर्णय द्यावा अशी विनंती केल्यानंतर न्यायालयाने सुध्दा एका दिवसात निकाल दिलेला आहे. त्यामध्ये या बांगलादेशी नागरिकांना 6 महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावून कळंबा येथील जेलमध्ये पाठविण्यात आले. या शिक्षेची मुदत दिनांक 31 मार्च, 2013 रोजी संपत आहे. त्यापूर्वी या बांगलादेशी नागरिकांना त्यांच्या देशात परत पाठविण्यासाठी पोलिसांनी विदेश मंत्रालय, बीएसएफ व रेल्वेशी पत्र व्यवहार केलेला आहे. त्यानुसार कोल्हापूरातील 40 पोलीस या 28 बांगलादेशी नागरिकांना सीमेवर सोडण्यासाठी रेल्वेने जाणार आहेत. संपूर्ण देशामध्ये दीड कोटीची लोकसंख्या असलेल्या बांगलादेशी नागरिकांना शोधून त्यांना परत पाठविण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. परंतु इच्छाशक्ती असेल तर 4 दिवसामध्ये तपास पूर्ण करता येतो आणि न्यायालयाला विनंती केल्यानंतर एका दिवसात निर्णय घेता येतो हे कोल्हापूर पोलिसांनी दाखवून दिलेले आहे. हे 40 पोलीस सीमेच्या पलीकडे जाऊन स्वत:च्या डोळ्यांनी खात्री करुन घेणार आहेत.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

सभापती महोदय, बांगलादेशात प्रचंड गरिबी असल्यामुळे तेथून येणाऱ्या तरुणांना काही मुस्लीम नेते पैशाचे आकर्षण दाखवून हिंदू त्यांच्यातर्फे मुलींना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करीत आहेत. लव्ह जिहादचा विषय चिंतेचा आहे. या जिहादसाठी बांगलादेशी तरुण वर्ग सहज उपलब्ध होत आहे. त्याचा शासनाने विचार केला पाहिजे. मी सभागृहाच्या माध्यमातून सरकारला विनंती करतो की, कोल्हापूरमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.यशवंत कडगे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई झालेली आहे. त्या पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने विशेष पुरस्कार दिला पाहिजे.

सभापती महोदय, कोल्हापूरमध्ये श्रीमती ज्योती प्रज्ञा सिंग नावाच्या पोलीस अधिकारी आल्या होत्या.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

त्यांनी आल्या नंतर अशी घोषणा केली की, मी सर्व पोलीस स्टेशनला एक महिन्याचा कालावधी देणार आहे. या कालावधीत मटक्याचे सर्व धंदे बंद झाले पाहिजेत. ते जर बंद झाले नाहीत तर एक महिन्या नंतर काय करायचे ते मी करीन. अशा प्रकारची सूचना एक महिला पोलीस अधिकारी तिच्या अखत्यारितील पोलीस स्टेशनला देते याचा अर्थ त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर मटक्याचे धंदे चालतात. एक महिन्यानंतर सुध्दा हे मटक्याचे धंदे बंद न झाल्यामुळे त्या धंद्यावर धाडी टाकण्याचे काम सुरु होते. संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिका-याला मटक्याचे धंदे चालू असल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावली जाते. त्या ठिकाणी विजय पाटील नावाचा मटका किंग आहे. त्याला 110 वेळा अटक झाली आणि 90 वेळा तो गुन्ह्यामधून निर्दोष सुटला. या मटका किंग विजय पाटील याने एक पत्रकार परिषद घेतली. त्या पत्रकार परिषदेमध्ये त्याने कोणकोणत्या पोलीस अधिका-यांना चार-पाच हजार पासून ते 4-5 लाख रुपयापर्यंत हप्ते दिले जातात याची यादी वाचून दाखविली. त्याने पुढे असेही सांगितले की, मी हप्ते घेणा-यांची जी नावे सांगितली ती जर खोटी असतील तर त्यांनी माझ्यावर एक महिन्यामध्ये अब्रुनुकसानीचा दावा दाखल करावा. असे सांगितल्या नंतर कोणताही पोलीस अधिकारी अब्रुनुकसानीचा दावा करण्यास पुढे आला नाही. या विजय पाटीलने असेही सांगितले की, माझ्या बरोबर या पोलीस अधिका-यांना देखील सहआरोपी करावे. या विषयावर कोल्हापूरच्या डीएसपीनी सांगितले की, नो कॉमेण्टस्. नावासहीत आणि बक्कल क्रमांक सहीत पोलिसांवर आरोप केलेला असताना, एका महिला पोलीस अधिका-याने संबंधित पोलीस अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली असताना मटका बंद होत नाही, उलट त्या महिला पोलीस अधिका-यांना स्वत: रेड टाकून मटका बंद करावा लागतो. दुसऱ्या बाजूला विजय पाटील नावाचा मटका किंग ज्यांना ज्यांना हप्ते दिलेले आहेत अशा पोलीस अधिका-यांची यादी पत्रकार परिषद घेऊन वाचून दाखवितो. या विजय पाटीलने सांगितलेले खरे असेल तर या सर्व प्रकारासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये खुलासा करावा. तसेच कोल्हापूरच्या पोलिसांनी बांगला देशी नागरिकांना त्यांच्या देशामध्ये पाठविण्याची तत्परतेने जी कारवाई केलेली आहे तशा प्रकारची कारवाई सर्वत्र केली जावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये आणलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे प्रत्येक अधिवेशनामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भातील प्रस्ताव सदनामध्ये येणे, त्यावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भाषणे होणे, त्याला सन्माननी गृहमंत्र्यांनी उत्तर देणे ही एक परंपरा झालेली आहे. आपण जेव्हा या ठरावाकडे बघतो त्यावेळी या ठरावामध्येच वेगवेगळया घडलेल्या घटनांचा मागोवा घेणा-या काही प्रमुख गोष्टी नमूद केलेल्या आहेत. यंत्रणा कुठे कमी पडली, गृहखात्या तर्फे न्याययंत्रणेकडे ज्या पध्दतीने जायला पाहिजे होते त्यापध्दतीने न गेल्यामुळे शिक्षेचे प्रमाण कसे कमी होते, तसेच आजच्या समाजात असलेले वास्तव, वेगवेगळया समस्या, एकूणच कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने आज राज्यात किंवा देशात जे वातावरण आहे ते लक्षत घेता शासनाने कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे. आपण एकीकडे बघतो की धुळयामध्ये दंगल होते, बाहेरच्या राज्यातून कोणीतरी येतात, कोणत्या तरी भाषणाच्या ध्वनिचित्रफिती दाखवून समाजामध्ये अस्वस्थता निर्माण करण्याचे काम केले जाते. त्यावर पोलिसांची कारवाई झाल्यानंतर तो उद्रेक थांबण्याऐवजी समाजमन कलुषित करण्यासाठी, दोन समाजामध्ये कसे अंतर वाढेल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आहेत. जेव्हा जेव्हा अशा प्रकारच्या घटनांनंतर पोलीस कारवाई केली जाते....

... नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

त्यावेळेला या घटनांना पायबंद बसण्याऐवजी त्यासंबंधातील ज्या व्यक्ती असतील त्यांच्याबद्दलचे एक वेगळे वलय त्या त्या समाजामध्ये निर्माण होत जाते. ते झाल्यानंतर परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याऐवजी परिस्थिती आणखीनच चिघळत रहाते.

महोदय,या ठिकाणी मला नेहमी असे वाटते की, एकूण आपल्या राज्याची पोलीस यंत्रणा आहे, त्यातील मनुष्यबळ आहे, त्यांना स्कील्ड डेव्हलपमेंट बरोबरच शिक्षण, प्रशिक्षण, रिफ्रेशर कोर्स देण्याची गरज आहे. हा ॲकेडमीक चर्चेचा विषय आहे असे वाटण्याची शक्यता आहे. परवा पदेशातील माणसाकडून गुन्हा घडला होता. तक्रार नोंदवून घेणारे पोलिस कर्मचारी होते, त्यांना इंग्रजी येत नव्हते. ती परदेशी माणसे काय म्हणत होती हे पोलिसांना कळत नव्हते. नंतर दोन दिवसांनी वृत्तपत्रात बातमी आली, पोलिसांना इंग्रजी भाषचे शिक्षण देण्याची मोहीम गृहखाते हाती घेणार आहे. पोलिसांना इंग्रजी शिकवावयाचे, संगणकाचे प्रशिक्षण द्यावयाचे, सायबर गुन्हयांच्या शोध कसा घ्यावयाचा यासंदर्भात प्रशिक्षण द्यावयाचे. आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शिकवावयाची, पोलिसांना संरक्षणासाठी दिलेली हत्यारे अत्याधुनिक आहेत की नाही, त्यांना ती वापरता येतात की नाही यासाठीची तालीम त्यांना मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे.

महोदय, पोलीस बंदोबस्तासाठी जातात, त्यावेळी त्यांना रस्त्यावर आठ-आठ, दहा-दहा तास उभे रहावे लागते, त्या ठिकाणी त्यांची सोय कोणत्या प्रकारची केली जाते, त्यांना भत्ता किती दिला जातो, पोलिसांना सलग किती तास डयूटी करावी लागते अशा प्रकारचे असंख्य प्रश्न या कायदा व सुव्यवस्थेच्या चर्चेमध्ये गुंतलेले आहेत. त्यातील महत्वाचा भाग असा आहे की, एखाद्या ठिकाणी गुन्हा घडला, त्या गुन्हयाचा आरोपी पकडला, त्यानंतर त्या आरोपीला कोर्टात नेऊन त्याचे विरुध्द आरोप पत्र दाखल केले. त्यानंतर ज्या घटना घडतात, त्या अतिशय विलक्षण गंमतीच्या होतात. जणू काही आपण हिंदी चित्रपट पहाता आहोत की काय असे वाटू लागते. या सगळया यंत्रणांना मॅनेज केले जाते. मग ते वकील असतील, कोणी अधिकारी असतील, त्याचे बरोबर संबंध असणारे लोक असतील, अशा सगळया पध्दतीने या गोष्टी घडतात. अशा घडण्यामधून न्याय तर मिळत नाही. उलट ज्याच्यावर अन्याय झालेला असतो, ज्याच्यावर गंभीर प्रसंग उद्‌भवलेला असतो, अशा माणसाला या सगळया यंत्रणेबद्दल कुठलाही विश्वास रहात नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

महोदय,सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मघाशी उल्ल्ेख केला की, एखाद्याला पूर्वी पोलीस दलामध्ये शिक्षा द्यावयाची म्हटल्यानंतर आपण कित्येक सिनेमा आणि नाटकामध्ये ऐकतो त्याप्रमाणे तुम्ही ऐकत नाही म्हणून त्यांची बदली गडचिरोली येथे करुन टाकतो असे सांगितले जाते. बदली ही शिक्षा म्हणून केली जाते. गडचिरोली हा नक्षलग्रस्त भाग असून तो अतिशय संवेदनशील आहे. त्या ठिकाणी अतिशय चांगले अधिकारी जाण्याची आवश्यकता असताना आपण शिक्षा म्हणून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणूका तेथे होत असतील तर ते योग्य नाही असे मला वाटते. या बाबतीत असेही बोलले जाते की, पोलीस अधिकारी गडचिरोली या अतिसंवेदनशील भागात जाऊन आले होते, अशा प्रकारची नोंद रेकॉर्डमध्ये पाहिजे. या संवेदनशील भागातील बारकावे समजून घेऊन तेथील नागरिकांना आपलेसे करुन, त्यांचा विश्वास संपादन करुन तेथे पोलीस यंत्रणेने काम केले पाहिजे. एखाद्या चांगल्या अधिकाऱ्याची नेमणूक झाल्यानंतर तेथे चांगले वातावरण निर्माण करेपर्यंत त्याची बदली दुसरीकडे केली जाते.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...........

बदली झाली की पुन्हा पहिल्यापासून चक्र सुरु अशा प्रकारची ही पध्दत आहे. या मांडणीबाबत आता मूलभूत विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते. मुंबई, ठाणे व इतर महानगरांबाबत निकष लावले आहेत. परंतु ग्रामीण महाराष्ट्रात होणारी दंगल, तेथे घडणारे गुन्हे लक्षात घेता मोठया शहरात सर्रास अगदी सकाळी पायी फिरायला जाणाऱ्या लोकांपासून बाजारामध्ये, मॉलमध्ये, रस्त्यामध्ये सगळ्या चोरांच्या टोळ्या ठिकठिकाणी कामाला लागलेल्या दिसून येतात. अशा प्रकारचे गुन्हे रोखणे हे फार आव्हानात्मक काम आहे असे मला वाटत नाही. यासाठी आपल्या पोलीस खात्यामध्ये जे मनुष्यबळ आहे त्यांच्यापैकी ज्यांच्याकडे कौशल्य आहे अशा माणसाला काम देण्याची आवश्यकता असते. ज्या पध्दतीने पोलिसांची नजर या सगळ्या सामाजिक परिसरावर असावयास पाहिजे ती नजर तयार करण्याची गरज आहे. केवळ या ठिकाणी काम करीत नाही म्हणून दुसरीकडे पाठवायचे, तिथे काम होत नाही म्हणून येथे आणायचे ही भूमिका बदलली पाहिजे. कामाचे निश्चित स्वरुप काय आहे, त्या कामासाठी विभागातील माणसाजवळ कोणत्या प्रकारचे पोलीस कौशल्य असले पाहिजे, ते नसेल तर त्याला कशा पध्दतीने कौशल्याचे प्रशिक्षण देता येईल, ते दिल्यानंतर त्याच्याकडून सातत्याने स्पेशलाईज म्हणता येईल अशा प्रकारचे काम करण्याची यंत्रणा तयार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बदलत्या सामाजिक परिस्थितीत पोलिसांनी संवेदनक्षम असण्याची गरज आहे. मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, पोलीस खात्यातील खाकी वर्दीतील सामान्य माणूस अजूनही आपल्या जागेवरच आहे. त्याला संवेदना आहेत. हा अनुभव मला अनेकदा आलेला आहे. इतर राज्यात बलात्काराच्या प्रकरणात पोलीस अधिकारी ज्या पध्दतीने उत्तर देत असल्याचे आपण चॅनेल्सवर पाहतो तसे या राज्यात घडत नाही ही आपल्या राज्याची जमेची बाजू आहे असे मला वाटते. महिलांबाबतच्या, मुलांबाबतच्या गुन्हेगारांकडे पोलीस कशा पध्दतीने बघतात, कशा पध्दतीने त्यांना सामोरे जातात याबाबत सुध्दा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, काही तांत्रिक गोष्टी आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे सर्व ठिकाणी असणे, यासाठी शासनाला वेळेवर काही करण्याची इच्छा नाही असा संदेश समाजामध्ये जाणे योग्य नाही. जी अद्ययावत यंत्रसामुग्री या विभागाला देण्याची गरज आहे ती तातडीने देण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. पोलीस यंत्रणेतील शेवटच्या माणसापासून उच्च अधिकाऱ्यांपर्यंत त्यांचे एकूणच शिक्षण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...........

प्रशिक्षण आणि त्यांच्याकडच्या कामातील विशेषत्व लक्षात घेऊन ठिकठिकाणी होणाऱ्या त्यांच्या बदलीच्या सत्रामध्ये बदल होणे अपेक्षित आहे. असे झाले तर मला वाटते की, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती समाधानकारक होईल असे आपल्याला दिसून येईल, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, मी दोन विभागात माझे मुद्दे विभागले आहेत. ते मुद्दे थोडक्यात मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. पोलीस रिफॉर्म्सबाबत आपल्या दोन्ही सदनामध्ये अनेकदा मुद्दा उपस्थित झालेला आहे. परंतु पोलिसांसाठी सुधारणा करण्याच्या संदर्भात विविध न्यायालयांनी ज्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्याबद्दल सरकार धोरणात्मक निर्णय का घेत नाही हा एक मोठा प्रश्न आहे. राम प्रधान समिती असो किंवा अन्य कोणत्याही समित्या असोत, प्रागतिक महाराष्ट्रामध्ये पोलीस रिफॉर्म्स होऊन पोलिसांचे हित व अधिकार या संदर्भात जोपर्यंत पावले उचलत नाही तोपर्यंत हा संघर्ष वेगवेगळया प्रकाराने सुरु राहणार आहे. फिंगर प्रिंट ब्यूरो हा विभाग पोलीस महासंचालक, सीआयडी यांच्या अखत्यारित आहे. राज्यात 41 फिंगर प्रिंट ब्यूरोची केंद्रे आहेत. या 41 केद्रांमध्ये फिंगर ॲनालिसीस ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग सिस्टीम, 2003 ला आणण्यात आली. 2004 ला ती बंद पडली. मुंबईत फिंगर प्रिंट ब्यूरो कार्यरत असले तरी तेथे स्वतंत्र संचालक नाही. त्यामुळे अतिशय मंद गतीने तपासाचे काम होत आहे.

नंतर डब्ल्यू...1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

फिंगर प्रिंटस ब्युरोमध्ये संगणक आणि ट्रॅकिंग सिस्टीम ताबडतोब सुरु केली पाहिजे.

सभापती महोदय, मुख्य पासपोर्टच्या संदर्भात पुणे विभागाचे काम चांगले असले तरी संपूर्ण राज्यामध्ये पासपोर्टच्या संदर्भात ऑनलाईन व्यवस्था सुरु न झाल्यामुळे आंध्र प्रदेशच्या तुलनेने महाराष्ट्रात पासपोर्ट मिळण्यास वेळ लागतो,अशा पध्दतीचे मत मुख्य पासपोर्ट अधिकारी श्री. मुक्तेश परदेशी यांनी व्यक्त केलेले आहे. त्यामुळे पासपोर्ट पडताळणीची यंत्रणा ताबडतोब पूर्ण करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, शुभम शिर्के या मयत मुलाच्या कुटुंबाला स्वत: आबांनी भेट दिली होती. या कुटुंबाने श्री. उज्वल निकम यांनी सरकारी वकील म्हणून काम करावे अशी मागणी केली होती परंतु हा खटला कोर्टात उभा राहिला तरी देखील श्री. उज्वल निकम यांची नियुक्ती अद्याप झालेली नाही.

सभापती महोदय, श्री. सुनील लाहोरिया यांचा खून झालेला आहे. पुण्यातील ग्रामीण पूर्वी पोलीस विभागातील श्री. आंदळकरांच्या विषयामध्ये स्वत: माननीय उभ सभापतींनी लक्ष घातले होते. ग्रामीण पोलीस निरीक्षक श्री.बलराज लांजिले यांनी तसेच त्यांची पत्नी श्रीमती कविता लांजिले व डॉ.चारुदत्त विश्वनाथ जोशी यांनी बनावट दस्तऐवज तयार करुन शेजारच्यांच्या जागेतून रस्ता काढला असून त्यासंदर्भात केस झालेली आहे. या केसमध्ये श्री. जोशी व श्री. लांजिले यांनी खोटया सहया केलेल्या आहेत. यासंदर्भात चौकशी सुरु असून आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामध्ये श्री. बलराज लांजिले काम करीत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होण्याची आवश्यकता आहे. श्री. लांजिले यांच्यावर कारवाई झाली नाही तर चाकण परिसरातील घोटाळयांना संरक्षण मिळू शकणार नाही.

सभापती महोदय, नयना पुजारी केसमध्ये 8 ऑक्टोबर रोजी आरोपी योगेश राऊत पकडला गेला. परंतु एप्रिल, 2010 मध्ये ससून हॉस्पिटलमधून तो पळाला असून त्याचा अद्याप पावेतो शोध लागलेला नाही. त्यामुळे योगेश राऊतला ताबडतोब पकडण्यात यावे, अशी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, आज संजय दत्तच्या केस संबंधी संपूर्ण भारतभर चर्चा सुरु आहे. मुंबईमध्ये 1993 मध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये संजय दत्त दोषी आहेत. त्यांच्या संदर्भात सर्वाच्च न्यायालय दोषारोप पत्र दिलेले असतांना सुध्दा त्यांच्या माफीच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. ती दुर्दैवी आहे. ज्यावेळेस सर्वाच्च न्यायालय आरोपीला दोषी ठरवल्या नंतर देखील अशा प्रकारे राजकीय स्तरावर माफीचा विचार करु लागलो तर उद्या उघड उघड या पध्दतीच्या कारवायांना प्रोत्साहन देणाऱ्या लोकांना संपूर्ण सिनेमांतील तसेच अन्य सृष्टीतील लोकांना संरक्षण मिळेल. त्यामुळे या संदर्भात योग्य तो विचार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, धुळयाच्या दंगलीचे चित्र आम्ही पाहिले आहे. नगरमध्ये मला असे निदर्शनास आले की, हल्लेखोर जेव्हा महिलांवर अत्याचार करावयास येतात त्यावेळी त्यांच्या हातात शस्त्रास्त्रांबरोबर कात्र्याही असतात. हे हल्लेखोर महिलांची साडी परकराच्या नाडीसह कापतात. ज्यावेळेस असा प्रकार होतो तेव्हा त्या महिलेला त्या गल्लीतून जाता येत नाही. त्यामुळे हल्लेखोरांजवळ कोणती शस्त्रे सापडली, त्यांच्याजवळ बंदुका होत्या की, नाही यापेक्षा हल्लेखोरांची जी प्रवृत्ती आहे ती रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय,संजय दत्तने शिक्षा भोगली पाहिजे यासाठी सभागृहाने एकमताने निर्णय घ्यावा या मुद्याकडे लक्ष वेधून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

---------------

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सदर विषयावर आपण नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित केलेली असून त्यासंदर्भात जवळ जवळ प्रत्येक सदस्यांनी आपापली मते मांडलेली आहेत.

महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती 100 टक्के वाईट आहे, असे समजण्याचे कारण नाही. परंतु महाराष्ट्रातील पोलिसांकडून ज्या पध्दतीने कारवाई होते तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती यामध्ये 100 टक्के समाधान असण्याचेही कारण नाही. आजच्या अवस्थेला एका अर्थाने दुरवस्था म्हणता येईल. या परिस्थितीचे वर्गीकरण आपल्याला तीन भागामध्ये करता येईल

1) पोलीस दलाच्या मन:स्थितीचे खच्चीकरण 2) सत्ताधाऱ्यांचे चुकीचे आणि लांगुलचालनाचे निर्णय 3) नो लॉंग टर्म पॉलिसीज. या तीन मुद्यावरुन संपूर्ण राज्याचे वर्णन आपल्याला करता येईल. पोलीस दलाच्या मन:स्थितीच्या खच्चीकरणाच्या संदर्भात परवा जी घटना घडली त्याचे कारण अजून आपल्या समोर आलेले नाही.

सभापती महोदय,, एटीएसचे डी.सी.पी श्री. संजय बॅनर्जी यांनी स्वत:च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. परंतु त्यांनी आत्महत्या का केली, याचे कारण आपल्याला अजून समजलेले नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार..

हे पोलिसांच्या डिस हार्टनचे द्योतक आहे.

सभापती महोदय, कालच्या वर्तमानपत्रात एक बातमी आली आहे. श्री.शिंदे नावाच्या एका अधिकाऱ्याने ॲडिशनल डी.जीं.च्या विरोधात त्याच्या प्रमोशनबाबत झालेल्या अन्यायाविरोधात पोलीस ठाण्यामध्येच तक्रार केली. ती घटना डी.जीं.कडे पाठवावी लागली. अशा प्रकारे पोलिसांची डिस हार्टन परिस्थिती आहे.

एटीएसमध्ये वाढ झाली पाहिजे अशा प्रकारची चर्चा पुरवणी मागण्यांच्या वेळी मी केली होती. "Wrong and appeasement of policy making" मध्ये आपण बघितले असेल की, आपल्याला आकस्मिक निधीतून 48 लाख रूपये स्पेशल पब्लिक प्रॉस्यिक्युटर अपॉईंट करण्यासाठी घ्यावे लागले आहेत. त्यासाठी आपल्याकडे तरतूद नव्हती.

खबऱ्यांना द्यावयचा 25 लाख इतका निधी देखील आपल्याला आकस्मिक निधीतून घ्यावा लागला आहे. रॉंग डिसिजन्स मुळे पोलिसांचे खच्चीकरण होत असून त्यातून आपण महाराष्ट्रातील पोलिसांना वर काढणार आहोत काय, हा खऱ्या अर्थाने या चर्चेच्या माध्यमातून मुद्दा आहे.

येथे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पोलीस रिफॉर्मचा मुद्दा उपस्थित केला आहे. श्रीकृष्ण आयोग, सुप्रीम कोर्ट हे देशभरातील पोलीस रिफॉर्मबद्दल बोललेले असताना देखील आजही महाराष्ट्र त्यामध्ये पुढे गेलेला दिसत नाही.

आज पोलिसांचे खच्चीकरण कुठल्या दिशेने होत आहे याचे मी आपल्याला उदाहरण देतो. आमच्या विभागाचे पोलीस उप आयुक्त श्री.प्रताप दिघावकर हे ॲक्टींग होते. त्यांची तीन वर्षे पूर्ण होण्या आधीच बदली झाली. त्यांच्या जागी श्री.दोर्जे का आले ? श्री.दिघावकरांना वाहतूक विभागामध्ये का बदली करण्यात आले ? त्याचे उत्तर आम्हाला सापडत नाही. त्याचे उत्तर माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी देणे आवश्यक आहे.

मी जेव्हा निर्णय चुकीचा आहे असे म्हणतो त्यावेळी मला कोणावरही दोषारोप करावयाचा नाही. अप्पर मुख्य सचिव, गृह यांच्या कार्यपद्धतीबद्दल किंवा त्यांच्या क्षमतेबद्दल मला काही बोलावयाचे नाही. श्री.अभिजित राजन हे राज्याचे अप्पर मुख्य सचिव,गृह आहेत. 1999 पासून

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार..

2013 पर्यंत म्हणजे सलग 13 वर्षे हे आयएएस अधिकारी महाराष्ट्रात, मुंबईत कुठेच नव्हते. ते सातत्याने दिल्लीत होते. ज्यांचा 13 वर्षे ग्राऊंड टच गेला होता अशा श्री.अभिजित राजन यांना डायरेक्ट गृह विभागामध्ये आणले आहे. मला त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचा दोषारोप करावयाचा नाही. अशाने पोलीस दलाची मन:स्थिती वाढणार कशी ?

सभापती महोदय, मी शेवटचे काही मुद्दे मांडणार आहे. माझ्याकडे श्री.अहमद जावेद ॲडिशनल डीजीपी यांचे निवेदन आहे. ते असे म्हणतात की, "Police alert on water war in Maharashtra". श्री.संजीव दयाळ, पोलीस महासंचालक देखील तसेच म्हणतात. आता पाण्यावरून वॉर होऊ शकेल अशा आशयाचे अंतर्गत पत्रक पोलीस विभागाने काढले आहे. हे परिपत्रक 7 मार्च रोजी निघाले आहे. दिनांक 16 मार्च रोजी अहमदनगर मधील शिंगवे नाईक गावामध्ये श्री.दत्तात्रय पुंड आणि श्री.पाराजी पुंड या दोन भावामध्ये विहिरीतील पाण्यावरून वाद झाला. श्री.दत्तात्रय पुंड यांनी श्री.पाराजी पुंड या भावाला विहिरीत ढकलून दिल्याने तो मेला.

सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे टेंडर दोनदा रद्द झालेले आहे. सदर टेंडर पहिल्यांदा रद्द झाले तेव्हा ॲडव्होकेट जनरल श्री.खंबाटा यांनी सरकारची लक्तरे का काढली हे सभागृहा समोर येणे आवश्यक आहे. या टेंडरमध्ये गडबड काय आहे, यात कोणते चुकीचे निर्णय झालेले आहेत ? ॲडव्होकेट जनरल दराईस खंबाटा यांनी सरकारला ताकीद दिली म्हणून टेंडर रद्द करण्यात आले. त्यानंतर दुसरे टेंडर काढण्यात आले. त्यामागची गोम व मेख काय आहे, हे सदनाला जाणून घेणे आवश्यक आहे.

मी आता अतिशय महत्त्वाचा मुद्दा जाणीवपूर्वक मांडत आहे. तीन वर्षापूर्वी 0.32 च्या बुलेटस शासनाने घेतल्या. या बुलेटससाठी लागणाऱ्या स्टेनगन्स आपल्याकडे आहेत काय,हेच पोलीस दलाने बघितले नाही. स्टेनगन्समध्ये त्या जाऊच शकत नाही, अशा प्रकारच्या बुलेटस घेतल्या असून त्या तीन चार वर्षापासून पुणे येथे पडलेल्या आहेत. तेव्हा या निर्णयाला कोण जबाबदार आहेत ? रॉंग फुल पॉलिसी, नो लॉंग टर्म पॉलिसी, की अजून काही यास जबादार आहे ?

मी आणखी एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडणार आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त कोण होणार अशा प्रकारची चर्चा आता मुंबई पोलीस दलामध्ये सुरू आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार..

त्या संदर्भात या सभागृहात चर्चा करण्याची, निर्णय घेण्याची आवश्यकता नाही आणि भाष्य करण्याची आवश्यकता नाही. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे खच्चीकरण होऊ नये असे आपण या ठिकाणी आणि बाहेर देखील बोलतो. मुंबईचे पोलीस आयुक्त कोण असेल याचा निर्णय माननीय गृह मंत्री महोदयांनी घ्यावयाचा आहे, त्या विभागाच्या सचिवांनी घ्यावयाचा आहे. परवाच्या घटनेनंतर अशी टूम सुरु झालेली आहे की, श्री.सत्यपाल सिंग यांना अडचणीत आणायचे, श्री.सचिन सूर्यवंशी यांच्या घटनेत देखील अडचणीत आणून त्यांना बाहेर घालवावयाचे अशाप्रकारचा प्रयत्न होत असल्याच्या बातम्या येत आहेत. जर हा स्कीमचा भाग असेल, एखाद्या डिझाईनचा भाग असेल आणि योग्य काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरोधात षडयंत्र असेल तर त्याबाबत माननीय गृहमंत्री महोदयांनी सांगण्याची आवश्यकता आहे. श्री.सत्यपाल सिंग हे चांगले काम करीत असतील तर त्यांना एक्स्टेन्शन देण्याची भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. किंबहुना ते कोणत्या डिझाईनचा भाग होऊन बाहेर पडण्याची आवश्यकता नाही एवढे तरी नक्की पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, 0.32 बोअर आणि सीसीटीव्ही या संदर्भात माननीय गृह मंत्री महोदंयानी स्पष्टीकरण केले पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या प्रस्तावावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांना उद्या बोलण्याची संधी देण्यात येईल. त्यानंतर माननीय गृह मंत्री महोदयांचे उत्तर होईल.

आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.01 ते 12.15 स्थगित झाली )

------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सन्माननीय सदस्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याबाबत**

श्री.विनोद तावडे : माननीय सभापती महोदय, शनिवार-रविवार वगळता गेले दोन-तीन दिवस विधानसभा सदस्यांचे निलंबन आणि इतर विषयाची चर्चा विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहांत झाली. शिवाय संबंधित अधिकाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा आपण चर्चा केली. दोन दिवसांच्या सुटीनंतर आज सभागृहाचे कामकाज आपण अधिकृतपणे सुरु करीत आहोत. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालणे अतिशय महत्त्वाचे आहे. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याची आमची सुध्दा इच्छा आहे. पण त्याच वेळी आमदारांच्या अधिकाराचा विषय सुध्दा तितकाच महत्त्वाचा आहे. हा विषय सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि आम्ही या सभागृहात लावून धरला होता. मला एवढेच सांगावयाचे आहे की, हा विषय विधानसभा सदस्यांचे निलंबन आणि संबंधित अधिकाऱ्यांवरील कारवाईबाबतचा आहे. परंतु या निमित्ताने काही अनावश्यक चर्चा सुध्दा होत आहेत. महोदय, जी घटना घडली त्याचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करुन दिले जात नाही. वास्तविक पाहता प्रोसीजरनुसार अधिकृत अर्ज सादर केल्यानंतर ते मिळेल. आमचे म्हणणे आहे की, या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज बघावे, जेणेकरुन लोकांना यातील खरे कळेल. या प्रकरणी आपण जाणूनबुजून काही लपवितो असे होता कामा नये.

महोदय, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.हर्षवर्धन जाधव यांचा मुद्दा आता चर्चेत आला आहे. या प्रकरणी सरकारकडून निवेदन होणे गरजेचे आहे. मागे पोलिसांनी त्यांना मारहाण केल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी करुन असे काही झालेच नाही अशी इ-समरी न्यायालयात दाखल केली. न्यायालयाने ती फेटाळून लावली. एवढेच नव्हे तर वरिष्ठ न्यायालयात सुध्दा त्या समरीस मान्यता मिळाली नाही.

महोदय, कालच्या घटनेमध्ये सन्माननीय सदस्यांना सभागृहाच्या बाहेर पडण्यापूर्वीच अटक करण्याची योजना पोलिसांची होती. ती तत्परता सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन जाधव यांच्या प्रकरणात का दाखविली नाही, असा प्रश्न विधिमंडळ सदस्य आणि आमच्या मनात आहे. महोदय,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

जी घटना घडली त्याबाबत आम्हा सदस्यांच्या एकच भावना आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, विधान भवनात जो काही प्रकार घडला त्यातून मार्ग काढण्यासाठी बैठका सुरु आहेत. त्या बैठकीत काय मार्ग निघतो ते पाहू या. तो पर्यंत प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करु या असे मला वाटते. माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत या विषयी काही तरी निश्चित मार्ग निघेत अशी अपेक्षा व्यक्त करु या.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भावना मांडताना विशेषत: सन्माननीय सदस्यांच्या हक्काचे संरक्षण होणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. त्याच बरोबर या पवित्र सदनात आणि विधिमंडळात एकूण ज्या पध्दतीचे वातावरण निर्माण झाले आहे तसे पुढील काळात घडू नये यासाठी सन्माननीय विधानसभा अध्यक्ष, सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्ष नेते चर्चा करीत आहेत.

सभागृहातील कामकाज सर्वसामान्य जनता, कष्टकरी शेतकरी आणि दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे असल्यामुळे ते सुरु करावे अशी माझ्या दालनात चर्चा झाली आहे. त्या चर्चेला माननीय विरोधी पक्ष नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार सुध्दा उपस्थित होते. त्यामुळे मला वाटते आता आपण प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करु या.

----------

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील रासायनिक कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे मासळीचे प्रमाण घटल्याबाबत**

**(१) * ३८२१६ श्री. विजय गिरकर, ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रमेश शेंडगे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील रासायनिक कारखान्यातून समुद्र तसेच खाड्यांमध्ये सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे मासळीच्या उत्पादनात प्रचंड प्रमाणात घट झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या पहिल्या आठवड्यात उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासळीचे प्रमाण घटल्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याची मागणी अखिल भारतीय कोळी शक्ती महासंघाने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मच्छीमारांच्या मागणीकडे शासन दुर्लक्ष करित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मधुकरराव चव्हाण** : (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) मागील ५ वर्षांच्या सरासरी मत्स्योत्पादनच्या ५०% कमी मत्स्योत्पादन झाल्यास मत्स्यदुष्काळ जाहीर करण्यात येतो. चालू वर्षात तशी परिस्थिती नसल्यामुळे मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रश्नाच्या उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. उपप्रश्न क्रमांक 4 व 5 च्या उत्तरामध्ये '5 वर्षांच्या' ऐवजी '3 वर्षांच्या' असे वाचावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांच्या उत्तराला माझी हरकत आहे. हे अधिवेशन सुरु झाल्यानंतर संबंधित खात्याकडे प्रश्न न पाठविता दुसऱ्या खात्याकडे प्रश्न पाठविण्याची ही चौथी वेळ आहे. हा विषय पर्यावरण विभागाचा आहे आणि पर्यावरण विभागाने या प्रश्नाचे उत्तर दिले तरच या प्रश्नाला न्याय मिळणार आहे. मासे कशा प्रकारे नष्ट होतात किंवा मरतात हे मत्स्यव्यवसाय मंत्री सांगू शकत नाहीत. ही पर्यावरणाच्या संदर्भातील तक्रार आहे. या ठिकाणी आधी पर्यावरण विभागाने उत्तर दिले पाहिजे आणि त्यानंतर मत्स्यव्यवसाय विभाग उत्तर देऊ शकते.

...2...

ता. प्र. क्र. 38216 .....

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, यामध्ये दूषित पाण्यामुळे मत्स्य उत्पादन कमी झालेले आहे त्यासंबंधीचा प्रश्न आहे.

**सभापती** : या संदर्भात सन्माननीय मंत्र्यांनी स्पष्टीकरण करावे आणि उत्तरही द्यावे.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या मत्स्य दुष्काळाचा हा प्रश्न आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, 50 टक्के पेक्षा कमी मत्स्योत्पादन झाल्यास मत्स्यदुष्काळ जाहीर करण्यात येतो. 2007 मध्ये 32 हजार 300 टन मत्स्य उत्पादन झाले होते. 2012 मध्ये 1232 टन मत्स्य उत्पादन झाले आहे. म्हणजे किती तरी प्रमाणात मत्स्योत्पादन कमी झाले आहे. प्रदूषणामुळे उत्पादनामध्ये ही घट झालेली आहे हा मूळ विषय आहे. या बाबतीत शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री. मधुकरराव चव्हाण : सभापती महोदय, यामध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्याबाबतचा प्रश्न विचारलेला आहे. म्हणून आम्ही तीन वर्षाची आकडेवारी आपल्यासमोर दिलेली आहे. त्यामध्ये या तीन वर्षाच्या काळात 50 टक्केपेक्षा अधिक उत्पादन झालेले आहे त्यामुळे दुष्काळी परिस्थिती जाहीर करता येत नाही. तथापि, खाडीमध्ये पकडण्यात आलेल्या मासळीचे उत्पादन कमी झालेले आहे. आम्ही या बाबतीत आम्ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी चर्चा केली. त्यांनी असे उत्तर दिले की, महाराष्ट्र राज्यामध्ये औद्योगिक वसाहतीतून निघणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 24 सामूहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संनियंत्रण यंत्रणा कार्यरत आहेत. या सर्व प्रकल्पांची क्षमता 2115 द.ल.घ.लिटर प्रतिदिन एवढी आहे. प्रक्रियायुक्त सांडपाणी राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्थेने निर्देशित केलेल्या ठिकाणी समुद्रात खाडीमध्ये सोडले जाते. सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेतून निघणाऱ्या सांडपाण्याचे नमुने गोळा केले जातात.

श्री. निकोलस अलमेरा यांनी माननीय मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्रमांक 7/2011 दाखल केलेली असून माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सामूहिक सांडपाणी केंद्रामध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे काम सुरु आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या सर्व केंद्राचे दर सोमवारी नमुने गोळा करुन त्याचे पृथक्करण अहवाल महाराष्ट्र प्रदूषण

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38216 ..... श्री. मधुकरराव चव्हाण ....

नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येतात. पृथक्करण अहवालावरुन या केंद्रातील प्रक्रियेमध्ये सुधारणा दिसून येते. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मागील सहा महिन्यांमध्ये औद्योगिक सांडपाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर मासे मरतुकीची घटना निदर्शनास आलेली नाही. ही माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेली आहे. समुद्रातील मासेमारी वेगळी आहे आणि खाडीतील मासेमारी वेगळी आहे. माझ्याकडे जो रिपोर्ट आलेला आहे त्याप्रमाणे खाडीमध्ये प्रदूषणाचे थोडे पाणी येते अशी पत्रे मासेमारी करणाऱ्या संस्थांकडून आली. त्या संदर्भात चौकशी सुध्दा केलेली आहे. अंशतः ही गोष्ट खरी आहे की, खाडीमध्ये थोडे मिश्रित पाणी आल्यामुळे मरतुकी वाढलेली आहे. या बाबतीत आपण त्या खात्याला सांगितले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38216.... श्री.मधुकरराव चव्हाण.....

दर सोमवारी आमचा अहवाल जातो असे त्यांनी सांगितलेले आहे. मत्स्यव्यवसाय विभागाकडे यासंबंधी तक्रार आलेली आहे हेही खरे आहे. त्यासंबंधी कोळी बांधवांकडे चौकशी केली असता खाडीतील मासे काही अंशी मृत होत असल्याचे समजलेले आहे.

प्रा.सुरेश नवले : महाराष्ट्रात यापूर्वी मत्स्य दुष्काळ जाहीर केला आहे का, असल्यास केव्हा ?

श्री.मधुकरराव चव्हाण : यापूर्वी मत्स्य दुष्काळ जाहीर केलेला नाही.

ॲड.आशिष शेलार : या प्रश्नाला उत्तर देताना "नाही" असे उत्तर दिलेले आहे. परंतु राज्यातील मत्स्य उत्पादन घटले आहे हे शासनाने सादर केलेल्या "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी" या अहवालात कबूल केलेले आहे. त्या अहवालात सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादनाची आकडेवारी दिलेली आहे. सागरी पाण्यातील मत्स्य उत्पादन 4.34 मे.टनावरुन 1.42 मे.टन झालेले आहे व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन 3.45 मे.टनावरुन 1.45 पर्यंत झालेले आहे. याचा अर्थ अर्धे मत्स्य उत्पादन कमी झालेले आहे. मत्स्य उत्पादन घटले असल्यामुळे मत्स्य उत्पादन वाढण्यासाठी काही पॅकेज देणार आहे काय ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, खाडीमध्ये दूषित पाणी सोडले जाते. त्यामुळे महाराष्ट्रात केंद्र सरकारचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने आणि जेएनयुआरएमएम अंतर्गत समुद्रात पाणी जाण्यापूर्वी दूषित पाण्यावर टर्चरी ट्रिटमेण्ट केली पाहिजे असे या अहवालात नमूद केले आहे. त्याचे पालन केले जाईल काय ?

श्री.मधुकरराव चव्हाण : मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यासाठी टक्केवारीची पध्दत आहे. त्या टक्केवारीमध्ये मत्स्य दुष्काळ बसत नाही. खाडीमध्ये रसायनयुक्त पाणी सोडल्यामुळे मासे मरण्याचे प्रमाण वाढलेले आहे असा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. परंतु खाडीतील मासेमारी व समुद्रातील मासेमारी वेगवेगळी असते. खाडीत प्रदूषित पाणी आल्यामुळे मासे मृत होत आहेत हे अंशत: खरे आहे. परंतु समुद्रातील मत्स्य उत्पादनात घट झालेली नाही.

**सभापती** : याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात यावी.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ D/ KTG/

ता.प्र.क्र.38216....

श्री.मधुकरराव चव्हाण : सभापती महोदय, सन 2009-10 मध्ये 4 लाख 15 हजार 767 मे.टन, सन 2010-11 मध्ये 4 लाख 46 हजार 703 मे.टन, सन 2011-12 मध्ये 4 लाख 33 हजार 684 मे.टन म्हणजे 4 लाख 32 हजार 51 मे.टन हे 3 वर्षाचे सरासरी उत्पादन आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दूषित पाणी समुद्राच्या किनाऱ्यापासून 22 नॉटिकल मैल आत सोडले पाहिजे अशा प्रकारचा आंतरराष्ट्रीय कायदा आहे आणि त्याचे त्यांनी पालन केले पाहिजे. याची जाणीव मत्स्यव्यवसाय विभागाने पर्यावरण खात्याला दिली आहे काय ? एखादा प्रकल्प उभा राहत असताना पर्यावरण विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय कायद्याचा विचार केला जातो. जगामध्ये काय चालले आहे त्याची माहिती आम्हाला दिली जाते. परंतु कारखान्यांकडून दूषित पाणी समुद्राच्या किनाऱ्यावरच सोडले जाते. त्याऐवजी हे दूषित पाणी समुद्रामध्ये 22 नॉटिकल मैल आत सोडण्यासाठी उद्योग खात्याला भाग पाडणार काय, दूषित पाणी केवळ खाडीत सोडले जाते, समुद्रात सोडले जात नाही असे मंत्री महोदय वारंवार सांगत आहेत. खाडीतील पाणी समुद्रात जाते की चंद्रावर जाते तेही त्यांनी सांगावे.

श्री.मधुकरराव चव्हाण : पाण्यावर प्रक्रिया केल्यानंतरच सोडले जात आहे. (अडथळा) हा प्रश्न कोर्टात गेलेला आहे. या प्रदूषणामुळे मासेमारीच्या उत्पादनावर जो परिणाम होत आहे त्याबाबत एक अभ्यास समिती गठित करुन आढावा घेण्यात येईल. त्या समितीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रतिनिधी, एमआयडीसीचे प्रतिनिधी व महसूल विभागाचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:30

ता.प्र.क्र. 38216.... श्री. मधुकरराव चव्हाण...

या संदर्भात दर 4 महिन्यांनी मिटींग घेण्यात येईल.

श्री. विनायक राऊत : ठाणे आणि रायगड या भागातील खाड्यांच्या आजूबाजूला प्रदूषण निर्माण करणारे रासायनिक कारखाने उभे राहिलेले आहेत. या कारखान्यामुळे होणा-या प्रदूषणाचा विपरित परिणाम मत्स्योत्पादनावर होत आहे हे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. ठाणे आणि रायगड या भागातील रासायनिक कारखान्यांच्या माध्यमातून समुद्रामध्ये जे दूषित पाणी सोडले जाते त्या पाण्याची तपासणी दर आठवड्याने करण्याऐवजी ती दररोज करण्यात येईल काय ? मुंबईमध्ये वरळी आणि वर्सोवा या भागातून देखील समुद्रामध्ये दूषित पाणी सोडले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. परिणामी त्याचा मत्स्योत्पादनावर विपरित परिणाम होत आहे. हा संपूर्ण मासेमारी व्यवसाय वृद्धींगत व्हावा या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना करण्याचे ठरविलेले आहे ?

श्री. मधुकरराव चव्हण : पाण्याची दररोज तपासणी करणे कठीण आहे. दर आठवडयातून एकदा पाण्याची तपासणी करावी असे उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. त्या आदेशाप्रमाणे आठवडयातून एकदा सोमवारी पाण्याची तपासणी केली जाते. खात्याने 6 महिन्याचा अहवाल दिलेला आहे. याबाबतीत 4 विभागाच्या अधिका-यांची एक कमिटी करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : खाडीच्या बाजूला असलेल्या मॅनग्रोव्हच्या ठिकाणी मासे अंडी घालतात. परंतु आता हे मॅनग्रोव्ह नष्ट होत आहेत. प्रदूषित पाण्याचा या मॅनग्रोव्हवर विपरित परिणाम होत आहे. तेव्हा रासायनिक कारखान्यातून बाहेर पडणारे दूषित पाणी शुध्द करण्याच्या संदर्भात कोणती कडक उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री.मधुकरराव चव्हाण : हे जे काही प्रदूषण होत आहे त्यासंदर्भात एक कमिटी नेमण्याचे मी जाहीर केलेले आहे. ती कमिटी तीन महिन्याने रिपोर्ट घेईल. प्रदूषणाच्या संदर्भात जे जे काही प्रश्न असतील ते त्या कमिटी समोर मांडले जातील.

श्री. प्रकाश बिनसाळे : मत्स्य उत्पादन घटलेले आहे याचा अर्थ या भागात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे. या खाडयांमधून मासेमारी केली जाते. हे मासे खाण्यायोग्य आहेत याची शहानिशा केलेली आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : ते मासे खाण्यायोग्य आहेत की नाहीत याची चौकशी करुन माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38216....

श्री. कपिल पाटील : तीन वर्षापूर्वी मी मत्स्य दुष्काळासंबंधीचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला होता आणि त्यावेळी 34 कोटी रुपयाचे पॅकेज दिले गेले हाते. प्रदूषणामुळे खाडीतील मासे कमी झालेले आहेत हे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. खाडीतील मासे कमी झाल्यामुळे खाडीमध्ये मासेमारी करणा-या मच्छीमारांचे नुकसान झालेले आहे. मागे इंडियन ऑईलने तेलसाठे शोधण्याच्या मोहिमेमध्ये मच्छीमारांच्या झालेल्या नुकसानीबाबत नुकसान भरपाई दिली होती. तेव्हा खाडीमधील मासे कमी झाल्यामुळे खाडीमध्ये मासेमारी करणा-या मच्छीमारांना केव्हा आणि किती नुकसान भरपाई देण्यात येईल ? तसेच हे प्रदूषण रोखण्यासाठी शासन कायम स्वरुपी यंत्रणा निर्माण करणार आहे काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38216...

श्री.मधुकर चव्हाण : या बाबतीमध्ये प्रदूषण खात्याबरोबर आमच्या वारंवार बैठका झालेल्या आहेत. यापूर्वीही अशा पध्दतीच्या बैठका घेतल्या गेल्या आहेत. तसेच परवा देखील याच विषयाच्या अनुषंगाने बैठक झाली आहे. हा प्रश्न माननीय उच्च न्यायालयामध्ये गेलेला आहे. मी या ठिकाणी नुकसान भरपाईच्या बाबतीत सांगू इच्छितो की, समुद्रातील मच्छीचे उत्पादन 50 टक्क्यांच्या आत आले तर आपण नुकसान भरपाई जाहीर करतो. देतो. खाडीच्या पाण्यातील मासळीचे उत्पादन किती टक्के उत्पादन घटले आहे याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : नैसर्गिक आणि रासायनिक प्रदूषणामुळे मासळी उत्पादनात 50 टक्क्यांपेक्षा जास्त घट झाली असेल मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत राज्य शासन काही प्रयत्न करणार आहे काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. त्या बाबतीतील माहिती देण्यात यावी.

श्री.मधुकर चव्हाण : मी या संदर्भात नुकतीच समिती जाहीर केलेली आहे. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतीत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, त्यावेळेला दुष्काळी मदत देण्यात आलेली नव्हती. कोकण पॅकेज म्हणून मदत देण्यात आली होती.

श्री.निरंजन डावखरे : पालघर तालुक्यामध्ये खाडी लगत जेवढे प्रॉन्स कल्चर करणारे शेतकरी होते, त्यांचे प्रॉन्स प्लॉन्ट दरम्यानच्या काळात प्रदूषित पाण्यामुळे उध्वस्त झाले आहेत, त्यांचे सर्व प्रॉन्स क्रॉप मरुन गेले हे खरे आहे काय ?

श्री.मधुकर चव्हाण : याबाबतची माहिती घेतो आणि ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात अनुदानित वसतिगृहांसाठी अधिक्षकाच्या पद संख्येत वाढ करणेबाबत**

**(२) * ३७०४३ डॉ. अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत व स्वयंसेवी संस्थांमार्फत जी अनुदानित वसतिगृह चालविण्यात येत आहेत, तेथे २०० ते २५० विद्यार्थ्यांमागे अधी्क्षकांचे केवळ एकच पद मान्य आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शासकीय वा अन्य वसतिगृहांची विद्यार्थी संख्या किमान २५ इतकीच आहे, तेथेही अधीक्षकाचे एक पद मान्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांची योग्य देखभाल व सुरक्षिततेच्या दृष्टीने २५ विद्यार्थ्यामागे १ व २०० ते २५० विद्यार्थ्यामागेही केवळ एकच अधीक्षक हे निकष बदलून विद्यार्थ्याच्या संख्येनुसार वाढीव अधीक्षकांची पदे मंजूर करण्याची आवश्यकता असल्याची बाब शासनाचे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी - दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांचे हिताच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (१) व (२) होय.

अनुदानित वसतिगृहासाठी कर्मचारी आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून त्यामध्ये विद्यार्थी संख्या विचारात न घेता प्रति वसतिगृहासाठी अधीक्षकाचे १ पद अनुज्ञेय करण्यात आले आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, प्रश्नातील बाब मी नागपूर अधिवेशनात सुध्दा उपस्थित केला होता. राज्यातील अनेक वसतिगृहे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने चालविली जातात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आश्रमशाळा कमी आहेत, पण त्या चालविल्या जातात. वसतिगृहातील विद्यार्थी संख्येवर ही पदे आधारित नाहीत. २५ विद्यार्थी असो अथवा १०० विद्यार्थी असो, यासाठी अधीक्षकांचे एकच पद आहे. आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांना किंवा वसतिगृहांना स्टापींग पॅटर्न ठरवून दिलेला आहे, त्या अनषंगाने संहिता ठरवून दिलेली आहे आणि त्याप्रमाणे त्या विभागाने सगळे कामकाज रेग्युलाईज केलेले आहे. सामाजिक न्याय विभाग आदिवासी विभागाप्रमाणेच अशा प्रकारचा स्टॉपींग पॅटर्न ठरवून घेऊन त्यांनी आपले सगळे कामकाज रेग्युलाईज करुन घेण्यात येईल काय, तसेच या वसतिगृहांमधील कर्मचाऱ्यांना सहा सहा महिने वेतन दिले जात नाही, त्यांचे वेतन वेळेवर दिले जाईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : आश्रमशाळा वेगळया आहेत आणि अनुदानित वसतिगृहे वेगळी आहेत. शासकीय वसतिगृहास २५० विद्यार्थ्यांना एकच अधीक्षकाचे पद मंजूर केलेले आहे. म्हणून आपण या वसतिगृहासांठी देखील अधीक्षकाचे एकच पद निर्माण केलेले आहे. वसतिगृहांचे काही अनुदान पेंडींग राहिले होत. आता पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून यासाठी ५३ कोटी रुपये मिळालेले आहेत. त्यांना १०० टक्के अनुदानाची रक्कम यातून देण्यात येईल.

श्री.सुभाष चव्हाण : अधीक्षकांची एकूण पदे किती आहेत, अधीक्षक पदांचा अनुशेष भरला गेला आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : अनुदानित वसतिगृहे २३८८आहेत, त्या सर्व वसतिगृहांमधील अधीक्षकांची पदे भरण्यात आली आहेत.

श्री. रमेश शेंडगे : शासकीय किंवा अनुदानित आश्रमशाळांमध्ये महिला अधीक्षिका कोठेही आढळून येत नाहीत. मुलींच्या वसतिगृहात विद्यार्थीनींचे विनयभंगाचे प्रकार होतात, महिला आश्रमशाळांमध्ये बलात्काराच्या घटना घडलेल्या आहेत, वसतिगृहे आणि आश्रमशाळांमध्ये महिला अधीक्षकांची पदे भरलेली नाहीत त्यामुळे असे प्रकार होतात हे एकमेव घटना घडण्यामागचे कारण आहे. काही महिला आश्रमशाळांमध्ये रात्रीच्या वेळी एखाद्या बाहेरच्या आजीला बोलाविले जाते. त्या आजीबाईंना झोपण्यासाठी सांगितले जाते. ती आजीबाई रात्री झोपते आणि सकाळी आपल्या घरी निघून जाते. मुलींच्या आश्रमशाळेत असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. महिला अधीक्षकांची किती पदे रिक्त आहेत, ती रिक्त पदे शासन कधीपर्यन्त भरणार आहे ?


ABG/ KTG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम १२:३५

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७०४३...

श्री.शिवाजीराव मोघे : हा प्रश्न अनुदानित वसतिगृहासंबंधी आहे. सन्माननीय सदस्यांनी आश्रमशाळा विषयी प्रश्न विचारलेला आहे. महिला अधीक्षकांची पदे बऱ्याच मोठया प्रमाणात भरली गेलेली आहेत. कारण आम्ही सदर पदाचे शैक्षणिक पात्रतेत बदल केलेला आहे.

श्री.रामनाथ मोते : अनुदानित वसतिगृहाचा हा प्रश्न आहे. या वसतिगृहांमध्ये काम करणारे कर्मचारी आहेत, या कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या संदर्भामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले होते. त्यांनी यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला होता. अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याच्या प्रस्तावासंबंधीची सद्य:स्थिती काय आहे ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37043.......

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या विषयाची आपल्याला चांगली माहिती आहे. आपण स्वत: या विषयाबाबत आपल्या दालनात बैठक घेतली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 15 मे, 2012 रोजी तत्वत: मान्य केले आहे. लवकरात लवकर कॅबिनेटपुढे हा विषय नेऊन प्रश्न निकालात निघेल असे मला वाटते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, 25 विद्यार्थी संख्या असली तरी एक अधीक्षक आणि 250 विद्यार्थी संख्या असली तरी अधीक्षकाचे एकच पद मंजूर केले जाते. याबाबत निकष काय ठरविले आहेत? मिनिमम क्वॉलिफिकेशन लेव्हल 25 असेल तर नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने त्या प्रमाणात तेथे पदे मंजूर असणे महत्वाचे आहे. इतक्या मोठया प्रमाणात पदे भरणे शक्य नसेल तर त्यासाठी संख्येचा विचार करुन केवळ निकषामध्ये बसविण्याच्या दृष्टीने एक अधीक्षक नेमण्यापेक्षा तेथील परिस्थितीचा विचार करुन एकापेक्षा अधिक पदांची आवश्यकता असेल आणि स्त्री अधीक्षिकेचे पद आवश्यक असेल तर त्याप्रमाणे ही चौकट ठेवून पदे मंजूर करणे शक्य आहे का?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, अधीक्षकाचे पद शासनाने मान्य केले नाही. परंतु मान्य विद्यार्थी संख्या 48 पर्यंत स्वयंपाक्याचे एक पद मंजूर केले जाते. 48 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असेल तर अधिक एक पद मंजूर केले जाते. अधीक्षकाचे पद मान्य केलेले नाही.

श्री.निरंजन डावखरे : सामाजिक न्याय विभागाच्या आश्रमशाळातील कर्मचा-यांना आठ-आठ महिने वेतन मिळत नाही हे खरे आहे काय?

श्री.शिवाजीराव मोघे : सुरुवातीलाच मी सांगितले की, हा आश्रमशाळांचा प्रश्न नसून अनुदानित वसतिगृहाचा प्रश्न आहे. यासाठी 53 कोटी रुपयांची पुरवणी मागणी मान्य झालेली आहे. 15 दिवसात रक्कम देण्यात येईल.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे शहापूर (ता.खामगांव,जि.बुलढाणा) येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचाच्या मनमानी कारभाराबाबत**

**(३) * ३६९४५ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शहापूर (ता.खामगांव,जि.बुलढाणा) येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचाच्या अवैध तसेच मनमानी कारभाराबाबत शहापूर ग्रामंपचायतीच्या सर्व सदस्यांनी दिनांक ७ मे, २०१२ रोजी खामगाव येथील गट विकास अधिकाऱ्यांकडे तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट विकास अधिकाऱ्यांनी या तक्रारीसंदर्भात चौकशी करुन आपला अहवाल उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शहापूर ग्रामपंचायतीच्या सरपंचाविरुध्द मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९ (१) प्रमाणे चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त अमरावती यांची दिनांक ११ ऑक्टोबर, २०१२ रोजी परवानगी मागितली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, विभागीय आयुक्त यांनी या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील** : (१) होय,

(२) होय,

(३) होय,

(४) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक १४.०३.२०१३ च्या पत्रान्वये ग्रा.पं.शहापूर, ता. खामगांव चे सरपंच यांच्याविरुध्द ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कार्यवाही करण्याकरीता परवानगी देण्यात आली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न हे सरकार किती गतीमान आहे याचा एक नमुना आहे. शहापूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच आणि सर्व सदस्यांनी दिनांक 7 मे, 2012 रोजी सरपंचांविरुध्द तक्रार केली होती. सरपंचांनी अनियमितता केलेल्या 7 मुद्यांचा त्यात समावेश होता. या तक्रारीबाबत शहानिशा करुन सरपंचांनी कशाप्रकारे अनियमितता केली, त्यामुळे ते कसे अपात्र ठरतात या संदर्भात गटविकास अधिकारी यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल सादर केला. उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी हा अहवाल दोन महिने स्वत:कडे प्रलंबित ठेवला.

सभापती महोदय, दिनांक 11 ऑक्टोबर, 2012 रोजी त्यांनी ग्रामपंचायत अधिनियम, 1958 च्या कलम 39(1) नुसार विभागीय चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांकडे परवानगी मागितली. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक 14.3.2013 रोजीच्या पत्रान्वये परवानगी दिली असे उत्तरात म्हटले आहे. म्हणजे ऑक्टोबर ते मार्च या काळात हा विषय प्रलंबित राहिला होता.

..3..

ता.प्र.क्र.36945........... श्री.पांडुरंग फुंडकर..............

सभापती महोदय, आम्ही 45 दिवस अगोदर प्रश्न देत असतो. हा प्रश्न उपस्थित केला नसता तर विभागीय आयुक्तांनी विभागीय चौकशीसाठी अनुमती देत असल्याचे पत्र दिले नसते. सहा महिने या प्रकरणात विलंब झालेला आहे. या विलंबास जबाबदार कोण आहे? ग्रामपंचायत अधिनियम, 1958 च्या कलम 39(1) नुसार दोन महिन्यात निर्णय घेऊन ताबडतोब कारवाई केली पाहिजे असे नियमात म्हटले आहे. असे असताना कारवाई करण्यास विलंब का झाला? सरपंचांवर अपात्रतेची कारवाई किती दिवसात करण्यात येणार आहे?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले ते खरे आहे. अशा स्वरुपाची चौकशी करुन अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे आला. तो अहवाल त्यांच्याकडे दोन महिने प्रलंबित राहिला. त्यानंतर प्रकरण विभागीय आयुक्त कार्यालयाकडे गेले.

नंतर 2एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :36945** ......

श्री. जयंत पाटील ....

प्रस्ताव आयुक्तांना सादर करणारा जो कारकून होता त्याचे नाव अँटी करप्शनमध्ये असल्यामुळे प्रस्ताव सादर करता आला नाही. दिनांक 21 सप्टेंबर रोजी सदर कारकुनावर कारवाई करण्यात आली व त्याचा चार्ज दुसऱ्या कारकूनाला देण्यात आला. पूर्वीच्या कारकुनावर जी कारवाई झाली होती त्यामुळे नव्या कारकुनाकडे चार्ज देणे घेणे बरोबर न झाल्यामुळे कागदपत्रांची अदलाबदल व्यवस्थित झाली नाही. या प्रकरणाचा चार्ज श्री. कोठे याच्याकडे देण्यात आला. परंतु त्यांच्याकडून कागद मिसप्लेस झाला असेल किंवा त्यांच्याकडे तो कागद आला नसेल. त्यानंतर या प्रकरणात तिसऱ्या कारकुनाला म्हणजे श्री सातंगे यांना चार्ज देण्यात आला. श्री. सातंगे दि. 8 नोव्हेंबर रोजी रुजू झाल्यानंतर 1 डिसेंबर रोजी ही फाईल आयुक्तांना सादर करण्यात आली.

या प्रकरणामध्ये निश्चितपणे डीले झालेला आहे. आयुक्त कार्यालयामध्ये अशा प्रकारची दिरंगाई होणे चुकीचे आहे. आयुक्तांच्या कार्यालयात आलेले प्रस्ताव वेळेवर पूर्ण केले जातात की, नाही हे पाहण्याचे काम आयुक्तांचे असते. एखादा कारकून जागेवर नसेल व त्यामुळे काम थांबले असेल तर यासंदर्भातील जबाबदारी विभाग प्रमुखांवर येत असते. या प्रकरणात दिरंगाई का झाली याची स्वतंत्र चौकशी सचिव स्तरावरील अधिकाऱ्याकडून केली जाईल. प्रशासनाच्या संदर्भात आपल्या ज्या अपेक्षा आहेत त्यापेक्षा वेगळा डिले या प्रकरणात झालेला आहे. या विषयाच्या संदर्भात आता आयुक्तांकडून परवानगी देण्यात आलेली आहे. या प्रकरणात टाईम लिमिट मध्ये सदर सरपंचावर कारवाई केली जाईल. सदर सरपंचाने बीएसएनएलकडून आलेले 10 महिन्यांचे चेक स्वत:जवळ ठेऊन कर्तव्यात कसूर केलेली आहे, कर वसुलीचे 3500 रुपये वसूल करुन ते स्वत:जवळ ठेवलेले आहेत तसेच काही पावत्या रेकॉर्डमध्ये न ठेवता स्वत:कडेंच ठेवलेल्या आहेत. यामध्ये सरपंच प्रथमदर्शनी दोषी दिसतो. त्यामुळे सदर सरपंचावर निश्चित प्रकारे कारवाई केली जाईल असे आश्वासन या प्रसंगी मी देऊ इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रकरणात सरपंचाने पैशांचा अपहार केलेला असल्यामुळे सदर सरपंचावर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री जयंत पाटील : सभापती महोदय,पहिली फेज ही चौकशीची असते व त्याला आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. चौकशीमध्ये सरपंचावर आरोप निश्चित झाल्यानंतर योग्य ती कारवाई केली

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :36945** ......

श्री. जयंत पाटील ....

जाईल. सदर सरपंचाने अपहार केलेल्या निधीतील काही पैसे भरले असल्याची माहिती आज सकाळी मला देण्यात आलेली आहे. यामध्ये पैशाचा अपहार असेल तर सदर सरपंचावर फौजदारी कारवाई निश्चितपणे केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदर सरपंचाने काल पर्यंत सुध्दा पैसे भरलेले नव्हते. या ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य मला भेटले असून यासंदर्भात खामगाव येथील बीडीओ यांचा अहवाल माझ्याकडे आहे. "ग्रामपंचायत शहापूर येथील बीएसएनएल कंपनीकडून भाडयापोटी मिळालेल्या रक्कमेचे 10 महिन्यांचे चेक जवळ ठेवून सरपंचाने कर्तव्यात कसूर केलेली आहे. तसेच सरपंचाने स्वतःच्या सहीने करवसुलीची 3525 रक्कम वसूल करुन स्वतःजवळ ठेवली असल्याचे निदर्शनास आले असून सदर रक्कम त्यांच्याकडून वसूल पात्र ठरते. तसेच कर वसुली पावती पुस्तक नमुना क्रमांक 1056 मूळ प्रत व दुय्यम प्रत दोन्ही प्रती पावत्या पुस्तकात आढळून आल्या नाहीत. सरपंचाने ग्रामपंचायतीच्या कारभारात अनियमितता केली असल्याचे स्पष्ट होत आहे". बीडीओ यांनी यासंदर्भात स्पष्ट अहवाल दिलेला आहे.

एकंदर 7 मुद्यावर उप सरपंच तसेच सदस्यांनी तक्रार केली होती. गावामध्ये 20 ट्रिप मुरुम टाकला असतांना 70 ट्रिप टाकल्याचे दाखवून बिल काढलेले आहे. बाजार हरासीची मुदत डिसेंबर 2012 मध्ये संपली असतांना सुध्दा करवसुली करुन तो पैसा देखील खिशात टाकलेला आहे. अशा गंभीर गोष्टी झालेल्या असतांना सरपंचाला अपात्र ठरविण्यामध्ये जो विलंब होतो आहे त्याचे कारण काय ? ज्या सरपंचाने पैशाचा अपहार केलेला आहे त्याच्यावर फौजदारी गुन्हा शासन दाखल करणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36945....

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, दिनांक 21 मार्च 2013 रोजी त्यांनी रक्कम भरली आहे असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी माहिती दिलेली आहे. शासनाचे पैसे वापरणे हा गुन्हा आहे. पैसे भरले म्हणजे सगळे मिटले हे शासनाला अजिबात मान्य नाही. त्यामुळे संबंधितांविरूद्ध योग्य ती कारवाई होईल. त्यांनी पैशाचा अपहार केला आहे असे रेकॉर्ड झाल्यानंतर व तो त्या चौकटीत बसत असेल तर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

..................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी आणलेले सोलर वॉटर हिटर विनावापर पडून असल्याबाबत**

**(4) * 36839 डॉ.रणजित पाटील, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.प्रवीण पोटे पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक 35023 ला दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात.** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील जुन्या 264 शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरिता 11 कोटी रुपयांचे 1 हजार 149 सोलर वॉटर हिटर बसविण्याचे कंत्राट बंगलोर येथील रश्मी इंडस्ट्रिज या कंपनीला देण्यात आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रश्मी इंडस्ट्रिज कंपनीने 733 सोलर वॉटर हिटर संचाचा पुरवठा केला मात्र प्रत्यक्षात उर्वरीत संचाचा पुरवठा करण्यात आला नसल्यामुळे समाज कल्याण आयुक्तांनी दिनांक 30 जून, 2012 रोजी रश्मी इंडस्ट्रिज कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(3) सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासकीय वसतिगृहात सोलर वॉटर हिटर पुरविण्याचे काम विहित मुदतीत योग्यरित्या न झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (अमरावती) यांनी दिनांक 20 मार्च, 2012 व दिनांक 4 सप्टेंबर, 2012 रोजी मा. आयुक्त समाजकल्याण संचालनालय, पुणे यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(5) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार संबंधित दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व पुरवठादारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (1) होय.

(2) नाही. कंत्राट दिलेल्या मे.रश्मी इंडस्ट्रिज या कंपनीने पुरवठा ओदशातील अटी व शर्तीनुसार 1149 पैकी 733 नगाचा पुरवठा केला असून कंपनीस 710 नगाचे रु. 5,88,49026/- इतकी रक्कम अदा केली आहे. पुरवठा करण्यात आलेल्या 733 संचापैकी 712 संच बसविण्यात आले असून त्यांचे प्लंबींग झालेले आहे व 21 संचासाठी जागेचा प्रश्न असल्याने कार्यवाही चालू आहे.

सदर कंपनीने सोलर वॉटर हिटर सयंत्राचा पुरवठा करण्यात येणाऱ्या अडचणी आयुक्तालयाच्या निदर्शनास आणून वेळोवेळी मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार पुरवठादार कंपनीस मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतवाढ देवूनही पुरवठा न झाल्यामुळे आयुक्तालयामार्फत पुरवठादार कंपनीस कारणे दाखवा नोटीस बजावली आहे व सोलर वॉटर हिटर संयत्रांचा पुरवठा करुन कार्यान्वित करणे याबाबतचे वेळापत्रक पुरवठाधारक कंपनीस ठरवून दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36839....

श्री.शिवाजीराव मोघे.....

(3) होय.
(4) वर नमूद केलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर चौकशीची आवश्यकता नाही.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.
(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.रणजीत पाटील : सभापती महोदय, तीन महिन्यात पूर्ण होणारे हे काम होते. या कामाची वर्क ऑर्डर दिनांक 30.1.2011 रोजी देण्यात आली होती. अडीच वर्षे पूर्ण झाली, दोन हिवाळे उलटून गेले तरी सोलर वॉटर हिटर बसविण्यात आलेले नाही. मागासवर्गीय विद्यार्थी सोलर वॉटर हिटरच्या प्रतीक्षेत आहेत. 1149 सोलर वॉटर हिटरचा पुरवठा करावयचा होता. पैकी 733 नगाचा पुरवठा करण्यात आल्याचे आपण मान्य केले आहे. यासाठी त्यांना वेळोवेळी मुदत वाढ दिलेली आहे. त्यानंतर त्या कंपनीला दीड वर्षानंतर म्हणजे दिनांक 30.6.2013 रोजी शो-कॉज नोटीस शासनाने दिलेली आहे. आमचे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते नेहमी म्हणतात की, राज्य कारभार मराठी भाषेत झाला पाहिजे. या कंपनीला देण्यात आलेली शो-कॉज नोटीस इंग्रजीत असून त्यातील वाक्यरचना व्याकरणदृष्ट्या योग्य नाही. याचा अर्थ असा होतो की, या नोटीसला कोणीच घाबरणार नाही. यासंबंधी मी आयुक्तांना तीन पत्र दिलेली आहेत. ही नोटीस बजावण्या आधी पासून मी माहिती मागत आहे. माझ्या एकाही पत्राला उत्तर देण्यात आलेले नाही. अटी आणि शर्तीचा भंग झाल्यानंतर देखील या कंपनीला आपण संरक्षण देत आहात असे सरळ दिसते आहे. मी जी माहिती मागितली होती ती अधिकाऱ्याने न दिल्याने त्या अधिकाऱ्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात व आता पर्यंत आपण ज्या कंपनीला संरक्षण दिले आहे त्या कंपनी विरूद्ध कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 264 शासकीय वसतिगृहे आहेत. तेथे सोलर वॉटर हिटर बसविण्यामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. काही शासकीय वसतिगृहे भाड्याच्या जागेत आहेत. तेथे टीन किंवा कौले असतील तर त्यावर सोलर वॉटर हिटर बसविता

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36839....

श्री.शिवाजीराव मोघे....

येत नाही. जो पर्यंत फॅब्रिकेशनचे काम करता येत नाही तो पर्यंत सोलर वॉटर हिटर बसविता येत नाही. तसेच, बऱ्याच वेळा घर मालकांची परवानगी मिळत नाही. वसतिगृहांचे स्थलांतर करण्यात आले तर जुन्या इमारतीत सोलर वॉटर हिटर बसविता येत नाही. अशा बऱ्याचशा अडचणी निर्माण झाल्यामुळे सोलर वॉटर हिटर बसविता आलेले नाही. जेथे सोलर वॉटर हिटर बसविण्यात आले आहेत ते अतिशय चांगल्या पद्धतीने कार्यान्वित आहेत. त्यांना आपण तीन नोटीसा दिलेल्या आहेत. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहिती नुसार त्यांनी 733 नगाचा पुरवठा केला असून 712 संच बसविण्यात आले आहेत. जेवढा त्यांनी पुरवठा केला आहे त्याच्या अगेन्स्ट 90 टक्केच पेमेंट करण्यात आले आहे.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, 733 सोलर वॉटर हिटरचा पुरवठा झाला आहे. त्यापैकी 712 संच बसविण्यात आले असून उर्वरित 21 संच जागे अभावी बसविता आले नाही असे मंत्री महोदयांच्या लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे. जागाच उपलब्ध नव्हती तर 1149 संचाचे टेंडर काढण्याचे कारण काय आहे, शासन त्या कंपनीचा काळ्या यादी मध्ये समावेश करणार आहे काय, असा माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, संचासाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध नसल्यामुळे संच बसविण्यात आले नाहीत. आज एकूण 264 शासकीय वसतिगृहे आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, वरळी, मुंबई येथील इमारत अतिशय जुनी आहे. त्या इमारतीवर संच बसविताना इमारतीचा भाग पडला तर अडचण निर्माण होईल. सदर बाब त्याने विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे आता अशा ठिकाणी दुरूस्ती करण्यात येणार असून त्यासाठी रूपये 3 लाख 85 हजार इतका खर्च येणार आहे. तदनंतर मग 21 संच बसविण्यात येतील.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ KTG/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.. 12:55

ता.प्र.क्र.36839....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विभागाने 733 नगांचा पुरवठा करण्याची ऑर्डर देण्यापूर्वी त्या वसतिगृहांमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर आहे किंवा नाही हे तपासण्यात आले होते काय,असल्यास इतक्या नगांची ऑर्डर का देण्यात आली ? पुरवठादारांने तीन-तीन वर्षे मालाचा पुरवठा केला नाही. तेव्हा त्यांना काळ्या यादीत टाकून त्यांच्याकडून नुकसान भरपाई घेणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ती वसतिगृह जुनी असून फक्त 82 इमारती पक्क्या स्वरुपाच्या आहेत. तर काही इमारती या भाड्याच्या आहेत. टीन आणि कौलारु छत असलेल्या ठिकाणी हे सोलर वॉटर हिटर बसविता येतील असे विभागाला वाटले. तसेच जेवढे सोलर वॉटर हिटर बसविण्यात आले त्याचे 90 टक्के पेमेंट केलेले आहे. संबंधित कंपनी उर्वरित सोलर वॉटर हिटर पुरविण्यास तयार आहे. परंतु ते आपल्या इमारतीमध्ये बसविणे शक्य नाही. आता आयुक्तांनी एक प्रस्ताव पाठविलेला आहे, त्यामध्ये निवासी शाळा अधिक आहेत. 100 नवीन वसतिगृहे झालेली आहेत. परंतु आपण जुन्या वसतिगृहांमध्ये सोलर वॉटर हिटर बसविण्याचे काम दिले होते. जर ते मॉडीफाय करुन दिले तर ते सोलर वॉटर हिटर तेथे बसविण्यात येतील.

श्री.पांडुंरग फुंडकर : सभापती महोदय, सोलर वॉटर हिटर खरेदी करण्यास 11 कोटी रुपयांची मान्यता मिळाली होती. सोलर वॉटर हिटर खरेदी संबंधात वर्तमानपत्रातून निविदा मागविण्यात आली होती काय, नसल्याची त्याची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, केंद्र सरकारची आर.सी.आहे त्याप्रमाणे खरेदी करण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 11 कोटी रुपयांची खरेदी असताना त्याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा न मागविता रश्मी इंडस्ट्रीजला कोणत्या आधारावर ठेका देण्यात आला ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर अगोदरच दिलेले आहे. केंद्र शासनाची आर.सी.आहे त्याप्रमाणे त्या कंपनीला कामाचा ठेका दिलेला आहे.

(विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36739....

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आर.सी.आहे म्हणून कोणत्याही प्रकारची निविदा न मागविता कामाचा ठेका देण्यात आला असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले. माझा प्रश्न आहे की, किती रकमेपर्यंत आर.सी.देता येते याला काही नियम आहेत काय ? या ठिकाणी 11 कोटी रुपयांची खरेदी करण्यात आलेली आहे. आर.सी.मध्ये इतक्या रकमेची खरेदी करता येते काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, नियमात आहे म्हणून खरेदी केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सरळ आणि स्पष्ट प्रश्न विचारला होता की,निविदा न मागविता रश्मी इंडस्ट्रीजला कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले त्याची कारणे काय आहेत ? माननीय महोदय या ठिकाणी केंद्र सरकारच्या आर.सी.चा नियम सांगत आहेत. तेव्हा माझा प्रश्न आहे की, आर.सी. संदर्भात केंद्र सरकारचे कोणते नियम आहेत, त्याबाबत काय धोरण आहे याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या संदर्भात शासनाचा जी.आर.आहे त्यानुसार आर.सी.असेल तर आपण निविदा काढत नाही. त्याप्रमाणे कामाचा ठेका दिलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आर.सी.असली तरी निविदा काढावी लागते. या ठिकाणी 11 कोटी रुपयांची खरेदी आहे. या प्रकरणी भ्रष्टाचार झाला हे सिध्द होत आहे तर त्याबाबत शासन चौकशी का करीत नाही, संबंधित कंपनीस काळ्या यादीत का टाकत नाही, तेव्हा या प्रकरणी शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या संदर्भात माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

-----------

..3..



AJIT/ D/ MMP/ KTG/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.. 12:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे भुलाई, तळेगाव शेंद्री (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील पंढरीच्या विठ्ठलास दान केलेली 85 एकर जमीन वहितदारानी स्वत:च्या नावे केल्याबाबत**

**(5) * 37240 श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे भुलाई, तळेगाव शेंद्री (ता.दारव्हा.जि.यवतमाळ) येथील दानशूरानी पंढरीच्या विठ्ठलास दान केलेली सुमारे 85 एकर जमीन वहितदारानी महसूल अधिकाऱ्यांशी संगनमत करुन स्व:च्या नावे केल्याचे माहे नोव्हेंबर,2012 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत आढळून आले व तद्नुसार वहितदारांनी पंढरीच्या विठूरायाची जमीन नावावर केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1), (2), (3) व (4) - हे खरे नाही. मौजे भुलाई येथील विठ्ठल रुक्मिणी संस्थानाच्या जमिनीवर कूळ लागलेले असून कुळाचे नाव कमी करण्याबाबत संस्थानाकडून सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. मौ.तळेगाव व मौ.शेंद्री येथील जमिनीच्या अधिकार अभिलेखात भोगवटादार सदरी संस्थानाचेच नाव दाखल आहे.

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, पंढपूरच्या विठ्ठल मंदिराच्या संदर्भात प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर "हे खरे नाही" असे दिलेले आहे. मौजे भुलाई, तळेगाव शेंद्री, ता.दारव्हा, जि.यवतमाळ येथील दानशूरांनी पंढपूरच्या विठ्ठल मंदिरास किती जमीन दान केलेली आहे ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.37240....

श्री.संदिप बाजोरिया.....

सदर दान केलेल्या जमिनीवर किती कुळांची नावे दाखल करण्यात आली आहेत, तसेच ती नावे कमी करण्यासाठी संस्थानकडून अर्ज दाखल करण्यात आले आहेत काय ?

श्री.प्रकाश सोळंके : महोदय, दारव्हा तालुक्यातील मौजे भुलाई, मौजे तळेगाव व मौजे शेंद्री बु. या ठिकाणी विठ्ठल रुक्मिणी संस्थानच्या नावाने अभिलेख्यामध्ये नोंदी झालेल्या आहेत. त्यापैकी मौजे भुलाई येथील 5 हेक्टर 63 आर जमिनीवर फक्त कूळ लागले होते. मौजे शेंद्री येथील 32 हेक्टर 74 आर आणि मौजे तळेगाव येथील 11 हेक्टर 49 आर या जमिनी खाजगी असून, आजही त्या संस्थानच्या नावाने आहेत. यापैकी गट न.22 वरील 5 हेक्टर 63 आर जमीन आहे. ही जमीन निधनाजी राऊत यांनी दि.28 मे, 2012 रोजी मृत्यू पत्राद्वारे विठ्ठल रुक्मिणी संस्थानास दिली होती. सदर जमिनीवर महादेव यादव, सदाशिव यादव व रामदास यादव यांनी कूळ लावले आहे. या इनाम वर्ग-3 च्या जमिनी नाहीत. या संस्थानच्या खाजगी मालकीच्या जमिनी आहेत. खाजगी जमिनीला सवलती असतात. यासाठी सूट प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्यांना सूट प्रमाणपत्र ग्रँट झाले आहे. कुळाची नावे कमी करण्याबाबत त्यांनी कलम-120 अन्वये अर्ज सादर केला तर ती नावे सुध्दा काम करण्यात येतील.

श्री.संदिप बाजोरिया : महोदय, माननीय मंत्र्यांनी माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर दिले नाही. दारव्हा तालुक्यातील भुलाई, तळेगाव व शेंद्री येथील दानशुरांनी संस्थानला किती एकर जमिनी दान दिल्या, तसेच पंढरपूर मंदिर समितीने वरील जमिनीवर पुन्हा विठ्ठलाचे कूळ नोंदवावे या बाबत महसूल विभागाशी पत्रव्यवहार केला आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : महोदय, मौजे भुलाई येथील 5 हेक्टर 63 आर, मौजे शेंद्री येथील 32 हेक्टर 74 आर आणि मौजे तळेगाव येथील 11 हेक्टर 49 आर अशी एकंदरीत 49 हेक्टर 86 आर जमीन विठ्ठल रुक्मिणी संस्थानला दिली आहे. त्यापैकी काही जमिनीवर विठ्ठल रुक्मिणी संस्थान, पंढरपूरचे नाव आहे. काही ठिकाणी विठ्ठल रुक्मिणी स्थानिक संस्थान देवस्थानचे नाव आहे. या संदर्भात पंढरपूर देवस्थानने अर्ज केला होता. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, दारव्हा

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.37240....

श्री.प्रकाश सोळंके....

यांनी कलम 129 (ब) अन्वये दि.31 मार्च, 2000 रोजी सूट प्रमाणपत्र दिले आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, ताबा देण्याबाबत कलम 120 अन्वये संस्थानने अर्ज केला तर निश्चितपणे त्यांना ताबा दिला जाईल आणि कुळांची नावे कमी केली जातील.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाव्हा (जि.रायगड) येथील सिडको प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमीनीची शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत.**

**(६) * ३७४७५ श्रीमती अलका देसाई, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण : ** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाव्हा (जि.रायगड) येथील २१० शेतकऱ्यांची सिडको प्रकल्पासाठी संपादित केलेल्या १४२ हेक्टर जमिनीची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री यांना दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता**: (१) हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, रायगड यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी विचारु इच्छिते की, शेतकऱ्यांची जमीन कोणत्या साली संपादित करण्यात आली आहे, माननीय जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर चौकशी केव्हा सुरु झाली, ती केव्हा संपली, तसेच उमेश उदानी यांनी खोटी कागदपत्रे तयार केल्याचे चौकशीत सिध्द झाले आहे हे खरे आहे काय, या प्रकरणी उमेश उदानी आणि संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली आहे, नसल्यास त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येईल ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सर्व्हे नंबर 280 येथील जवळ जवळ 142 हेक्टर जमीन सिडको प्रकल्पासाठी संपादित केली आहे. सर महम्मंद युनुस ट्रस्टची मौजे न्हावा, ता.पनवेल येथील जमीन संपादित केली आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37475 ... श्री. प्रकाश सोळंके ...

यामध्ये 2004 साली याचा निवाडा जाहीर झालेला आहे. या बाबतीत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आम्हाला जी माहिती प्राप्त झाली त्यानुसार निश्चितपणे अवॉर्ड जाहीर केल्यानंतर त्यामध्ये ज्या काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत त्या बेकायदेशीर आहेत. सहा महिनेपर्यंत जर काही क्लेरीकल चुका असतील, काही लेखनप्रमाद झाला असेल तर सहा महिनेपर्यंत एसएलओला त्या अवॉर्डमध्ये सुधारणा करता येते. परंतु या ठिकाणी एसएलओने निश्चितपणे चूक केलेली आहे आणि 20 महिन्यानंतर त्या अवॉर्डमध्ये सुधारणा केलेली आहे. यामध्ये त्यांचे इंटेन्शन दिसून येते.

श्री. उदानी यांनी 30 रुपयाच्या बोगस स्टॅम्प पेपरवर करार दाखविलेला आहे की, ही जमीन मला ट्रस्टने विकलेली आहे. या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी तपशीलवार चौकशी केलेली आहे. ही चौकशी करुन जी कारवाई केलेली आहे त्यामध्ये साधारणत: विशेष भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक 6.10.2005 रोजी जो आदेश दिलेला आहे तो पुनर्विलोकनास घ्यावा आणि तत्कालीन विशेष भूसंपादन अधिकारी यांनी भूसंपादन कायद्याच्या कलम 13(अ) चा भंग केलेला आहे म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. श्री. उमेश उदानी यांनी दाखल केलेला कलम 18 चा वाढीव नुकसान भरपाईचा अर्ज रद्द करण्याबाबत जिल्हा न्यायालयाला त्यांनी कळविले आहे. या ठिकाणी ज्या 7 हेक्टर जमीनीपोटी श्री. उमेश उदानीला पेमंट केलेले आहे त्याला साडेबारा टक्के भूखंडाचा लाभ न देण्याबाबत सिडकोला कळविले आहे. त्याचबरोबर कुळांना देय असणारी जी रक्कम आहे ती कलम 30 खाली पनवेल न्यायालयाकडे जमा केलेली आहे. ही रक्कम सुध्दा कुळाला देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशित केलेले आहे. नुकसान भरपाईची जी काही रक्कम श्री. उमेश उदानी यांना दिलेली आहे ती सुध्दा रिकव्हर करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. तत्कालीन भूसंपादन अधिकारी यांनी श्री. उदानी यांचे नाव अधिकार अभिलेखामध्ये जे घेतलेले आहे त्या बाबतीत त्या अधिकाऱ्याचा खुलासा मागविला आहे.

निश्चितपणे हे गंभीर प्रकरण आहे. यामध्ये वारंवार हायकोर्टामध्ये जाऊन आपले अधिकारी जी कारवाई करु इच्छितात त्यामध्ये अडथळे आणले जातात, स्थगिती आणली जाते म्हणून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37475 ..... श्री. प्रकाश सोळंके ......

शासनाने असे ठरविले आहे की, स्वत:हून कोर्टात जाऊन आपल्या विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायासह सरकारतर्फे प्रकरण न्यायालयात न्यावे आणि उच्च न्यायालयाचे जे काही आदेश आहेत ते रद्द करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जे निवेदन केले ते मी लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांनी जे निवेदन केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. परंतु वर्षानुवर्षे जी कुळे साडेबारा टक्के जमिनीच्या मोबदल्यासाठी व्याकूळ आहेत त्यांना ही रक्कम किती दिवसात अदा केली जाईल ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, या सर्व कायदेशीर बाबी व्यवस्थित कराव्या लागतील आणि निश्चितपणे हायकोर्टाचे आदेश तातडीने प्राप्त करुन हायकोर्टाने जर ते सेगळे निर्णय रद्द ठरविले तर निश्चितपणे ही रक्कम कुळांना लवकरात लवकर देण्याबाबत शासन प्रयत्नशील राहील.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/ KTG/

**लहुजी साळवे आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**(७) * ३७२१० श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.रमेश शेंडगे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे, डॉ.निलम गोऱ्हे, श्री.जयंत पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००२ साली मातंग समाजाची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी शासनाने लहुजी साळवे अभ्यास आयोगाची नियुक्ती केली होती, सदर आयोगाने आपला अहवाल ८२ शिफारशीसह शासनाला २००८ मध्ये सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १० डिसेंबर, २०१२ रोजी नागपूर येथे राष्ट्रीय मातंग महासंघ, नागपूर या संघटनेने आयोगाने सुचविलेल्या प्रमुख १४ मागण्या अमान्य केल्यामुळे नागपूर हिवाळी अधिवेशन २०१२ या काळात उपोषण करुन मागण्यांचे निवेदन शासनास सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे ५ वर्षाचा कालावधी होवून सुध्दा अद्यापही या अहवालातील शिफारशींवर शासनाने कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींवर निर्णय घेवून त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशींपैकी आरक्षणविषयक शिफारशींसह १४ शिफारशी वगळता, उर्वरित शिफारशी दिनांक ३१ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्य करण्यात आल्या आहेत. त्या शिफारशींच्या अमंलबजावणी संदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मातंग समाजाची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी शासनाने क्रांतिवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाची नियुक्ती केली त्या आयोगाचा अहवाल 2008 मध्ये प्राप्त झाला. 31 डिसेंबर, 2011 ला शासनाने 82 पैकी 14 शिफारशी वगळता उर्वरित शिफारशी तत्वत: मान्य केल्या आहेत आणि त्या शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात कार्यवाही सुरु आहे असे उत्तरात नमूद केले आहे. 2008 मध्ये त्या आयोगाचा अहवाल आला आणि 2011 मध्ये तत्वता मान्यता दिली. याला एवढा वेळ का लागला ? या शिफारशींची अंमलबजावणी निश्चित कालमर्यादेमध्ये शासन करणार आहे का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37210.......

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या आयोगामध्ये अध्यक्ष व उपाध्यक्ष होते. या दोघांनी 2008 सालात वेगवेगळे अहवाल दिलेले आहेत. त्यानंतर दिनांक 26.8.2009 रोजी हा विषय मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आला होता. या अहवालामध्ये एकूण 82 शिफारशी होत्या. त्याचा अभ्यास करण्यासाठी मंत्रिमंडळाने अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्यामध्ये 20 सचिव हे सभासद होते. त्यांची व तज्ज्ञ लोकांची समिती नेमली होती. त्या समितीने दि.12.11.2009 पासून दि.2.11.2011 रोजीपर्यंत अभ्यास पूर्ण केल्यानंतर पुन्हा हा विषय मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आला. त्यानंतर दिनांक 31.12.2011 रोजी जी.आर.इश्यू केलेला आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, 2011 रोजी इश्यू केलेल्या जी.आर.ची अंमलबजावणी केव्हा सुरु होणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : अनेक विभागाशी संबंधित त्या शिफारशी आहेत. त्यापैकी 25 शिफारशी अस्तित्वात आहेत. त्याची अंमलबजावणी केली जात आहे. 14 शिफारशी अमान्य आहेत. त्यामुळे त्या स्वीकारण्याचा प्रश्न नाही. 14 शिफारशी वैयक्तिक स्वरुपाच्या आहेत. त्याशिवाय या महामंडळाला पूर्वी कमी भाग भांडवल दिले जात होते. सन 2009-10 मध्ये 20 कोटी रुपये, सन 2010-11 मध्ये 10 कोटी रुपयांचे भाग भांडवल दिले होते. त्यानंतर माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री झाल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक झाली होती. त्यानंतर सन 2011-12 मध्ये 10 कोटी रुपयांऐवजी 75 कोटी रुपये भाग भांडवल देण्यात आले. सन 2012-13 मध्ये 75 कोटी रुपये भाग भांडवल देण्यात आले. यातील बहुतेक शिफारशींची अंमलबजावणी या महामंडळामार्फत केली जाणार आहे.

---------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KTG/ D/

**मौजे पळसप (ता.जि.उस्मानाबाद) येथील जिल्हा परिषद शाळेतील संगणकामध्ये अश्लील फिल्म व फोटो असल्याबाबत.**

**(8) * 38300 श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नागो गाणार** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे पळसप (ता.जि.उस्मानाबाद) येथील जिल्हा परिषद शाळेतील संगणकामध्ये अश्लील फिल्म व फोटो असल्याचे माहे जानेवारी, 2013 च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शाळा व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील** : (1) होय.

(2) व (3) जिल्हा स्तरावर चौकशी करण्यात आली असून चौकशीत सदर शाळेतील दोन संगणकांवर आक्षेपार्ह प्रतिमा आढळून आल्या आहेत.

सदर प्रकरणी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माहिती व तंत्रज्ञानाची माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्हावी, जगाच्या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे म्हणून राज्य शासनाने जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये संगणकाच्या माध्यमातून शिक्षण ही योजना उत्तम प्रकारे राज्यामध्ये अंमलात आणली आहे. परंतु काही शाळांमधील शिक्षक वर्ग हे माहिती व तंत्रज्ञानासाठी उपलब्ध असलेले जे संगणक आहेत त्याद्वारे अश्लील चित्रफीती व चित्र बघत असल्याचा प्रकार उस्मानाबादच्या पळसप येथील शाळेत उघडकीस आलेला आहे. हा गुन्हा सिध्द झालेला आहे. त्या ठिकाणी चित्रे सापडलेली आहेत. परंतु गुन्हा मात्र अज्ञात व्यक्तीविरुध्द दाखल केल्याचे उत्तरात नमूद केलेले आहे. शाळेमध्ये संगणक आहेत, संगणक वापरणारे शिक्षक आहेत. परंतु गुन्हा अज्ञात व्यक्तीविरुध्द नोंदविलेला आहे. त्याऐवजी संबंधित शिक्षकांवर कारवाई केली जाणार आहे काय ?

सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना हे प्रकरण माहीत असल्याचे ते मला दर्शवित आहेत. ही घटना त्यांच्या गावात घडलेली आहे. गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णू, गुरुर्देवो महेश्वरा, गुरुसाक्षात परब्रम्ह, तस्मै श्री गुरुवे नम: असे आपण म्हणतो. परंतु शिक्षकच जर असा प्रकार

3...

ता.प्र.क्र.38300..... श्री.रमेश शेंडगे....

करीत असतील तर पुढच्या पिढीने काय करावयाचे ? जे शिक्षक आहेत, मुख्याध्यापक आहेत त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? ज्या अधिकाऱ्यांनी भेटी दिलेल्या आहेत त्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, प्रथेला व रुढीला सोडून माझी आपल्याला विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांच्याबरोबर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनाही आपण प्रश्न विचारण्यास परवानगी दिली तर पहिल्या प्रश्नाला उत्तर देणे सोपे होईल.

**सभापती** : मंत्री महोदयांनी विनंती केल्या प्रमाणे दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला एकत्रित उत्तर देणे सोपे व्हावे म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना परवानगी देत आहे.

श्री.विक्रम काळे : हे खरे आहे की, पळसप हे माझे राहते गाव आहे. माझ्या गावातील ही जिल्हा परिषदेची शाळा आहे. या घटनेची चौकशी झालेली आहे. ज्या कंपनीने ज्या दिवशी हे संगणक पुरविले होते त्या दिवसापासूनच ही अश्लील चित्रे होती असे निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे या प्रकरणाला कोणतेही शिक्षक व कर्मचारी यांचा हात नाही हे सिध्द झालेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38300... श्री. विक्रम काळे...

जिल्हा परिषदेने दोन्ही संगणक जप्त केलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणी कोणावरही कारवाई केली जाणार नाही काय ?

श्री. दिवाकर रावते : माझ्याही प्रश्नाचे मंत्री महोदयांनी एकत्रित उत्तर द्यावे. यामध्ये शिक्षकांचा दोष नाही असे सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितले. जेव्हा अश्लील चित्र शिक्षकांच्या निदर्शनास आले त्यावेळी शिक्षकांनी ते का डिलिट केले नाही ? ते चित्र मुलांना बघण्यासाठी संगणकावर का ठेवले ? तेव्हा ज्या शिक्षकाने ते चित्र डिलिट केले नाही त्या शिक्षकावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. जयंत पाटील : त्या गावामध्ये शेतकरी संघटनेची एक सभा घेण्यासाठी शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी अजित लाकाळ, विलास फुटाणे आणि एक शाळेचा माजी विद्याथी राजकुमार बादल यांनी मुख्याध्यापकांना विनंती केली की सभेसाठी जागा पाहिजे. एक ॲप्लिकेशन टाईप करण्यासाठी त्यांनी संगणक ॲक्सेस मागितला. मुख्याध्यापकांनी त्यांना संगणक ॲक्सेस करण्याची परवानगी दिली. शाळेच्या एका क्लार्कने त्यांना संगणकावर ॲप्लीकेशन टाईप करुन दिले. दरम्यान राजकुमार बादल यांनी दुसरा संगणक ऑपरेट केला. हेच लोक म्हणजे शाळा समितीचे अध्यक्ष, एक सदस्य आणि त्या शाळेचा माजी विद्यार्थी राजकुमार बादल हे दुस-या दिवशी सकाळी 10.00 वाजता त्या शाळेत आले. त्यांनी सांगितले की, आम्हाला तुमचा संगणक तपासायचा आहे. मुख्याध्यापकांनी कारण विचारले. त्यांनी सांगितले की, तुमच्या संगणकामध्ये काही तरी आक्षेपार्ह आहे अशी आम्हाला शंका आहे. त्यावेळी मुख्याध्यापकांनी त्यांना संगणक ॲक्सेस करण्याची परवानगी दिली. त्यानंतर त्यांनी सांगितले की, तुमच्या संगणावर तीन अश्लील चित्र आहेत. याबाबतीत ताबडतोबीने तक्रार करण्यात आली.

राजकुमार बादल याने जे संगणक हाताळले त्याच संगणकामध्ये या आक्षेपार्ह बाबी आढळल्या. त्यामुळे अशी शंका आहे की, हा राजकुमार पहिल्यांदा आला त्यावेळी त्यांने इंटरनेट ॲक्सेस करुन संगणकावर ती चित्रे लोड केली असावी. कारण दुस-या दिवशी त्याने स्वत: येऊन तक्रार केली. हा सर्व प्रकार शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांना सांगितला, त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सांगण्यावरुन पोलिसांमध्ये अश्लील छायाचित्राबाबत तक्रार दाखल करण्यात आली. त्यांनी तक्रार करताना कोणाचे नाव घेतले नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38300... श्री. जयंत पाटील....

त्यामुळे पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान संगणक तज्ज्ञांकडून या प्रकरणी तपासणी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील एनआयसीच्या तज्ज्ञांनी सांगितले की, एका संगणकावर इंटरनेट ॲक्सेस झालेला होता, त्या ॲक्सेसची तारीख ही संगणक शाळेला पुरविण्याच्या आधीची होती. तारखेमध्ये अदलाबदल करणे शक्य आहे असे संगणक तज्ज्ञांचे मत आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनीच ही एण्ट्री केली असावी अशी शक्यता आहे. तसेच या एण्ट्रीचा वापर दुस-या दिवशी मुख्याध्यापकांवर दबाव आणण्यासाठी केला असण्याची शक्यता आहे. पोलिसांकडे अज्ञात इसमाविरुध्द तक्रार केलेली आहे. पोलिसांनी तक्रारीची नोंद घेतलेली आहे. या प्रकरणी अद्याप एफआयआर दाखल केलेला नाही. मुख्याध्यापकांनी तेथील सहाय्यक पोलिस निरीक्षकांना दिलेल्या अर्जाची प्रत माझ्याकडे आहे. अशा स्वरुपाच्या सायबर गुन्ह्यामध्ये जी प्रोसिजर ॲडॉप्ट केली जाते ती ॲडॉप्ट करुन या गुन्ह्याचा तपास केला जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ MMP/ प्रथम श्री.शिगम 13:20

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी व अकरावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी व अकरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी व अकरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या जोडाव्यात. )

-----------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.** : औचित्याच्या मुद्दयाबाबतची माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्रीमती फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "शासन सेवेतील मागावर्गीय अधिकारी पदांच्या नियुक्ती करताना आरक्षणामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत" या विषयावरील श्री. किरण पावसकर,व.प.स.यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत दिनांक 16 डिसेंबर, 2010 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : आश्वासनाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची माहिती छापावी. )

-----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ D/ MMP/ MMP/ प्रथम श्री.शिगम 13:20

**पृ.शी.व मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक 31 मार्च, 2012 रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विविध महामंडळाचे अहवाल सी.डी.स्वरुपात उपलब्ध करुन देणे**

**सभापती** : सन 2013 च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनापासून विविध महामंडळाचे अहवाल माननीय सदस्यांनी केलेल्या विनंतीनुसार सी.डी.स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

सदर सी.डी.माननीय सदस्यांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाव्दारे वितरित करण्यात येईल.

-----------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.**: सन्माननीय सदस्यांच्या अधिकारांचे सरंक्षण करण्याबाबत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाजाची सुरुवात होताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी परवा जो प्रकार झाला त्यामुळे सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करण्यात आली होती. त्याबाबतीत राज्य शासनाने काय निर्णय घेतला आहे या संबंधीची माहिती विचारली होती, त्यावर प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर बघू असे आपण सांगितले आहे. या संबंधी राज्य शासनाचा निर्णय ऐकून घेण्यासाठी विधानसभा सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली आहे. जो प्रकार झाला त्या बाबतीत राज्य शासन ठोस असा निर्णय घेत नाही, तो निर्णय जाहीर होईपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करावी असे मला वाटते. या दृष्टीकोनातून आपण निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे विधानसभा सभागृहाने हा प्रश्न सोडविण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. त्या समितीमध्ये विधानसभा सभागृहाचे गट नेते सदस्य आहेत. या प्रश्नाच्या बाबतीत विचारविनियम करुन समिती आपला निर्णय अध्यक्ष आणि माननीय मुख्यमंत्र्यांना सादर करणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया दुपारी 2.00 वाजेपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. आज सकाळी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार व गट नेते आम्ही एकत्रित बसलो होतो. त्यावेळी आम्ही सभागृहाच्या कामकाजाबाबत चर्चा केली. सभागृहातील अत्यंत महत्वाचा भाग प्रश्नोत्तराचा आहे. तारांकित प्रश्नोत्तरे, नियम 93 अन्वयेच्या सूचना, लक्षवेधी सूचना, तसेच अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा अशा पध्दतीने सभागृहाचा कार्यक्रम होईल अशा प्रकारची चर्चा त्यावेळी झालेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सरकारच्या वतीने निवेदन होईपर्यंत सभागृहाचे कामकाज बंद ठेवावे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, एक सभागृह बंद असताना दुसऱ्या सभागृहाची बैठक सुरु असणे योग्य होणार नाही. संपूर्ण सभागृहाची ही भूमिका आहे की, खालच्या सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झालेली आहे. जो काही निर्णय होईल त्याबाबत आपल्या सभागृहाला देखील अवगत केले जाईल. त्या निर्णयानुसार या सभागृहाचे कामकाज सुरु करण्यास आमची हरकत राहणार नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शुक्रवार दिनांक 22 मार्च, 2012 रोजी एका महत्वाच्या विषयाबाबत दोन्ही सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यात आले त्या संदर्भात माननीय सदस्यांची भावना ही आहे की, या विषयाबाबत शासनाने संबंधितांवर तत्काळ कारवाई करुन सभागृहाला अवगत केले पाहिजे. त्या दिवशी कदाचित मंत्री महोदयांना तातडीने निर्णय घेणे शक्य झाले नसेल, परंतु आज सकाळी दोन्ही सदनाचे कामकाज सुरु झाल्यानंतर जो विषय अद्याप अनिर्णित आहे त्या दृष्टीकोनातून खालच्या सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित केलेली आहे. या सभागृहातील माननीय सदस्यांची भावना आहे की, या विषयाच्या अनुषंगाने शासनाने कोणताही निर्णय घेतला असेल तर तो निर्णय या सदनाला कळला पाहिजे. खालच्या सभागृहातील वरिष्ठ सदस्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमल्याचे आपण सांगितले आहे, त्याबाबत मी काही भाष्य करणार नाही. परंतु खालच्या सभागृहाची बैठक स्थगित करण्याचा निर्णय झाला तेव्हाच या सदनाचे कामकाज देखील स्थगित करणे आवश्यक होते. या सभागृहातील माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मंत्री महोदयांनी आजच या सभागृहात निवेदन केले पाहिजे, निर्णय सभागृहात जाहीर केला पाहिजे.

**सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.26 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड.अनिल परब)**

**तालिका सभापती (ॲड.अनिल परब )** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( दुपारी 2.00 ते 2.15 वाजेपर्यंत बैठक स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(स्थापतीनस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक एक तासा करिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.15 ते 3.15 वाजे पर्यंत स्थगित झाली.)

.............

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.अनिल परब )**

( काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 4.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.15 ते 4.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची बैठक सायंकाळी 4.45 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 4.00 वाजता सायंकाळी 4.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

( सभापतीस्थानी माननीय सभापती )

**पृ.शी.**: बांद्रा-वरळी सी-लिंकवर घडलेली घटना

**मु.शी.**: बांद्रा- वरळी सी-लिंकवर घडलेल्या घटनेच्या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांचे निवेदन

श्री. आर. आर. पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

दिनांक 18 मार्च, 2013 रोजी दुपारी 1.20 च्या दरम्यान बांद्रा-वरळी सी-लिंकवर घडलेल्या घटनेच्या वेळी आमदार श्री. क्षितीज ठाकूर व पीएसआय श्री. सचिन सूर्यवंशी यांच्यात निर्माण झालेल्या वादाचा मुद्दा त्याच दिवशी या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला होता आणि सदनाचे कामकाज सुध्दा दोन वेळा तहकूब करण्यात आले होते.

सभापती महोदय, ज्यावेळी मी सदनामध्ये आलो तेव्हा मी स्वत: त्यानी जे टेप करुन घेतले होते ते बघितले. सर्वच ज्येष्ठ सन्माननीय सदस्य माननीय उप सभापतींच्या दालनात उपस्थित होते. त्यावेळी मी सदनामध्ये येऊन पोलीस दलातील कोणत्याही अधिकाऱ्याने केवळ लोकप्रतिनिधींच्या बरोबरच नव्हे तर लोकांबरोबर सुध्दा चांगले वागावे, सभ्यतेने वागावे त्या गोष्टी मला इथे दिसल्या नाहीत असे सभागृहामध्ये मान्य करुन, दिलगिरी व्यक्त करुन या संपूर्ण घटनेची चौकशी करु आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठवू अशा पध्दतीचे आश्वासन या सदनामध्ये दिले होते. त्याला सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय अगदी पहिल्या क्षणालाच, ज्यावेळी त्यांनी करुन घेतलेली टेप बघितली, मोबाईलवरील क्लिपिंग बघितले त्याचवेळी मी या सदनामध्ये दिलगिरी व्यक्त करुन तो निर्णय घेतला होता. दुसऱ्या दिवशी झालेला प्रकार दोन्ही सदनाच्या सन्माननीय सदस्यांना आणि महाराष्ट्राला सुध्दा आता माहीत झालेला आहे. त्यानंतर लोकप्रतिनिधींच्या भावना सुध्दा तीव्र होत्या. एखाद्या अधिकाऱ्याला मारहाण करणे वगैरे गोष्टी सुध्दा योग्य झालेल्या नव्हत्या पण म्हणून पहिल्या घटनेचे महत्व कमी होत नाही. या सर्व घटनेची वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चौकशी करण्याचे आश्वासन मी या सदनामध्ये दिले होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. आर. आर. पाटील ....

सदर चौकशी डीसीपी श्री. निलेवाड यांनी करीत असताना आतापर्यंत जी चौकशी करण्यात आलेली आहे, त्या चौकशीतून त्यांनी जो प्राथमिक निष्कर्ष काढला आहे त्यातून ही गोष्ट स्पष्ट झ ालेली आहे की, एकंदरीत वापरण्यात आलेली पोलीस अधिकाऱ्याची जी भाषा होती ती अरेरावीची होती, अधिकाऱ्यास न शोभणारी होती आणि त्यांनी असभ्य वर्तन केलेले आहे ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. एक तर त्याला सक्तीच्या रजेवर आपण पाठविले होतेच पण दोन्ही सदनातील सदस्यांची भावना त्याला निलंबित करावे अशा पध्दतीची होती. सर्व सन्माननीय सदस्यांनी, जे नेहमी आक्रमक असतात त्यांनीही निलंबनाची मागणी केली होती पण शक्यतो कधी आक्रमक नसणारे सदस्य सुध्दा या अतिशय मोठ्या गंभीर बाबीच्या संदर्भात फार आक्रमक बनले होते. सदनाच्या भावना लक्षात घेऊन त्याला सक्तीच्या रजेवर पाठविले होते त्यात थोडासा बदल करुन ही चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : नियम 93 अन्वये आज ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी " दिनांक 22 मार्च, 2013 रोजी लोटे औद्योगिक वसाहतीमधील समर्थ इंजिनिअरींग या कंपनीमध्ये टोल्वीन नामक रसायन एका ड्रममधून दुसऱ्या ड्रममध्ये ओतत असताना निर्माण झालेल्या वायू बाधेमुळे कंपनीतील चार कामगार घुसमटल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी " राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी झाल्याने शेकडो लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचारी अतिरिक्त झाले असून या अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "कनिष्ठ महाविद्यालयातील 30 पायाभूत पदांना मान्यता न मिळाल्यामुळे त्या पदावरील शिक्षकांना सहा वर्षे वेतन न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी "आदिवासी विभागाकडून खरेदी करण्यात आलेला गहू व तांदूळ जास्त दराने खरेदी करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "राधानगरी धरणाच्या जुन्या वीजनिर्मिती केंद्रामध्ये किरकोळ बदल शक्य असताना शासनाच्या अधिकाऱ्यांनी बी.ओ.टी.तत्वावर खाजगी वीजनिर्मिती करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी "मे.महावीर रोडस् इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.या कंपनीने बोगस कागदपत्रे सादर करुन मुंबई महानगरपालिकेच्या अनेक रस्त्याच्या बांधकामांची कामे मिळविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "मौजे चिखले (ता.वाडा,जि.ठाणे) येथील ग्रासिम इंडिया प्रा.लि.या कंपनीने नाल्यावर भराव टाकून अनधिकृत बांधकाम करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**सभापती**..........

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिशन बाजोरिया यांनी "अकोला जिल्हा परिषद शिक्षण विभागातील निलंबित वरिष्ठ सहायक श्री.विलास शेगोकार यांच्याकडे जिल्हा परिषदेतील काही अधिकाऱ्यांनी 10 लाख रुपयांची लाच मागितल्यावरुन श्री.शेगोकार यांनी केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्रीमती शोभा फडणवीस, चंद्रकांत पाटील यांनी "मौजे मालाड (ता.बोरीवली) येथील सर्व्हे क्र.282, सीटीएस क्र.811 (अ) व 821 हा भूखंड सर्वश्री जगदेव तिवारी व रामचंद्र तिवारी यांच्या नावे असतानाही महाराष्ट्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्या जागेवर विकासकामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील दूधगंगा प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दूरवस्था" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 अन्वयेच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3.....

**पृ.शी. / मु.शी.** :राज्यात 138 बोगस अपंग-मतिमंद शाळांना अनुदान देण्याचा मंजूर केलेला प्रस्ताव रद्द करण्यात येणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यात 138 बोगस अपंग-मतिमंद शाळा असल्याचे उघडकीस आलेले आहे. या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. या बोगस शाळांनी नोंदणी करीत असताना जी कागदपत्रे दिली होती ती देखील बोगस होती. एवढा मोठा घोटाळा आहे. या शाळांना वित्त विभागाने परवानगी दिली आणि अनुदानही दिले होते. इतका मोठा घोटाळा होऊनही अद्याप कोणाविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही. ज्यांनी बोगस प्रस्ताव स्वीकारले आणि प्रस्ताव मान्य करुन परवानगी दिली, शाळांचे रजिस्ट्रेशन करुन घेतले त्या सर्व अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : ज्या संस्था अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा चालविण्यास पुढे येतात त्यांना केन्द्र शासनाच्या कायद्याप्रमाणे लायसन्स देणे आवश्यक आहे. परंतु अशा संस्थांना ग्रॅण्ट द्यायलाच पाहिजे असे बंधन नाही. मी सांगू इच्छितो की वित्त विभागाकडे जो प्रस्ताव गेला होता त्यावरुन हा 138 आकडा पुढे आलेला आहे. आपल्या राज्यामध्ये 737 अनुदानित संस्था आहेत. 2002पूर्वी असा निर्णय झाला होता की यापुढे जर अशा संस्थांना अनुदान द्यायचे असेल तर ते 2002 पूर्वीच्या संस्थांना द्यावे. 2002पूर्वीच्या लायसन्स असणा-या फक्त 5 संस्था होत्या. आता आम्ही ज्या जुन्या संस्था आहेत त्यांची अ, ब, क अशी वर्गवारी करुन मंत्रिमंडळापुढे जाणार आहोत. मंत्रिमंडळामध्ये त्याबाबतीत निर्णय घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. मागेल त्याला शाळा द्यायची असा केन्द्राचा कायदा आहे. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, कर्णबधिर व अस्थिव्यंग निवासी शाळा/कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना दरमहा रुपये 900/- व मतिमंद प्रवर्गासाठी रुपये 990/- प्रमाणे 10 महिन्याकरिता परिपोषण अनुदान देण्यात येते. माझा प्रश्न असा आहे की, अपंग, मतिमंदासाठी ज्या शाळा चालविल्या जातात त्या बोगस असतात. त्या शाळामधून अनेक मुलांचे लैंगिक शोषण होत असते. या बाबतीत संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : त्या शाळा अनुदानित नव्हत्या. लायसन्स देणे हा केन्द्र शासनाचा कायदा आहे. हा अनुदान देण्याचा विषय नाही तर लायसन्स देण्याचा विषय आहे. लायसन्स असल्या शिवाय शाळा चालवता येत नाही. 737 शाळांना 2002 पूर्वी अनुदान दिलेले आहे. नवीन शाळांना अनुदान द्यावयाचे असेल तर 2002च्या पूर्वीच्या शाळांचा विचार करण्यात येईल. 138 शाळा नॉर्म्स पूर्ण करीत नव्हत्या. याबाबतीत आम्ही मंत्रिमंडळापुढे जाणार आहोत. ज्या संस्था तीन वर्षापासून कार्यरत आहेत त्यांची जिल्हाधिका-यामार्फत चौकशी करण्यात येईल, त्यांचे ग्रेडिंग करण्यात येईल आणि ज्या चांगल्या संस्था असतील त्याबाबतीत मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेण्यात येईल.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी** : आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकांना 4 महिने वेतन न मिळणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे व नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. खंदारे 16:55

श्री. रामनाथ मोते : राज्यातील अनुदानित आयुर्वेद आणि युनानी महाविद्यालयातील जवळ जवळ 381 अध्यापकांना गेल्या 4 महिन्यापासून पगार मिळत नव्हता म्हणून मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. दोन वेळा पुरवणी मागण्यासाठी प्रस्ताव दिला होता, तो मंजूर झाला नाही म्हणून अध्यापकांना पगार देता आला नाही. आता पुरवणी मागणी मंजूर झाली आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. तेव्हा पुरवणी मागणीच्या अनुषंगाने जी रक्कम मंजूर झाली असेल त्यामधून 31 मार्च 2013 पर्यंत 8 दिवसामध्ये अध्यापकांना पगाराची व थकीत रक्कम देण्यात येईल काय ? तसेच भविष्यामध्ये नियमितपणे सेवा करणा-यांना पगारासाठी चार-चार महिने थांबावे लागणार नाही याची काळजी घेण्यात येईल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : शेवटच्या प्रश्नाच्या उत्तर "होय"असे आहे. 22 कोटी 43 लाख 73 हजार रुपये देणे बाकी आहे ते 31 मार्चच्या अगोदर दिले जाईल.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 अन्वयेच्या निवेदनासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गुरुवार, दिनांक 21 मार्च 2013 रोजी माझे एक 93चे निवेदन होते. माननीय मंत्री महोदय आल्यानंतर निवेदन करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी पीठासनावरुन सांगितले. गुरुवारी मंत्री महोदय आले नाहीत. त्यानंतर शुक्रवारी ते निवेदन सभागृहासमोर यावयास पाहिजे होते, परंतु ते आले नाही आणि आज देखील ते सभागृहासमोर आले नाही. उद्या तरी ते निवेदन सभागृहासमोर ठेवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : उद्या ते निवेदन सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनासंबंधी**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्ही नियम 93 च्या सूचना देतो. त्या सूचनांवरील निवेदने ही सभागृह संपण्याच्या दिवशी येतात. त्यामुळे त्या दिवशी सर्व निवेदनांवर चर्चा होत नाही. सभापती महोदय, नियम 93 अन्वये शासनास निवेदन करण्याचे आदेश दिले जातात. आतापर्यंत किती सूचना स्वीकारल्या आहेत व किती सूचनांच्या बाबतीत निवेदने प्राप्त झालेली आहत याची कृपया आम्हाला माहिती मिळावी. पुढचा आठवडयात शासकीय सुट्टया आहेत. त्यानंतरच्या आठवड्यात सुध्दा शासकीय सुट्टया आहत. सदरहू निवेदन आधी आली तर त्या अनुषंगाने अभ्यास करुन उप प्रश्न विचारुन आम्हाला न्याय पदरात पाडून घेता येतो अशी आमची धारणा आहे.

**सभापती** : या विषयाच्या बाबतीत आपण चर्चा केलेली आहे. शासनाकडून नियम 93 वरील निवेदने प्राप्त होण्याची संख्या फार कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. मी विधिमंडळ कार्यालयास सांगून मंत्रालयातील संबंधित विभागांना सूचना देण्यास सांगतो, तसेच जी निवेदने प्राप्त झाली नाहीत त्याची एक यादी मुख्य सचिवांना देऊन ही निवेदने उत्तरासह लवकरात लवकर सभागृहासमोर कशी येतील यासंबंधीची मी व्यवस्था करतो. मी मागच्या वेळी मुख्य सचिवांना कळवितो असे बोललो नव्हतो. यावेळेला मात्र मला मुख्य सचिवांना ॲड करावे लागले.

------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संबंधी**

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, राज्यातील मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षणाबाबतची ही लक्षवेधी सूचना आहे. सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे आज सभागृहात उपस्थित नाहीत. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने जे प्रश्न उपस्थित होतील, त्या प्रश्नाचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनी स्वत:हून उत्तर दिले तर आम्हाला भक्कम असे समाधान वाटेल. सभापती महोदय, आपण त्यांना सभागृहात उपस्थित होण्याबाबत विनंती केली व दोन्ही नेते सभागृहात आले तर हा प्रश्न निकाली निघू शकतो. कारण हा प्रश्न माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांच्याकडे अडकून पडलेला आहे. या प्रश्नाच्या बाबतीत इतर कोणाचीही अडचण नाही. त्यांच्या उपस्थितीतच या विषयातून मार्ग निघू शकतो असे मला वाटते. कृपया आपण त्यांना बोलवावे अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण ही सूचना मला माझ्या दालनात येऊन सांगितली. आज माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांना तातडीने सभागृहात बोलाविणे शक्य होईल असे मला वाटत नाही. या बाबतीत काय मार्ग काढता येईल यादृष्टीने मी जरुन विचार करीन.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. या राज्यातील फार मोठया समाजातील हा एक अत्यंत ज्वलनशील विषय आहे. तसेच तो अतिशय महत्वाचा विषय आहे. महाराष्ट्रातील हा सर्व समाज या प्रश्नाकडे डोळे लावून पाहतो आहे. सभापती महोदय, त्या समाजातील लोकांना या सभागृहाकडून अपेक्षा आहे. शासनाकडून जशी अपेक्षा आहे, तशी सभापती महोदय, आपणाकडून देखील या समाजाची अपेक्षा आहे. ज्या ज्या वेळी हा प्रश्न सभागृहात उपस्थित करण्याचा आम्ही प्रयत्न केला, त्या त्या वेळी त्या प्रश्नाला न्याय देण्याचे काम आपणच केले. या प्रश्नाच्या बाबतीत सरकारला बैठका घेण्यास भाग पाडले. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदय व्यवस्थितपणे उत्तर देतील यात

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

शंका नाही. परंतु या प्रश्नाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनीच उत्तर देणे अपेक्षित आहे. त्यांच्याकडूनच या विषयाच्या बाबतीत न्याय मिळणे शक्य आहे अन्यथा या विषयाला न्याय मिळू शकणार नाही. अनेक वर्षापासून हा विषय सभागृहात उपस्थित होतो आहे. त्यावेळी हा विषय शासनाच्या विचाराधीन आहे. या बाबतीत प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे अशा सरकारकडून साचेबंद उत्तर दिले जाते. आज सुध्दा निवेदनात तशाच प्रकारचे उत्तर शासनाकडून दिले गेलेले आहे. त्या निवेदनातून काहीही निष्पन्न होत नाही. माननीय मुख्यमंत्री महोदय येईपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी व माननीय मुख्यमंत्री सभागृहात आल्यानंतर ती चर्चेला घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सदर लक्षवेधी सूचनेवरील चर्चा होऊ द्यावी असे मला वाटते. (अडथळा) हा अतिशय महत्वाचा विषय आहे याची मला कल्पना आहे. कामगारांशी संबंधीत विषय आहे. मी या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहात एका तासाची चर्चा स्वतंत्रपणे घेईन. त्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांना जरुर कळविन की, या चर्चेच्या वेळी आपण सभागृहात उपस्थित राहिलात तर त्या प्रश्नाला न्याय मिळेल.

श्री. विनायक मेटे : अध्यक्ष महाराज.....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ठीक आहे. आजच्या कामकाजपत्रिकेतील पहिल्या लक्षवेधी सूचनमध्ये माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांचे नाव प्रथम आहे. या विषयावर जर एक तासाची वेगळी चर्चा घेण्याचा निर्णय झाला तर त्याच वेळी हा विषय चर्चेला घ्यावा अशी सभागृहाची इच्छा आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझी एवढीच विनंती आहे की, त्या प्रस्तावावरील चर्चेची सुरुवात करण्याची संधी मला मिळावी.

**सभापती** : होय. त्या चर्चेची सुरुवात आपल्याला करावी लागेल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझी आणखी एक विनंती होती की, त्या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री हे सभागृहात उपस्थित राहतील अशी व्यवस्था करावी.

**सभापती** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक-2 चर्चेला घेण्यात येत आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : बीड जिल्हयातील आदित्य व मिठ्ठलालजी सारडा या पॉलिटेक्नीक महाविद्यालयांनी मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत केलेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : बीड जिल्हयातील आदित्य व मिठ्ठलालजी सारडा या पॉलिटेक्नीक महाविद्यालयांनी मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत केलेला भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री विनायक मेटे, राजेंद्र जैन, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री किरण पावसकर, सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड येथील (जि.बीड) आदित्य पॉलिटेक्नीक व मिठ्ठलालजी सारडा पॉलिटेक्नीक महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ८०० असणे, यात मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दाखविण्यात येणे, या विद्यार्थ्यांना केंद्र शासनामार्फत शिष्यवृत्ती मिळत असणे, परंतु या दोन्ही महाविद्यालयात बनावट मागासवर्गीय दाखवून त्यांच्या नावावर केंद्र शासनाकडून मिळालेल्या करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होत असणे, वास्तविक पाहता ८० ते ९० टक्के विद्यार्थी परिक्षेला बसणे आवश्यक असताना फक्त १६ ते १७ टक्के विद्यार्थीच परिक्षेला बसणे, या दोन्ही महाविद्यालयांविरुध्द बऱ्याच तक्रारी असणे, मागासवर्गीय अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भ्रष्टाचार करणाऱ्या महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3..

लक्षवेधी सूचना क्रमांक-2............

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेबाबत शासनाने जे निवेदन सादर केले आहे ते 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशा प्रकारचे आहे. बीड जिल्हयामध्ये दोन पॉलिटेक्नीक आहेत तेथे शासकीय यंत्रणा आणि संस्था चालक यांनी संगनमताने करोडो रुपयांची जी लूट चालविली आहे त्याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे. महाराष्ट्रात अशी अनेक उदाहरणे आपल्याला पहावयास मिळतात.

सभापती महोदय, बीड जिल्हयात आदित्य पॉलिटेक्नीक व मिठ्ठुलालजी सारडा पॉलिटेक्नीक मार्फत विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या अधिक दाखवून परीक्षेचे फॉर्म अधिक संख्येने भरण्यात आले आणि प्रत्यक्षात फक्त 15 ते 20 टक्केच विद्यार्थ्यांना परीक्षेला बसविले गेले. शासनाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता जो निधी दिला जातो त्या निधीची लूट करण्याचे काम या दोन्ही शैक्षणिक संस्थांकडून केले गेले आहे. प्रत्येक वर्षी 4 ते 5 कोटी रुपयांची लूट या दोन्ही संस्था चालकांनी केली आहे. सन 2010-11 व 2001-12 या दोन वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेश संख्या किती होती, प्रत्यक्षात किती विद्यार्थी परीक्षेला बसले याची आकडेवारी शासनाने जाहीर केली तर खूप मोठा आर्थिक भ्रष्टाचार बाहेर येण्यास मदत होईल.

सभापती महोदय, केवळ बीड जिल्हयात नव्हे तर राज्यातील 14 ते 15 जिल्हयांमध्ये या संस्थांनी आपले एजंट नेमलेले आहेत. या शैक्षणिक संस्थांमध्ये 15 जिल्हयातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. या पॉलिटेक्नीकमध्ये वयाच्या 35 व्या वर्षी देखील प्रवेश मिळविलेले विद्यार्थी आढळून येतील. तेथील सगळ्या विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर माझ्याकडे उपलब्ध आहेत. ते मी मंत्री महोदयांना देण्यास तयार आहे. करोडो रुपयांच्या शासकीय निधीची लूट करणाऱ्या शासकीय अधिकारी आणि संस्था चालक यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन अपहार केलेल्या निधीची वसुली करण्यात येईल काय?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2एक्स.1...

श्री. शिवाजीराव मोघे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा व तांत्रिक मुद्दा उपस्थित केलेला आहे. विद्यार्थ्यांनी ऑन लाईन फॉर्म भरले असले तरी सन 2012-2013 या वर्षामध्ये कोणत्याही विद्यार्थ्यांना स्कालरशीप तसेच कॉलेजला कोणत्याही प्रकारची शैक्षणिक सुविधा देण्यात आलेली नाही. या विषयाच्या संदर्भात शिक्षण विभागाकडून सुध्दा माहिती घेण्यात आलेली आहे. त्यामुळे बीड जिल्हयातील आदित्य पॉलिटेक्नीक व मिठालालजी सारडा या या पॉलिटेक्नीक महाविद्यालयांची चौकशी केली जाईल. सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली असून प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण, नाशिक हे या समितीचे अध्यक्ष राहणार असून सह संचालक तंत्र शिक्षण पुणे, प्राध्यापक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद तसेच संगणकीय तज्ज्ञ, उपसंचालक लेखा, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण,बीड हे सदस्य राहणार आहेत. या ठिकाणी जो प्रकार झालेला आहे तसा प्रकार राज्यात इतरत्र होऊ नये यासाठी या प्रकरणाची सविस्तर चौकशी होणे आवश्यक आहे. सदर समितीचा चौकशी अहवाल दीड महिन्यात सादर केला जाईल. यामध्ये विद्यार्थ्यांच्या नावावर पैसे लाटण्याचा प्रयत्न झाला असेल तर संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थी तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शासनाकडून जी शिष्यवृत्ती मिळते त्यामध्ये बोगस नावे दाखवून पैसे लाटण्याचा प्रकार झालेला आहे. सन 2012-2013 मध्ये या संस्थाना कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती किंवा फायदा देण्यात आलेला नाही असे माननीय मंत्री महोदयांनी आताच सांगितले आहे. परंतु सन 2010-2011, 2011-2012 या दोन वर्षामध्ये समाजकल्याण खात्याकडून या महाविद्यालयातील किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली व त्यासाठी एकंदर किती रुपये खर्च झालेले आहेत ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सदर माहिती उत्तरात दिलेली आहे..

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचनेचे उत्तरच चुकीचे देण्यात आलेले आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 647 विद्यार्थ्यांना ई-स्कालरशिप आणि शिष्यवृत्ती दिलेली आहे. परंतु प्रत्यक्षात 800 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ई-स्कालरशिप आणि शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. माननीय मंत्री महोदयांना विभागाकडून चुकीची माहिती पुरवली जात आहे. एका

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ......

एका वर्षात 6 कोटी 29 लक्ष 70 हजार रुपये विद्यार्थ्यांच्या नावाने पैसे उचलून भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे. प्रत्येक वर्षी अशाच प्रकारे पैसे उचलले गेले आहेत. यामध्ये अधिकारी तसेच संस्थाचालक सामील आहेत. असे असतांनाच या दोषी लोकांचाच आपण कमिटीमध्ये सहभाग घेतलेला आहे.

श्री. शिवाजीराव मोघे :सभापती महोदय, ...

**सभापती** : सन्माननीय सदस्य जे काही प्रश्न उपस्थित करीत आहेत त्या प्रश्नांना अचूक उत्तरे देण्याची आवश्यकता आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ऑनलाईन विद्यार्थ्यांनाच फायदा देण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्यामध्ये शंकेला भरपूर स्कोप असल्यामुळे सदर प्रकरणात योग्य ती कारवाई होण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आलेली असून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल हे मी अगोदरच सांगितले आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जो प्रश्न विचारला आहे त्याला वेगळेच उत्तर देण्यात आलेले आहे. विद्यालयात एकंदर 800 विद्यार्थी असून त्यातील 80 ते 90 टक्क्के विद्यार्थ्यांनीच फॉर्म भरलेले आहेत. परंतु परीक्षेला केवळ 16-17 टक्के विद्यार्थीच बसलेले आहेत. 80 ते 90 टक्के विद्यार्थी परीक्षेला बसलेले नसतांनाही त्यांनी फी लाटून घेतली आहे. शासनाच्या पैशांचा दुरुपयोग झालेला आहे असे आमचे म्हणणे आहे. त्यामुळे अशा रितीने अगोदरच्या तीन वर्षात किती विद्यार्थी बोगस होते व अशा विद्यार्थ्यांवर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या कॉलेजमध्ये विद्यार्थी प्रवेश घेतात व परीक्षेला बसत नाहीत हे आढळून आल्यामुळे चौकशी समिती नेमण्यात आली आहे. स्कालरशीपची रक्कम संस्थांना मोठया प्रमाणात मिळत असते त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

चौकशीमध्ये गुन्हेगारी, फौजदारी, रिकव्हरी स्वरूपाचे जे काही फाईंडीग येईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, यात समाजकल्याण विभागाचा फार मोठा घोटाळा आहे. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे म्हणाले की, काही एजंट नेमलेले आहेत. तेव्हा खरोखर यात एजंट नेमले आहेत काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांऐवजी दुसऱ्या विभागातील उच्च पदस्थ अधिकाऱ्याची नेमणूक करून शासन या प्रकरणाची चौकशी करणार आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सहसंचालक, तंत्र शिक्षण, पुणे हे आमच्या विभागाचे अधिकारी नाहीत. प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद हे संगणकीय विषयाचे तज्ज्ञ आहेत. ते देखील आमच्या विभागाचे नाहीत. यावरून असे दिसून येईल या चौकशीमध्ये दुसऱ्या विभागाचे अधिकारी आहेत. असे प्रकार कुठे कुठे होत आहेत त्याची चौकशी करणे आमचे काम आहे. त्यामुळे अशा प्रकरणांची चौकशी करण्यासाठी आम्ही देखील इंटरेस्टेड आहोत. त्यामुळे ही चौकशी नीट होईल. यात कुणालाही फेव्हर करण्याचे काम नाही.

ॲड्.जयदेवराव गायकडवाड : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचा बोगस संस्था चालविणे अतिशय गंभीर आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सवलती मिळत असल्यामुळे एका बाजूला खूपच चर्चा होतात. हे एक प्रकारचे षडयंत्र आहे. पाच कॉलेजना मिळून एकच वर्कशॉप आहे. एकाच इमारतीत तीन कॉलेजेस भरविण्यात येतात. विद्यार्थ्यांकडे टी.सी.नाही. इतक्या भयंकर गोष्टी असल्यामुळे त्या बाबतची चौकशी समाजकल्याण विभागच करणार आहे. चौकशी अधिकारी हे दुसऱ्या जिल्ह्यातील अन्य विभागातील असले तरी चालतील. त्याने काही फरक पडत नाही. एकाच विभागाचे अधिकारी असले की, संगनमत होऊ शकते. या प्रकरणाची चौकशी अतिशय कठोरपणाने केली पाहिजे. यासाठी ज्युडिशिअरीमधील माणसे आणावीत. सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात यावी. नि:पक्षपातीपणे चौकशी होण्यासाठी शासन अन्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडे ही जबाबदारी निश्चित करणार आहे काय ?

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, संपूर्ण देशात आपल्या राज्यानेच ऑनलाईन सिस्टीम आणली आहे. पूर्वी अनेक कॉलेजेस विद्यार्थ्यांचे पैसे कापून घेत होते. त्या मुलांना वर्षाकाठी देखील पैसे मिळत नव्हते. ऑन लाईन सिस्टीममुळे या सर्व गोष्टी बंद झाल्या आहेत. आता विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट पैसे जमा होतात. हा घोटाळा संस्थेने केला आहे अशी शंका व्यक्त करण्यात आली आहे. सदर कमिटी कोणालाही फेव्हर करणार नाही. नि:पक्षपातीपणे चौकशी होईल. चौकशीमध्ये जे फाईंडींग येईल त्या प्रमाणे कारवाई होईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वपूर्ण अशी लक्षवधी सूचना उपस्थित केलेली आहे. या लक्षवेधी सूचनाला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी असे सांगितले की, या प्रकरणी चौकशी करण्यात येईल व त्यात जे काही निष्पन्न होईल त्यानुसार कारवाई करण्यात येईल. त्यांनी असेही सांगितले की, फौजदारी कारवाई करण्यात येईल. तेव्हा माझे स्पेसिफिक प्रश्न असे आहेत की, ही चौकशी किती दिवसात पूर्ण करण्यात येईल आणि सदर चौकशी आपण सीआयडी मार्फत करून त्यात फाईंडीग्ज निघाले तर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, यात खूप मोठा अर्थव्यवहार आहे. यात बदमाशी देखील आहे. हे सर्व सिद्ध झाले तर कायद्यामध्ये जी तरतूद असेल त्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, समाजकल्याण अधिकाऱ्याकडे 647 जणांचे ऑनलाईनद्वारा अर्ज प्राप्त झालेले आहेत. शासनाने येथे उत्तर दिले आहे की, ते अर्ज आमच्याकडे प्राप्त झालेले नाहीत. समाजकल्याण अधिकारी, बीड यांच्या मेलवर एवढे अर्ज येऊन सुद्धा या महाविद्यालयाने आपल्याकडे काहीच अर्ज का दिलेले नाहीत, याची चौकशी त्या अधिकाऱ्याने केलेली नसल्यामुळे शासन त्या अधिकाऱ्याची चौकशी करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, विद्यार्थी जेव्हा ऑनलाईन फॉर्म भरतो तेव्हा कॉलेजने सर्टिफाय करायचा असतो. त्यानंतर ते अर्ज आमच्या समाजकल्याण खात्याकडे येतात. ते अर्ज आमच्याकडे आलेच नाहीत. त्यामुळे शिष्यवृत्ती देण्याचा प्रश्न नाही. संस्थेला देखील पैसे द्यावे लागतात. सदर गडबड ही त्यांच्या लक्षात असल्यामुळे त्यांनी देखील हे फॉर्म पुढे पाठविलेले नाही. असा हा प्रकार घडलेला आहे.

..3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले आहे त्यातच खरी गोम आहे. ऑन लाईन अर्ज कॉलेज फायनल केल्यानंतर ते समाजकल्याण विभागाकडे शिष्यवृत्तीसाठी येतात.

यानंतर श्री.अजित....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ D/ पूर्वी श्री.भारवि... 17:20

श्री.विनायक मेटे.....

कॉलेजेस बोगस फॉर्म भरुन, त्यावर शिक्के मारुन ते फॉर्म समाज कल्याण विभागाकडे पाठविते. या मध्ये समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना देखील सामावून घेतलेले असल्यामुळे ते देखील त्या फॉर्मवर शिक्के मारतात. म्हणजे हे सर्व मिलीभगत आहे. हा प्रकार गेल्या काही वर्षापासून सुरु आहे. विद्यार्थ्यांच्या नंबरपासून ते कोणते विद्यार्थी परीक्षेस बसले होते याची माहिती मी मंत्री महोदयांना देतो. ही माहिती तपासली तर प्रत्येक वर्षी करोडो रुपयांचा घोटाळा झाल्याचे दिसून येईल. असे असताना जे या घोटाळ्यामध्ये भागीदार आहेत त्या अधिकाऱ्यांचीच चौकशी समिती नेमत आहात. मग त्या चौकशी समितीला काय अर्थ राहणार आहे आणि त्यातून काय निष्पन्न होणार आहे ? शासनाने अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमली तर न्याय मिळू शकणार नाही. माझा प्रश्न आहे की, या प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत करण्यात येईल काय तसेच या प्रकरणी जे अधिकारी दोषी आहेत त्यांना निलंबित करणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल आणि त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, श्रीमती सोनिया गांधी आणि श्री.राहुल गांधी यांनी "कॅश फार सबसिडी" पध्दत सुरु केली आहे. ही पध्दत फक्त सहा जिल्ह्यांपुरती मर्यादित आहे. आपल्या राज्यात समाजकल्याण विभागातील गडबडी लक्षात घेता शासन "कॅश फॉर सबसिडी" पध्दत सुरु करणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, आपण ही पध्दत स्कॉलरशीपच्या माध्यमातून दोन वर्षापूर्वी सुरु केलेली आहे. त्यांनी ही पध्दत आता सुरु केलेली आहे. आधारकार्डाची आता सुरुवात झालेली आहे. आपण ही योजना सहा जिल्ह्यात लागू केली आहे. परंतु अजून पेमेंट झालेले आहे. तेव्हा ते रेग्युलर होणे आवश्यक आहे. 70-80 टक्के झालेले आहे फक्त 20 टक्के मॅच होत नाही. त्यामध्ये थोडा प्रॉब्लेम झालेला आहे. ते रेग्युलर झाल्यास सर्व बाबी ऑनलाईनने होणार आहेत.

------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनेबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण माझी लक्षवेधी सूचना स्वीकारली त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, मला जे पत्र आले ते वाचून दाखवितो. लक्षवेधी सूचना, अतितत्काळ. कालमर्यादा 25 मार्च 2013 याचा अर्थ संबंधित विभागाने आपल्याकडे दिनांक 25 मार्च 2013 पर्यंत उत्तर पाठवावे असा होतो. या पत्राच्या खाली दिलेली टीप ही सर्वच लक्षवेधी सूचनांच्या बाबतीत असेल तर ती गंभीर बाब आहे. कारण त्यामध्ये म्हटले आहे की, "सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण. माननीय सभापतींनी चालू अधिवेशनासाठी ही सूचना वरील स्वरुपात स्वीकृत केली आहे. या सूचनेवरील निवेदन सभागृहात केव्हा करावे लागेल ती तारीख मागावून कळविण्यात येईल." वर टाईम लिमिट दिलेले आहे. म्हणजे त्यावेळेत उत्तर आले पाहिजे. पुढें नमूद केले आहे की, "वरील लक्षवेधी सूचना चर्चेस न आल्यास अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी निवेदनाच्या 250 प्रती अधिवेशन संपण्याच्या अगोदर एक दिवस या सचिवालयास पाठवाव्यात." म्हणजे आपण या तळटीपेमध्ये सांगितलेले आहे की, लक्षवेधी सूचनेवरील निवेदन नाही दिले तरी चालेल. अधिवेशन संपण्याच्या अगोदर एक दिवस अगोदर पाठवा. म्हणजे आम्ही त्यांना गठ्ठे देऊ. असे असेल तर आम्हाला लक्षवेधी सूचनेची उत्तरे काय मिळणार आहेत ?

**सभापती** : ही गंभीर चूक आहे. ही चूक सुधारली पाहिजे, परंतु अशी चूक का झाली याची देखील चौकशी केली पाहिजे. मी यामध्ये जरुर लक्ष घालतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील संगम व 18 खेडी पाणीपुरवठा योजना मागील सात वर्षापासून बंद असणे

**मु. शी.** :बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील संगम व 18 खेडी पाणीपुरवठा योजना मागील सात वर्षापासून बंद असणे या संबंधी सर्वश्री धनंजय मुंडे व अमरसिंह पंडित ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. धनंजय मुंडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील संगम व 18 खेडी पाणीपुरवठा योजना गेल्या 7 वर्षांपासून बंद असणे, या योजनेवर आतापर्यंत 13 कोटी 77 लाख रुपये खर्च होऊन ही योजना केवळ दोनच वर्षे सुरु राहणे, 7 वर्षापासून योजना बंद असल्यामुळे योजनेवर अवलंबून असणाऱ्या 18 गावांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत असणे, योजनेमध्ये समाविष्ट असलेली गावे परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील असून या योजनेचे शुध्द पाणी मिळत नसल्याने या गावातील नागरिकांना औष्णिक विद्युत केंद्राच्या राखेच्या प्रदूषणामुळे प्रदूषित झालेले विहिरीतील पाणी प्यावे लागणे, त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येणे, ही योजना सुरु व्हावी या करिता नागरिकांकडून वारंवार मागणी होत असणे, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. रणजित कांबळे ( पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील संगम व 18 खेडी पाणी पुरवठा योजना संबंधीची ही महत्वपूर्ण लक्षवेधी सूचना आहे. परळी तालुक्यातील संगम आणि 18 खेड्यातील जवळपास 65 हजार ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून ही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आली. परंतु ही योजना मागील सात वर्षापासून बंद आहे. दिनांक 20 डिसेंबर 1997 रोजी या पाणी पुरवठ्याच्या कामास प्रशासकीय मंजुरी मिळाली. दिनांक 1 एप्रिल 2004 रोजी ही योजना पूर्ण झाली. या पाणी पुरवठा योजनेसाठी 14 कोटी रुपये खर्च करण्यात आले. ही योजना सुरु होऊन दोन वर्षात म्हणजे दिनांक 3 एप्रिल 2006 रोजी बंद पडली.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, 19 गावांपैकी 4 गावांत जलस्वराज्य योजनेतून स्वतंत्र पाणी पुरवठा योजना घेण्यात आल्या असून त्या गावांना पाणी पुरवठा सुरु आहे. चार गावांना जुन्या कायमस्वरुपी योजनेमधून पाणी पुरवठा होत आहे. उर्वरित 11 गावांना अस्तित्वातील विहीर हातपंत व विद्युत पंप याद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. महोदय, सबंध महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडलेला असताना बीड जिल्ह्यातील परळी आणि आंबेजोगाई हे दोन तालुके वगळता उर्वरित तालुक्यांतही दुष्काळ आहे. या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, त्या भागात आणेवारीची अट लावली जाणार नाही. परंतु आज वस्तुस्थिती अशी आहे की, 18-19 गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. महोदय, या योजना सुरु करण्यासाठी 1.50 कोटी रुपये लागणार आहेत. हा निधी उपलब्ध करुन दिल्यास 65 लाख लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. या निमित्ताने माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या योजना सुरु करण्यासाठी शासन 1.5 कोटी रुपये उपलब्ध करुन देऊन त्या लोकांना न्याय देणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली ती अंशत: खरी आहे. ही योजना 2003 मध्ये पूर्ण झाली होती. 2004 मध्ये या योजनेचे संयुक्त इन्स्पेक्शन होऊन, दि.1 एप्रिल, 2004 रोजी ती जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केली. 2004 ते 2006 या कालावधीत ही योजना जिल्हा परिषदेने चालविली. परंतु योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत एक पैशाची सुध्दा रिकव्हरी झाली नाही. त्या योजनेचे 40 लाख रुपयांचे पाणीपट्टीचे बिल थकीत आहे. शिवाय त्या काळात एमएसईबीचे 87 लाख रुपयांचे बिल थकीत होते. ही देयके न भरल्यामुळे योजना बंद झाली. महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, जलस्वराज्य योजनेमध्ये 4, वैयक्तिक पाणी पुरवठा योजनांमध्ये 4, एनआरपीडब्ल्यूपीमध्ये 1 योजना सुरु आहे. दोन गावांमध्ये लघु पाणी पुरवठा योजना आणि इतर गावांमध्ये बोअर आणि अन्य माध्यमातून पाणी पुरवठा सुरु आहे. सदरहू योजना जिल्हा परिषदेला हस्तांतरित केल्यानंतर गेल्या दोन वर्षात एकही पैसा आतापर्यंत वसूल झाला नाही. महोदय, लोणी गावामध्ये जलस्वराज्य योजनेंतर्गत नवीन योजना सुरु करण्यात आली होती. ती योजना सुध्दा एमएसईबीचे बिल न भरल्यामुळे बंद

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

झाली. ही वस्तुस्थिती आहे. आजच्या घडीला काही गावांमध्ये पाणी आहे आणि काही गावांमध्ये कमी प्रमाणात पाणी आहे. सभापती महोदय, त्या गावांमध्ये पाणी टंचाई भासली तर तेथे टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, टँकरच्या माध्यमातून त्या गावांमध्ये पाणी पुरवठा करण्यात येईल. महोदय, पाऊस पडण्यास अजून तीन महिन्यांचा वेळ आहे. महोदय, 19 गावांमध्ये टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास एका गावाला टँकरपोटी 10 लाख रुपयांचा खर्च येईल. त्यानुसार 19 गावांसाठी 1 कोटी 90 लाख रुपये खर्च येईल. माझी विनंती आहे की, 1 कोटी 90 लाख रुपये नव्हे तर 1 कोटी 50 लाख रुपये दिले तर 19 खेडी पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊ शकेल. या योजनेची केवळ दोन वर्षांची 40 लाख रुपयांची पाणीपट्टी थकीत आहे. शिवाय दोन वर्षांचे 90 लाख रुपये विद्युत देयक थकीत आहे. हे देयक 2005 पूर्वीचे आहे आहे. ही योजना बंद पडून 7 वर्षे झाली आहेत. त्या भागातील लोकांची मागणी आहे की, 90 लाख रुपयांपैकी 67 टक्के वीज बिल शासनाने भरले तर उर्वरित 33 टक्के बिल आम्ही भरण्यास तयार आहोत.

नंतर श्री.बरवड....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री. धनंजय मुंडे ....

पाणीपट्टीचा जो विषय आहे त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती पाहता आता पाणीपट्टीची मागणी करणे योग्य नाही. आपण त्या ठिकाणी जर योजना चालू केली आणि पाणी दिले तर त्या ठिकाणच्या सर्व ग्रामपंचायती आणि गावातील लोक पाणीपट्टी सुध्दा भरतील. शासन दीड कोटी रुपये देऊन ही योजना चालू करणार का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झालेली आहे. आता त्यांनी सेस फंडातून अभय योजनेच्या माध्यमातून एमएसईबीचे 33 टक्के बिल भरले तर एमएसईबीचे बिल पूर्ण होऊ शकेल. पाणीपट्टीचे जे 40 लाख रुपये थकीत आहेत. मागे माननीय ॲड. उषा दराडे यांनी बैठक घेतली होती त्यावेळी सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच यांना बोलविले होते आणि असे सांगितले की, किमान 20 लाख रुपये सर्व ग्रामपंचायतींनी मिळून भरावेत, आम्ही योजना चालू करु. मागे आपलीही बैठक झाली होती त्यावेळी झालेल्या चर्चेत आपण मला ग्वाही दिली होती की, ग्रामपचायतीच्या माध्यमातून आम्ही 20 लाख रुपये भरण्यास तयार आहोत. आपण सर्व ग्रामपंचायतींनी मिळून 20 लाख रुपये भरावेत. ही योजना दुरुस्त करण्यासाठी 1 कोटी 65 लाख रुपये लागणार आहेत. कारण त्या ठिकाणी मोटारपंप, डीपी वगैरेची पुष्कळ चोरी झालेली आहे. त्यामुळे ही योजना दुरुस्त करण्यासाठी 1 कोटी 65 लाख रुपये लागणार आहेत. आपण जर या दोन अटी आणि शर्ती पूर्ण केल्या तर 1 कोटी 65 लाख रुपये खर्च करुन योजना चालू करण्यात येईल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आजच्या टंचाईच्या परिस्थितीमध्ये शासनाकडून या दोन्ही अटी घालणे योग्य होणार नाही. पाणीपट्टीच्या संदर्भात जी अट आहे ती मान्य आहे पण आज टंचाईमध्ये पाण्याची व्यवस्था करण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी वेगवेगळ्या योजना करीत आहे. कॅनॉलने सुध्दा पाणी आणत आहे. या 19 गावातील दुरुस्तीसाठी दीड कोटी रुपये टंचाईतून मागत आहोत. ही विनंती शासनाने मान्य करावी. पाणीपट्टी मिळाल्याशिवाय योजना चालू करु नये पण योजनेची दुरुस्ती करावी. शासनाला पाणीपट्टी मिळेल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आपण योजना चालू केली तरी जोपर्यंत एमएसईबीचे बिल भरणार नाही तोपर्यंत ते कनेक्शन देणार नाहीत. त्यामुळे आपण अभय योजनेचा लाभ घेऊन जर एमएसईबीचे 33 टक्के बिल भरले आणि पाणीपट्टीचा काही भाग दिला तर या टंचाईमध्ये दुरुस्तीचे काम निश्चितपणे पूर्ण करण्यात येईल अशी मी ग्वाही देतो.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण त्या ठिकाणी जो दुरुस्तीचा खर्च करणार आहात तो मंजूर करावा. ते मंजूर केल्यानंतर काम चालू करावे. त्या काळामध्ये 19 ग्रामपंचायती आपल्याकडे 20 लाख रुपयांची पाणीपट्टी भरण्यास तयार आहेत.

श्री. रणजित कांबळे : आपल्याला एमएसईबीचे बिल अगोदर भरावेच लागेल. आम्ही तातडीने काम चालू करु. आपण कमीतकमी एमएसईबीचे बिल भरावे कारण योजनेचे काम पूर्ण केल्यानंतर जर एमएसईबीचे बिल भरले नाही तर काहीही फायदा होणार नाही. मी स्वत: सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करुन सकारात्मक मार्ग काढण्यात येईल. आपल्या भागातील टंचाई लक्षात घेता आपण बसून यातून मार्ग काढू.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व 5 नंतर घेण्याबाबत**

**उप सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली अनुक्रमांक 4 वरील लक्षवेधी सूचना आज होणार नाही तसेच लक्षवेधी सूचना देणारे सन्माननीय सदस्य आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे अनुक्रमांक 5 वरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. यानंतर अनुक्रमांक 6 वरील लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

**पृ. शी.**: राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील दरपत्रकात वाढ करण्याची आवश्यकता

**मु. शी.**: राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील दरपत्रकात वाढ करण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, धनंजय मुंडे, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री किरण पावसकर, नरेंद्र पाटील, निरंजन डावखरे, राणा जगजितसिंह पाटील, दीपकराव साळुंखे, संदीप बाजोरिया, हेमंत टकले, अनिल भोसले, नितीन गडकरी, नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सतीश चव्हाण ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने जीवनदायी आरोग्य योजनेचे नाव बदलून "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना" असे करणे, या योजनेमध्ये बहुतांश आजारासाठी निश्चित केलेले दर हे बाजार भावापेक्षा फारच कमी असणे, ॲन्जीओप्लास्टीसाठी फक्त रु.60,000/- निश्चित केलेले असणे, मात्र यासाठी लागणाऱ्या स्टेंट ची किंमत रु.1,05,000/- असणे, परंतु शासकीय दर कमी असल्याने बहुतांश रुग्णांना उपचार घेते वेळेस कमी दर्जाचा स्टेंट वापरावा लागणे, याच बाबतीत केंद्र शासनाने निश्चित केलेला दर हा रु.1,27,650/- असून त्या व्यतिरिक्त दवाखाना, डॉक्टर, ऑपरेशन व औषधी व तपासण्याचा खर्च वेगळा असणे, याचप्रमाणे सर्व सामान्य गोरगरीब रुग्णांना चांगल्या प्रकारचे उपचार देण्यासाठी या योजनेतील सर्वच दरपत्रकात सुधारित वाढ करुन देणे गरजेचे असणे, यावर शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. सुरेश शेट्टी ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, ही योजना आणल्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. आपण फक्त 8 जिल्ह्याला ही योजना चालू केलेली आहे. बाकीच्या जिल्ह्यांना ही योजना केव्हा लागू करणार ? यामध्ये अशा तक्रारी आहेत की, रुग्णालयांना वेळेवर पैसे मिळत नाहीत त्यामुळे नवीन पेशन्ट घेत नाहीत. कारण जुन्या योजनेमध्ये सहा सहा महिने पैसे मिळत नाही. त्यामध्ये काही सुधारणा करणार का ? ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये जुनी योजना चालू आहे त्या ठिकाणी सहा सहा महिने पैसे मिळत नाहीत. 1 कोटी रुपयांचे बिल दिले तर 50-60 लाख रुपये देतात. त्यामध्ये काही सुधारणा करणार का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण.....

यामध्ये उपचाराचा खर्च मर्यादित आहे. ॲन्जिओप्लाटीचा खर्च 60 हजार रुपये नमूद केला आहे. परंतु केंद्र सरकारच्या योजनेमध्ये 1,27,650 रुपये दर निश्चित केलेला आहे, तसेच राज्यातील आठ जिल्ह्यात ही योजना सुरु केलेली आहे, परंतु बाकीच्या जिल्ह्यांमध्ये ती केव्हा सुरु केली जाणार आहे ? राज्य शासनाने निश्चित केलेले दर अतिशय कमी आहेत. त्यामुळे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये काही सुधारणा केली जाणार आहे काय ? किडनीच्या प्रत्यारोपणासाठी 1 लाख 50 हजार रुपये दर निश्चित केलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनाही माहीत आहे की, कोणतेही हॉस्पिटल 4.50 लाख रुपयांच्या आत किडनी प्रत्यारोपण करीत नाही. त्यामुळे या दराबाबतही राज्य सरकार सुधारणा करणार आहे का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना जुन्या योजनासंबंधी नाही. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. ही योजना प्रथम राज्यातील 8 जिल्ह्यांमध्ये चालू करण्यात आलेली आहे. संपूर्ण राज्यात ही योजना लवकरच सुरु करण्यात येणार आहे. ॲन्जिओप्लास्टीच्या दराबाबत मी सांगेन की, राज्य सरकारच्या पॅकेजप्रमाणे केंद्र शासनाने सुध्दा याबाबतचे दर कमी केलेले आहेत. केंद्र शासनाने सीजीएचएस पॅकेजमध्ये 50 हजार रुपयांनी दर कमी केलेले आहेत. कॉरोनरी ॲन्जिओप्लास्टी विथ् बलून यासाठी दर 55 हजार रुपये दर निश्चित केलेला आहे. राज्य शासनाचे व केंद्र शासनाचे दर यामध्ये जास्त फरक राहिलेला नाही.

डॉ.दीपक सावंत : 50 हजार रुपये ॲन्जिओग्राफीसाठी व 55 हजार रुपये बलूनिंगचा दर निश्चित केल्याचे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे. या योजनेमध्ये 972 प्रोसिजर्स व 121 पाठपुरावा प्रोसिजर्सचा समावेश आहे. दरकरारानुसार स्टेंट व इतर साधनसामग्री उपलब्ध आहे. परंतु जुन्या योजनेमध्ये दरकरार पाळले जात नव्हते. अनेक डॉक्टर्स आयत्या वेळी पेशंटस्ना मुद्दामहून बाहेरुन विकत घ्यावयास भाग पाडत होते. त्यामुळे नवीन योजनेसाठी शासनाने काही दंडक घातला आहे काय, त्यासाठी दरकरार आहे काय किंवा ठराविक कंपनीकडून खरेदी करावी अशी मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत काय ? या निवेदनामध्ये कार्डिॲक सर्जरीच्या 2491 व

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

कार्डिऑलॉजीचे 7581 उपचार झालेले आहेत असे नमूद केलेले आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अंतर्गत शस्त्रक्रिया केलेल्या किंवा उपचार केलेल्या हॉस्पिटल्सचे राज्य शासन किती देणे बाकी आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी 2-3 प्रश्न विचारलेले आहेत. मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, पूर्वी राज्यात जीवनदायी आरोग्य योजना सुरु होती. त्याऐवजी आता राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दिनांक 1 जून, 2012 रोजीपासून राज्यातील 8 जिल्ह्यांमध्ये लागू केली आहे. नवीन योजनेमध्ये शासनाने खूप बदल केलेले आहेत. ज्यांचे वार्षिक उत्पन्न 1 लाखापेक्षा कमी आहे अशा पेशंटस्ना पूर्वीच्या योजनेनुसार 4 शस्त्रक्रियांसाठी पैसे दिले जात होते. आता 972 सर्जरीसाठी लोकांना मदत दिली जाईल. यामध्ये आपण खाजगी हॉस्पिटल इम्पॅनल करीत आहोत. जुन्या जीवनदायी योजनेमध्ये असे होते की, हॉस्पिटल आपल्या पेशंटची तपासणी करुन त्यांचे प्रस्ताव स्वतंत्रपणे सिव्हिल सर्जन, उपसंचालक, संचालक, आरोग्य सेवा यांच्याकडे पाठवित होते. ते त्यांच्या स्तरावर या प्रस्तावाला मान्यता देत होते. परंतु सेम ऑपरेशन सातारा जिल्ह्यात 1 लाख रुपयांमध्ये होत होते तर कराडमध्ये 1.25 लाख रुपयात केले जात होते. जे काही ड्रॉबॅक होते ते लक्षात घेऊन विभागनिहाय सर्व आमदारांची बैठक घेऊन ही योजना ठरविली आहे.

नवीन योजना ठरविताना तज्ज्ञ समितीमध्ये राज्यातील डॉक्टर्सना नेमून 972 प्रोसिजर्सचे रेट ठरविलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KTG/ D/ D/ पूर्वी श्री. खंदारे 17:40

श्री. सुरेश शेट्टी...

हे रेट फिक्स आहेत. ते नेटवर देखील उपलब्ध आहेत. तामिळनाडू, आंध्रप्रदेश, गोवा, कर्नाटक, केरळ या राज्यांनी जे रेट ठरविलेले आहेत त्याचा अभ्यास करुन आपल्या एक्सपर्ट गटाने 972 प्रोसिजरचे रेट फिक्स केले आहेत. या सर्व योजना ऑनलाईन आहेत. ऑनलाईन प्रि-ऑथोरायझेशन देण्यात येते, रुग्णला ॲडमिट केल्यानंतर त्याचे ऑपरेशन थिएटरमध्ये तसेच तेथून डिचार्ज दिल्यानंतरचे फोटो घेण्यात येतात. 10 दिवसामध्ये हॉस्पिटलचे ऑनलाईन पेमेंट करण्यात येते. राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत ज्या हॉस्पिटलला पेमेंट झालेले नाही त्याचे नावे सन्माननीय सदस्यांनी सांगावे. जर क्लेममध्ये काही चुका असतील तर पेमेंटसाठी उशीर झाला असेल. परंतु क्लेमचे 10-15 दिवसात पेमेंट केले जाते. आतापर्यंत 48412 प्रिऑथोरायझेशन झाले असून 134 कोटी रुपये इतके पेमेंट झालेले आहे.

डॉ. रणजित पाटील : प्रत्येक माणसाला 40 वर्षानंतर नेत्रशल्यचिकित्सकाकडे जावे लागते तर प्रत्येक स्त्रीला स्त्री-रोग तज्ज्ञाकडे जावे लागते. या दोन्ही गोष्टी राजीव गांधी जीवनदायी योजनेतून वगळण्यात आलेल्या आहेत हे खरे आहे काय ? माझ्या जिल्ह्यामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु होणार म्हणून राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना एक वर्षापासून बंद आहे. माझ्या जिल्हयामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु झालेली नसल्यामुळे बीपीएल खालील लोकांना त्यांच्या हक्कापासून आपण वंचित ठेवीत आहात. गुजराथ राज्यामध्ये त्यांची स्वत:ची जीवनदायी योजना आहे तसेच केन्द्राची देखील अर्थसहाय्य योजना आहे. त्या योजनेअंतर्गत 75 टक्के अनुदान मिळते. दोन-अडीच लाख रुपयापर्यंत त्या योजनेअंतर्गत आर्थिक लाभ मिळतो. तेव्हा गुजराथ राज्याप्रमाणे आपल्या राज्यातही या दोन्ही योजना चालू ठेवण्यात येतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : गायनाकॉलॉजी रिलेटेड सर्जरी 972 मध्ये समाविष्ट केलेली आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नॅशनल ब्लाईंडनेस प्रोग्रॅम आपण राबवित आहोत. हा राष्ट्रीय कार्यक्रम आपण वेगळा राबवित आहोत. स्त्री रोगासंबंधी जे प्रोसिजर आहे ते सर्व 972मध्ये समाविष्ट केलेले आहे.. कॅटरॅक्ट आणि डेण्टल सिझेरिअनमध्ये जास्तीत जास्त लिकेजेस होत आहेत. आम्ही आरएसबीवायचा अभ्यास केला. ॲपेण्डिक्ससाठी आरएसबीवाय मधून जास्तीत जास्त पैसे देण्यात आले. जे जनरल 200 प्रोसिजर आहेत त्यामध्ये जास्त लिकेजेस होण्याची शक्यता असते म्हणून ते शासकीय आणि महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमधून केले जाते. प्रायव्हेट हॉस्पिटल्सना हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

प्रोसिजर करण्यास परवानगी दिलेली नाही. कॅटरॅक्ट आणि डेण्टलचे प्रोसिजर आपण यामध्ये समाविष्ट केलेले नाही. दुसरे असे की, आपण संपूर्ण राज्यात ही योजना राबविण्याचा निर्णय घेत आहोत. त्यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. फक्त तारीख निश्चित व्हायची आहे. या आठवड्यामध्ये इन्शुरन्स कंपनी बरोबर फायनल एमओयू साईन झाल्यानंतर एक-दीड महिन्यामध्ये तारीख निश्चित करुन संपूर्ण राज्यात ही योजना राबविण्यात येणार आहे.

ॲड. आशिष शेलार : राजीव गांधी जीवनदायी योजना फक्त 8 जिल्ह्यामध्ये सुरु आहे. माननीय मंत्री महोदयांच्या मतदारसंघामध्ये सेव्हन हिल्स हॉस्पिटल आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

सभापती महोदय,सेव्हनहिल्स हास्पिटलच्या अनुषंगाने मी फक्त दोन प्रश्न या ठिकाणी उपस्थित करणार आहे. आज आपल्याकडे ॲन्जिओप्लॅस्टी आणि हार्ट रिलेटेड शस्त्रक्रियांसाठी प्रतिक्षा यादी जवळ जवळ 21-15, 20-20 दिवसांची आहे. ती प्रतिक्षा यादी लवकरात संपविण्याच्या दृष्टीने आपणाकडून कोणते प्रयत्न केले जाणार आहेत ? ज्या सर्जरीज् आणि ऑपरेशन्ससाठी पेशंट जातात, त्यांच्यात सुध्दा टायमींग डिस्क्रीमीनेशन आहे. हा शब्द बरोबर वाटत नाही, निर्वासित लोकांसारखी वागणूक दिली जाते. सगळयांचे ऑपरेशन्स झाल्यानंतर यावे अशा प्रकारचे या रुग्णांना सांगितले जाते. सेव्हनहिल हॉस्पिटलमध्ये टायमींग डिस्क्रीमीनेशनचा फरक होऊ नये, तसेच रुग्णांचा वेटींग कालावधी कमी कसा होईल यासाठी माननीय मंत्री महोदय काय उपायोजना करणार आहेत ?

डॉ.दीपक सावत : सेव्हनहिल हॉस्पिटलमध्ये या योजनेतील रुग्णांची वेटींग लिस्ट तयार तयार केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात या योजनेतून रुग्णांचे शस्त्रक्रिया करणे बंद केलेले आहे. याचा देखील माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सेव्हनहिल हॉस्पिटलमध्ये 1836 प्रोसीजर झाल्या आहेत. या सेव्हनहिल हॉस्पिटलमध्ये प्रतिक्षा कालावधी जास्त असेल. त्याचे कारण असे की, धुळे, अमरावती अशा विविध जिल्हयातून पेशंट ऑपरेशन्स करण्यासाठी मोठया प्रमाणात येतात. आता आपल्याला स्ट्रीमलाईन करावे लागेल. जी इर्मजन्सी ऑपरेशन्स असतात, तशी ऑपरेशन्स इमिजिएट केली जातात. ज्या रुग्णास दहा ते पंधरा दिवसांनी ऑपरेशन करावयाचे असेल त्यांना स्ट्रीमलाईन करुन घेऊ. त्यांना स्पेसिफीक टाईम देऊन त्या दिवशी त्याचे ऑपरेशन केले जाईल अशी व्यवस्था करु.

ॲड.आशिष शेलार : त्या ठिकाणी स्पेशल अधिकारी मॉनेटर करा.

श्री.सुरेश शेट्टी : त्या ठिकाणी आरोग्य मित्र बसतात. पाहिजे तर तेथे आपण ॲडीशनल स्टॉफ देऊ. कारण तेथे खूपच गर्दी आहे. सेव्हनहिल हॉस्पिटल हे माझ्या मतदार संघात आहे. मी रोज मॉनेटर करतो आहे. त्या ठिकाणी एखादा आरोग्य मित्र उपलब्ध करुन देऊ. आपले स्पेशल काऊन्टर आहे, तेथे ॲडीशनल स्टाफ देऊन रुग्णांना निश्चितपणे मदत करण्याचा प्रयत्न करु.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे : केंद्र सरकार पुरस्कृत राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना चालू आहे. ती योजना चालू ठेवली जाणार आहे की बंद केली जाणार आहे? ती योजना चालू ठेवावी अशी माझी माननीय आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे.ती योजना अतिशय फायदेशीर आहे. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये मोठे आजार जास्त आहेत. राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेमध्ये कॉमन आजारांचे प्रमाण जास्त आहे. म्हणून राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना चालू ठेवण्यात येईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना ही केंद्र शासन पुरस्कृत आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना ही आपल्या राज्याची आहे. या दोन्ही स्कीम क्लॅश होतात. त्यात 30 हजार रुपयांचे लिमिट आहे. या योजनेत 1.50 लाखापर्यंतचे लिमिट आहे. त्यात छोटया छोटया शस्त्रक्रिया देखील करतात. पण त्यात लिकेजेस् खूप आहेत. त्यात आयडेंडिफिकेशन नाही. त्यात प्री ऑथरॉयझेशन नाही. बायोमेट्रीक करुन करतात. केंद्र शासनाची योजना चालू रहावी या बाबतीत माझी काही हरकत नाही. पण केंद्र शासनाने म्हणणे असे आहे की, एक योजना सुरु असताना दुसरी पॅररल स्कीम का राबविता ? इतर राज्यात दोन्ही स्कीम चालू आहेत काय ही बाब तपासून घेईन. ती स्कीम चालू ठेवण्यास माझी काहीही हकरत नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : राजीव गांधी जीवनदायी योजना राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेमध्ये सुरुवातीला चार ऑपरेशन्ससाठी मदत मिळावयाची. परंतु आता 972 वेगवेगळया प्रकारच्या ऑपरेशन्स व इलाज यासाठी मदत दिली जाते आणि ही मदत वेगळया पध्दतीने दिली जाते. पेशंटला घेऊन जाणे, त्याला परत घरी आणणे यासाठी वाहन उपलब्ध करुन देण्यात येते, अशी महत्वाकाक्षी योजना आहे. महाराष्ट्रातील आठ जिल्हयांमध्ये ही योजना सुरु केलेली आहे. इतर जिल्हयांमध्ये ही योजना सुरु करण्याची तारीख आम्ही निश्चित करीत आहोत. या योजनेच्या अनुषंगाने आजही आपल्याकडे तक्रारी येतात...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6.......... श्री.माणिकराव ठाकरे......

त्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये ही योजना सुरु करीत असताना तक्रारी येणार नाहीत या दृष्टीने पावले उचलावी लागतील. इतर जिल्हयांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना साधारणपणे केव्हापर्यंत सुरु केली जाणार आहे? मंत्री महोदयांनी उपचार केलेल्या रुग्णांची आकडेवारी जाहीर केली आहे.

सेव्हन हिल्स हॉस्पिटलमध्ये रुग्णांची वेटिंग लिस्ट वाढत आहे. इतरही काही रुग्णालयांमध्ये कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती दिसून येत आहे. सध्या योजना अपूर्ण स्थितीत आहे. आंध्रप्रदेश राज्यात ही योजना लागू केल्यानंतर ब-याच त्रुटी दिसून आल्या आहेत. रुग्णांवर तातडीने उपचार होणे हे एकाच वेळी शक्य नाही. परंतु प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ज्या अडचणी येत असतील त्या संदर्भात सदनामध्ये चर्चा व्हावी. परंतु ही महत्वाकांक्षी योजना राज्यातील जनतेच्या हिताची आहे. म्हणून ही योजना सर्वत्र लागू करीत असताना ज्या काही त्रुटी असतील त्या त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने राज्य शासन पावले उचलणार आहे काय? इतर जिल्हयांमध्ये कोणत्या महिन्यापर्यंत योजना लागू केली जाईल?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जून्या जीवनदायी आरोग्य योजनाबद्दलचा मुद्दा मांडला आहे. या योजनेच्या माध्यमातून चार प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जात होत्या. 1997 पासून 2013 पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात 81,328 शस्त्रक्रिया या योजनेंतर्गत झालेल्या आहेत. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना 8 जिल्हयात लागू करण्यात आली. गेल्या दहा महिन्यात या योजनेमधून 45,330 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. मूळ हेतू हा होता की, 8 जिल्हयात पायलट प्रोजेक्ट म्हणून योजना सुरु करण्यात आली, 8 जिल्हयातील अनुभव आणि अडचणींची ग्राऊंड लेव्हलवर नोंद घेण्यात आली असून इतर जिल्हयामध्ये योजना लागू करताना आवश्यक ते बदल इनकॉर्पोरेट करुन योजना रोल आऊट करणार आहोत. संपूर्ण राज्यासाठी बजेटमध्ये तरतूद झालेली आहे. विमा कंपनीबरोबर एमओयू साईन करणे बाकी आहे. पहिल्या टप्प्यात योजना लागू करताना विमा कंपनी नेमली होती. त्यांच्याकडे मोठया प्रमाणात क्लेम्स आल्यामुळे त्यांना नुकसान सहन करावे लागत आहे. म्हणून त्यांच्याशी निगोसिएशन सुरु आहे. एक-दोन दिवसात हे निगोसिएशन अंतिम होईल अशी अपेक्षा आहे. पुढील दीड ते दोन महिन्यात किंवा मे महिन्यात योजना रोल आऊट करण्याचा प्रयत्न करु, एवढेच मी सभागृहाला सांगू इच्छितो.

---------

.2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी माननीय संसदीय कार्य राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"आज दिनांक 25 मार्च, 2013 रोजी सर्व गटनेत्यांच्या बैठकीमध्ये चर्चा झाल्यानुसार पुढीलप्रमाणे कामकाज होईल.

आजच्या कामकाजाच्या कार्यक्रमपत्रिकेत दर्शविलेल्या औपचारिक कामकाजानंतर सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु होईल (पहिला दिवस). मंगळवार, दिनांक 26 मार्च, 2013 रोजी अर्थसंकल्पावर चर्चा होईल (दुसरा दिवस). त्यानंतर लेखानुदान विनियोजन विधेयक घेण्यात येईल. सोमवार, दिनांक 1 एप्रिल, 2013 रोजी अर्थसंकल्पावर चर्चा होईल (तिसरा व शेवटचा दिवस). दिनांक 28 मार्च, 2013 रोजी पूर्वी ठरल्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज न होता सुट्टी राहील. दिनांक 29, 30 व 31 मार्च, 2013 रोजी सुट्टी राहील.

वरील प्रस्तावास सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी आपल्या अनुमतीने विनंती करतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील आठ अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली आणणे

**मु. शी.** : राज्यातील आठ अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली आणणे यासंबंधी सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात एकूण आठ अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये महाराष्ट्र राज्य विद्यापीठे अधिनियम, १९९४ व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांप्रमाणे कार्यरत असणे, ह्या शरीरिक महाविद्यालयांमध्ये सुमारे १५० ते २०० प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत असून ह्या सर्व शारीरिक महाविद्यालयांना शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण या विभागामार्फत वेतन अनुदान दिले जाणे, परंतू ३-३ महिन्यानंतर वेतन दिले जाणे, ह्या प्राध्यापकांना व कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोग सन २००६ पासून लागू न करता सन २०११ पासून लागू करणे, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, ही महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली देण्याची केलेली मागणी, या महत्त्वाच्या प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून घ्यावयाचा निर्णय, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर 3जी.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय,राज्यातील अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत व त्यांच्या थकबाकी बाबत सदर लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली असून या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जी उत्तरे देण्यात आलेली आहेत त्यासंदर्भात मी 3 प्रश्न विचारणार आहे.

सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, नियमित वेतन देण्यास विलंब झालेला आहे. भविष्यात नियमित वेतन देण्यास विलंब होणार नाही याबाबत व्यवस्था केली जाणार आहे काय ? सहावा वेतन आयोग दि.1 जानेवारी, 2006 पासून लागू झाला परंतु दि.1 जानेवारी 2006 ते 31 मार्च, 2011 या कालावधीची थकबाकी न देण्याचा निर्णय घेण्यात आला असून हा निर्णय राज्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन घेण्यात आलेला आहे. या राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना दि. 1 जानेवारी, 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू केला व थकबाकी दिली . परंतु 150 कर्मचाऱ्यांना थकबाकी देण्यासाठी राज्याची आर्थिक स्थिती सक्षम नाही असे जे उत्तरात म्हटले आहे ते संयुक्तिक वाटत नाही, त्यामुळे या निर्णयाचा शासन फेरविचार केला जाणार आहे काय ? सद्य:स्थितीत ही महाविद्यालये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या आधिपत्याखाली आहे असे नमूद केले आहे. त्यामुळे सदर महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय किती दिवसात घेतला जाणार आहे ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय,शारीरिक महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या संदर्भात 3 महिन्यांचा विलंब झालेला आहे ही बाब खरी आहे. परंतु मार्च अखेर या सर्वांना वेतन देण्यात आलेले आहे. दि. 1 एप्रिल, 2011 पासून सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी होती ती देण्यासाठी अनुदान खर्च झालेले असल्यामुळे विलंब झालेला आहे. असा विलंब यापुढे होणार नाही याबाबत विभाग निश्चितपणे काळजी घेणार असून यासंदर्भात आयुक्तांना सूचना देण्यात आलेल्या आहेत हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग दि.1.1.2006 पासून शासनाने लागू केलेला आहे. परंतु 1.4.2011 नंतरच संबंधित प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याचा निर्णय राज्य मंत्री मंडळाने घेतलेला आहे. मंत्री मंडळाने थकबाकी देण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेतला असल्यामुळे दि. 1.4.2011 नंतरच त्यांना लाभ मिळू शकेल. थकबाकीच्या संदर्भात वित्त विभागाला आम्ही पुन्हा फाईल पाठवली होती परंतु वित्त विभागाने सुध्दा हा मुद्दा अमान्य केलेला आहे. ...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्‌माकर वळवी .....

सभापती महोदय,शारीरिक शिक्षण महाविद्यालय उच्च व तंत्रशिक्षण विभागाला वर्ग केला जाईल काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून शारीरिक शिक्षण महाविद्यालय उच्च व तंत्रशिक्षण विभागाला वर्ग केला जाणार असून यासंदर्भातील कार्यवाही सुरु असून यासंदर्भातील प्रस्ताव कॅबिनेट पुढे नेण्यासाठी दोन्ही विभाग सहमत आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या प्रश्न क्रमांक दोनच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "राज्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारित वेतनश्रेणी दिनांक 1.1.2006 पासून लागू करण्याचा, मात्र दिनांक 1.1.2006 ते दि. 31.3.2011 या कालावधीची थकबाकी न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे" असे म्हटले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

याला काही नियम, कायदे-कानून आहेत की नाही ? शासनाच्या मनात आले म्हणून करून टाकले असे बोलून चालणार नाही. उद्या संघटना कोर्टात गेली तर त्यांना न्याय मिळणारच आहे. अशाने राज्य सरकारची नाचक्की होते. विशेषत: आदिवासी भागातील एका तडफदार मंत्र्यांची नाचक्की होणार आहे. माननीय मंत्री श्री.पद्माकर वळवी यांची नाचक्की होणार आहे. बाकी कोणाचीही नाचक्की होणार नाही. आपण अतिशय कार्यक्षम असताना असा अन्याय का झाला, असे आपल्याला कोर्ट विचारेल. मग कोर्टाचे फटकारे मंत्री या नात्याने आपल्यावर येतील. तेव्हा आपण उभे राहून सांगावे अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य मी माझ्या खात्यात करू देणार नाही. तसे ठोस आश्वासन आपण दिले पाहिजे.

सभापती महोदय, देशातील एक-दोन राज्यातच बी.पी.एड कॉलेजेस ही क्रीडा खात्याकडे आहेत. हे कॉलेज उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग केले तर युजीसीजीची ग्रँट सुरू होते. आधीच आपला पगारावरील खर्च 67 टक्के होत चालला आहे. त्यामुळे विकास कामासाठी निधी कमी पडतो आहे. त्यामुळे वर्षाचा दहा कोटी रूपये पगार फुकटचा गळ्यात कशासाठी मारून घेत आहात ? सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे असे आपण वर्षभर सांगत आहात. आज आपण सांगावे की, जूनचे ॲकेडेमिक वर्ष सुरू होण्यापूर्वी बी.पी.एड कॉलेजस उच्च व तंत्रशिक्षण खात्याकडे वर्ग होईल.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शारीरिक शिक्षण महाविद्यालय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग करण्यासंबंधातील प्रश्न विचारला आहे. क्रीडा विभागाच्या कार्यसूची मध्ये सध्या हा विभाग येतो. क्रीडा मंत्री या नात्याने मी स्वत: कॅबिनेटसाठी फाईल मुव्ह केली असून सहमती देखील दर्शविली आहे. आमच्या विभागाची यास सहमती आहे. यासंबंधीचा निर्णय कॅबिनेटमध्ये लवकरात लवकर होईल. सदर महाविद्यालय उच्च शिक्षण विभागाकडे वर्ग झाले तर युजीसीजीच्या ग्रँट लागू होतात. त्यामुळे ती ग्रँट या महाविद्यालयाला देखील निश्चितपणे लागू होऊ शकेल. तेव्हा याबाबतचा निर्णय ॲकेडेमिक यिअर सुरू होण्यापूर्वी निश्चितपणे घेण्यात येईल. दिनांक 1.1.2006 ते 31.3.2011 या कालावधीतील थकबाकी न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे हे मी यापूर्वीच सांगितले आहे. त्यामुळे दिनांक 1 एप्रिल 2011 नंतरची थकबाकी लागू राहील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : लक्षवेधी सूचनांवरील चर्चा संपली.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मला असे वाटते की, सगळे शिक्षक शिस्तीत असतात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, क्रीडा शिक्षक जास्त शिस्तीत असतात.

**उप सभापती** : होय. पण येथे असलेले सन्माननीय सदस्य क्रीडा शिक्षक नाहीत. ज्या सन्माननीय सदस्यांचा या प्रश्नाशी काहीही संबंध नाही त्यांनी कृपा करून खाली बसावे. सन्माननीय सदस्य ॲड्.आशिष शेलार यांनी खाली बसावे. सर्वच सन्माननीय सदस्य एकाच वेळी प्रश्न विचारत असतील तर माननीय मंत्र्यांनी कोणालाही उत्तर देऊ नये.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, वित्त विभागाकडे पुन:श्च विचारार्थ फाईल पाठविली जाईल.

.................

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित करण्याबाबत वित्त राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 228 मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी".

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2013

L.C. BILL NO. II OF 2013

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

श्री.प्रकाश सोळंके (सहकारी राज्य मंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी./मु. शी.** : मौजे तलवाडा (ता.गेवराई, जि.बीड) येथील त्वरिता देवी देवस्थान येथे काही समाजकंटकांनी यात्रा स्थळाच्या पौराणिक जागेवर अतिक्रमणाचा प्रयत्न करणे या बाबत श्री.अमरसिंह पंडित,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मौजे तलवाडा, ता.गेवराई, जि.बीड येथील त्वरितादेवी देवस्थान राज्यभरात सुप्रसिध्द आहे.तेथे वर्षभरातून एकदा देवस्थानाचा यात्रा उत्सव साजरा करण्यात येतो. हा यात्रा उत्सव सुमारे महिनाभर चालतो. यात्रा उत्सवासाठी माळी समाजाची परंपरागत जमीन दरवर्षी वापरात येते. त्वरितादेवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने यात्रा स्थळाला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात येते. यात्रा उत्सव अतिशय पुरातन काळापासून मोठ्या भक्तीभावाने लाखो भक्तांच्या साक्षीने साजरा करण्यात येतो. सर्व जाती धर्माचे लोक यात्रा उत्सवात सहभागी होतात. दिनांक 21 मार्च 2013 रोजी काही समाजकंटकांनी विशिष्ट रंगाचे ध्वज लावून महापुरुषांच्या नावाने घोषणा देत संरक्षण भिंतीची तोडफोड करणे, यात्रा स्थळाच्या पौराणिक जागेवरच अतिक्रमणाचा प्रयत्न करणे, तलवाडा पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेणे, ग्रामस्थ व देवीच्या भक्तांसह ट्रस्ट मंडळीनी या कामी हरकत घेतल्यानंतरही पोलिसांनी कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप न करणे त्यामुळे गावात शांततेचा भंग होऊन भीती आणि दहशतीचे वातावरण पसरले आहे. घटनेच्या निषेधार्थ तलवाडा सह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी बंद व आंदोलनाचा इशारा देणे, शांतता प्रिय भागात या घटनेमुळे समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता, या प्रकरणी सखोल चौकशी करुन प्रकरणाला जातीय रंग मिळण्या अगोदर शासनाने कार्यवाही करावी आणि प्रसंगावधान राखून वेळीच सलोख्यासाठी प्रयत्न न केल्याबद्दल तलवाडा पोलीस ठाणे प्रमुखावरही कारवाई करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील सर्व स्तरावरील अ ते ड संवर्गातील केवळ तीन टक्के रिक्त पदे प्रतिवर्षी न भरता संपूर्ण पदे भरणे या बाबत श्री.सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. सतीश चव्हाण ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यातील सर्व स्तरावरील शासकीय "अ" ते "ड" संवर्गातील केवळ तीन टक्के रिक्त पदे प्रतिवर्षी भरण्याचा निर्णय शासनाने दिनांक 25 जुलै, 2012 रोजीच्या शासन निर्णय क्रमांक एस.आर.व्ही. 2012 अन्वये घेतलेला आहे. परिणामी शासकीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त राहण्याचा संभव आहे. या बाबत शासकीय कार्यालयातील केवळ तीन टक्केच रिक्त पदे न भरता रिक्त असलेली संपूर्ण पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : कोल्हापूर शहरात जैव कचऱ्यावर प्रक्रियेसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता या बाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"कोल्हापूर शहरात जैव कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावणे यावरुन महापालिका, नेचर ॲण्ड नीड बीएमडब्ल्यूटी आणि डॉक्टरांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विविध संघटना यामध्ये वाढीव दरावरुन वाद सुरु आहे. ही वाढीव बिले मागील वेळेपेक्षा तीनशे पटींनी जास्त असणे, "कोटीचा प्रकल्प अन महिन्याकाठी लाखांचा खर्च" असा प्रश्न उभा राहिला आहे. हा जैव कचरा संसर्गजन्य रोग पसरविण्यास कारणीभूत असून तो मानवी आरोग्यास घातक आहे. रोजचा कचरा 900 किलो आहे. डॉक्टर्स व अनेक संघटनांच्या मदतीने जैव कचऱ्यावर प्रक्रियेसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत करण्याचा निर्णय येथील संघटनांनी घेतला असून त्याबाबत शासनाने लवकरात लवकर योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. हा विषय अतिशय महत्वाचा असल्यामुळे मी विशेष उल्लेखाद्वारे ही बाब शासनास निदर्शनास आणत आहे.

-----------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेतून बांधण्यात येणाऱ्या घरकुलांच्या बांधकामाबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेंतर्गत नोव्हेंबर, 2012 अखेरपर्यंत लातूर जिल्ह्यात 9069 घरकुले मंजूर झाली आहेत. या मंजूर घरकुलांच्या बांधकामासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे रु.5,875 लाख 77 हजार रुपये निधी उपलब्ध झाला असतानाही अद्याप मंजूर घरकुलांपैकी 5,886 घरकुलांची बांधकामे रखडलेली आहेत. इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यात नोव्हेंबर 2012 अखेरपर्यंत 9,069 घरकुले मंजूर झाली आहेत.

यापैकी इंदिरा आवास योजनेंतर्गत लातूर तालुक्यात 590, औसा 544, निलंगा 745, उदगीर 424, चाकूर 346, रेणापूर 312, देवणी 227, शिरुर अनंतपाळ 211, जळकोट तालुक्यात 189 अशा एकूण 4015 घरकुलांचा समावेश आहे.

तसेच रमाई घरकुल योजनेंतर्गत लातूर तालुक्यात 820, निलंगा 585, उदगीर 1029, अहमदपूर 929, चाकूर 193, रेणापूर 322, देवणी 357, शिरुर अनंतपाळ 348, जळकोट 471 अशी एकूण 5054 घरकुले मंजूर झाली आहेत.

या दोन्ही योजनांतील मंजूर घरकुलांसाठी इंदिरा आवास योजनेंतर्गत 1 कोटी 15 लाख 84 हजार व रमाई घरकुल योजनेंतर्गत 4 कोटी 849 लख 93 हजार रुपये निधी उपलब्ध झालेला आहे. रखडलेली घरकुलांची कामे मार्च 2013 अखेर पूर्ण करावीत असे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत. रखडलेल्या घरकुलांची बांधकामे मार्च अखेर पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे. सबब, शासनाचे या गंभीर प्रकरणी लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख मांडत आहे.

-------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुंबईतील चारही आमदार निवास व सह्याद्री अतिथीगृहात रोजंदारी आस्थापनेवर काम करणाऱ्या कामगारांना नियमाप्रमाणे पाच वर्षे झाल्यामुळे त्यांना नियमित करण्याची आवश्यकता, या बाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक हिताच्या महत्त्वपूर्ण विषयासंदर्भात विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

महोदय, मुंबई येथील चारही आमदार निवास व सह्याद्री अतिथीगृह येथे रोजंदारी आस्थापनेवर काम करणाऱ्या 508 कर्मचाऱ्यांना चारी समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने दि.21 सप्टेंबर, 2005 रोजी रोजंदारी आस्थापनेवर घेण्यात आले आहे. त्यांना सेवेत सामावून घेण्याकरिता आपल्या दालनात दि.15 सप्टेंबर, 2011 व दि.23 ऑगस्ट, 2012 रोजी सविस्तर चर्चा करुन या कामगारांना लवकरच रुपांतरित अस्थाई आस्थापनेवर विनाविलंब घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामगारांना अस्थाई आस्थापनेवर तातडीने घेण्यात यावे, या कामगारांना न्याय देण्यासाठी शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. नियमाप्रमाणे त्यांना पाच वर्षे झाल्यामुळे त्यांना नियमित करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही, या करिता सदर विषयी मी विशेष उल्लेखाद्वारे सदरहू मुद्दा उपस्थित करीत आहे.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु. शी.**: मुंबई उपनगरामध्ये मुलुंड (पूर्व) येथील हरिओम नगरातील रहिवाशांना किरकोळ कामासाठी मुलुंड टोल नाका ओलांडून जावे लागणे, यासाठी येथील रहिवाशांना ओळखपत्र देऊन या समस्येवर तोडगा काढण्याची आवश्यकता, या बाबत श्री.चरणसिंग सप्रा, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

महोदय, मुलुंड (पूर्व) येथील 20 हजारच्या वर लोकसंख्या असलेल्या हरिओम नगर वसाहतीत किमान 8000 च्या वर फ्लॅटधारक आहेत. ही वसाहत मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असून देखील दुसरा रस्ता उपलब्ध नसल्यामुळे रहिवाशांना मुलुंड टोल नाका पार करुनच जावे लागते. मुलांना शाळेत सोडणे, महानगरपालिका कार्यालयात जाणे, विद्युत बिल भरणे, किरकोळ खरेदीसाठी जाणे, इ. कामांसाठी टोल नाका ओलांडून टोल भरुनच जावे लागते. त्यामुळे त्या भागातील रहिवासी त्रस्त झाले आहेत. शासनाकडे वारंवार तक्रार करुनही या समस्येवर तोडगा न निघणे, येथील स्थानिक रहिवाशांना ओळखपत्र वगैरे देऊन या समस्येवर तोडगा काढण्याची नितांत गरज आहे. या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी सभागृहाचे लक्ष वेधत आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यात रस्त्यावरील मुले व उपेक्षितांना शिक्षण देण्यासाठी खास निवासी शाळा सुरु करण्याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबी संदर्भात विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

महोदय, राज्यात सुमारे दोन लाख 13 हजार मुले शिक्षणापासून वंचित असणे, यात प्रामुख्याने उसतोडणी कामगारांच्या, दगडखाण कामगारांच्या मुलांचा व रस्त्यावर फिरणाऱ्या भटक्या विमुक्त समाजातील मुलांचा मोठ्या प्रमाणात समावेश असणे, रस्त्यावरील उपेक्षित मुलांच्या सर्वांगीण विकासाकरिता शासनाचे धोरण व केंद्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीचा कायदा 2009 मध्येच मंजूर केलेला असल्याने पुणे शहरात शैक्षणिक वर्ष 2013-14 पासून रस्त्यांवरील मुलांकरिता खास निवासी शाळा सुरु करण्यात आलेली असणे, याच धर्तीवर सबंध राज्यभरातील उपेक्षित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टने राज्यभरात अशा शाळांची निर्मिती करण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने राज्यात रस्त्यावरील मुले व उपेक्षितांना शिक्षण देण्यासाठी खास निवासी शाळा सुरु करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

-----------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : गुन्हे अन्वेषणकरिता महत्त्वाचा असणारा फिंगर प्रिंट विभागाचा सर्व्हर गेल्या दीड वर्षांपासून बंद असणे, लाखो ठसे स्कॅन करणे आवश्यक असून सर्व्हर सुरु करणे, रिक्त पदे भरणे तसेच नवीन संगणक खरेदी करणे व आंतरराराष्ट्रीय स्तरावरील फिंगर प्रिंट ॲनालेसिस सिस्टीम बसविण्याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

महोदय, गुन्हे अन्वेषणाकरिता अनेक वर्षांपासून फिंगर प्रिंटचा वापर केला जात आहे. आरोपींच्या ठशांच्या द्वारे हजारो गुन्हे उलगडून गुन्हेगारांना शासन करण्यात येते. परंतु अत्यंत महत्त्वाचा असणारा फिंगर प्रिंट विभागाचा सर्व्हर गेल्या दीड वर्षांपासून बंद आहे. त्यामुळे सर्व फिंगर प्रिंट विभागातील तज्ज्ञ हाताने काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून चुका होऊन त्याचा फायदा गुन्हेगारांना होत आहे. अप्पर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या अखत्यारित 41 ब्युरो असून या सर्व फिंगर प्रिंट ब्युरोचा अत्यंत महत्त्वाचा सर्व्हर पुणे येथे असून तो 2007 सालापासून बंद असला तरी अधिकारी मात्र दीड वर्षांपासून बंद असल्याचा दावा करीत आहेत. न्यायदानाच्या प्रक्रियेत बोटांच्या ठशांचा अहवाल अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. परंतु सर्व्हरच बंद असल्यामुळे या ठशांचा अहवाल अचूक नसल्यामुळे त्याचा फायदा आरोपींना मिळत आहे. त्याच बरोबर सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या मुंबईत ब्युरो असला तरी त्यास मागील 7 वर्षांपासून संचालक नेमलेला नाही. यावरुन शासन यावर उदासीन असल्याचे स्पष्ट होते.

सदरहू फिगर ॲनालेसिस अँड क्रिमीनल ट्रॅकिंग सिस्टीम 2003 ची आहे. ही सिस्टीम मधल्या काळात अपडेट करण्यात आलेली नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ...

अनेक ब्युरोमध्ये प्रिंट तज्ज्ञ नाहीत, संगणक नाहीत, रिक्त पदे भरली जात नाहीत. गुन्ह्याच्या ठिकाणचे ठसे घेऊन विभागातील हजारो रेकॉर्डमधून पडताळण्याचे काम अत्यंत वेळखाऊ, जिकिरीचे व बारकाईचे असल्यामुळे या संगणकाचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच लाखो ठसे स्कॅन करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असून शासनाने तातडीने सर्व्हर सुरु करावे, रिक्त पदे भरावीत, नवीन संगणक खरेदी करावेत, आंतरराष्ट्रीय स्तरावरील फिंगर प्रिंट अनॉलिसिस सिस्टीम बसविणे आणि रेकॉर्ड नष्ट करण्यापूर्वी ते स्कॅन करावे अशी विनंती मी याविशेष उल्लेखाव्दारे शासनाला करीत आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ. शी./मु. शी.** : गिरणी कामगारांना मोफत घरे मिळण्याच्या मागणीकरिता काढण्यात आलेला मोर्चा याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"गिरणी कामगारांना मोफत घरे मिळालीच पाहिजेत या मागणीकरिता सांगली, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, पुणे अशा विविध भागातून हजारो गिरणी कामगारांनी दि. 21.3.2013 रोजी राणीबाग ते आझाद मैदान मोर्चा काढण्यात येणे, 1 लाख 42 हजार गिरणी कामगार हे मुंबईत घर हवे म्हणून सतत लढा देत असणे, सध्या शासनाने देऊ केलेली घरे साडेसात लाख रुपये किंमतीची असून गिरणी कामगारांच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीमध्ये त्यांना ती परवडणारी नसणे, आधीच संपामुळे गिरण्या बंद होऊन 20 ते 25 वर्षे हे गिरणी कामगार बेकार झाल्याने छोट्या पगाराच्या नोकऱ्या करुन कसेतरी आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यात त्यांचे जीवन सार्थकी लागणे, शासन एकीकडे झोपडपट्टीधारकांना मोफत घरे देते, परंतु गाबाडकष्ट करुन जगणाऱ्या या गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ शकत नसणे, त्याचबरोबर यापुढे ही घरे 15 लाख रुपयांहून अधिक किंमतीची करणार असल्याचे मिळत असलेले संकेत, परिणामी गिरणी कामगारांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने या गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याच्या दृष्टीने नवीन धोरण जाहीर करण्याची आवश्यकता असल्याने सदरची बाब मी विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे निदर्शनास आणीत आहे."

सभापती महोदय, 1 लाख 42 हजार गिरणी कामगारांनी गेल्या काही वर्षांपासून आंदोलन चालविलेले आहे आणि गिरणी कामगारांना मोफर घरे मिळाली पाहिजेत यासाठी आता आपले अधिवेशन चालू असताना 21 मार्चला गिरणी कामगारांनी आझाद मैदानावर परत एक मोर्चा आयोजित केला होता. शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे त्याचबरोबर विविध गिरणी कामगार संघटनांचे प्रतिनिधी श्री. किशोर देशपांडे, श्री. हरिनाथ तिवारी, श्री. डी. के. आंबरे, श्री. बाळ

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

खवणेकर अशा अनेक गिरणी कामगार नेत्यांनी यामध्ये नेतृत्व केलेले आहे. त्यांनी जो इशारा दिलेला आहे त्यामध्ये मोफत घरांच्या मागणीचा विचार न झाल्यास 1 मे पासून आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेऊन ज्या ज्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितराव पवार जातील त्या ठिकाणी गिरणी कामगार काळे झेंडे दाखवून त्यांचा निषेध करणार आहे. या विशेष उल्लेखाव्दारे मी त्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधू इच्छिते. या संदर्भात मोठ्या प्रमाणावर निर्णय झाला असला तरी तो अर्धवट स्वरुपामध्ये आहे.

**उप सभापती** : यामध्ये विशेष उल्लेख काय आहे ?

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 21 मार्चला ते मोर्चा घेऊन आले. गिरणी कामगारांना मोफत घरे मिळावी हा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. फार थोड्या जणांना घरे मिळालेली आहेत. म्हणून मी या प्रश्नाकडे या विशेष उल्लेखाव्दारे लक्ष वेधत आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : शिशुविकास माध्यमिक विद्यालय, नागपूर येथील सचिव व मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ लिपिक यांच्या नोकरीसाठी 7 लाख रुपयांची केलेली मागणी याबाबत श्री. नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

शिशुविकास माध्यमिक विद्यालय, नागपूर येथील सचिव व मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत देवनाथ गोहणे यांनी कनिष्ठ लिपिक यांच्या नोकरीसाठी 7 लाख रुपयांची मागणी करणे, 5 लाख 45 हजार रुपये लिपिकाने सचिवांना देणे, 3 वर्षे झाल्यानंतर लिपिकाला नोकरीतून कमी करणे, पुन्हा नोकरी पाहिजे असल्यास 5 लाख रुपयांची मागणी करणे, लिपिकाने लाचलुचपत विभागाकडे त्याबाबत तक्रार करणे, सचिवाने घरी रक्कम घेतेवेळी लाचलुचपत विभागाने त्यांना पकडणे, यापूर्वी समर्थ रामदास विद्यालय, अरोळी, ता. मौदा, जि. नागपूर येथे कार्यरत असताना त्यांना बडतर्फ करणे, शिक्षण अधिकारी यांनी याबाबत कोणतीही कारवाई न करणे, उलट शासन निर्णय दि. 2 मे, 2012 अन्वये नियुक्ती आणि मान्यता देण्यावर बंदी असताना त्यांना मुख्याध्यापक पदावर नियुक्ती करण्यासाठी परवानगी देणे आणि मान्यता देणे, ही बाब या विशेष उल्लेखाव्दारे मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे. तरी याबाबत उपाययोजना करावी अशी विनंती करतो.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील पांढरवाडी शिवारात तीन हरिणांचा मृत्यू झाल्याची घडलेली घटना याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. धनंजय मुंडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झालेली असणे, नागरिकांना पाणीपुरवठा करण्याकरिता टँकरची सोय करण्यात येणे, जनावरांसाठी चारा छावण्या उभारण्यात येणे, परंतु जंगलातील वन्य प्राण्यांसाठी पाण्याची कोणतीही उपाययोजना नसणे, जंगलातील अनेक पाण्याचे साठे हे सुकलेले असणे, त्यामुळे राज्यात पाण्याअभावी वन्य प्राण्यांचे हाल होणे, दि. 17.3.2013 रोजी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील पांढरवाडी शिवारात तीन हरिणांचा मृत्यू झाल्याची घटना समोर येणे, सदर घटनेत पाणी न मिळाल्याने तडफडून या हरिणांचा मृत्यू झाल्याचे उघड होणे, बीड जिल्ह्यात मोर, हरीण, काळवीट या वन्य जीवांची संख्या लक्षणीय असणे, पिण्यासाठी घोटभर पाणी मिळत नसल्याचे त्यांचे अस्तित्व धोक्यात येणे, याकरिता शासनाने जंगलांमध्ये, अभयारण्यांमध्ये वन्य जीवांसाठी पाणवठे व त्यात पाण्याची सोय करण्याची नितांत आवश्यकता, सदरहू विषय अत्यंत महत्वाचा असल्याचे हा विषय मी या विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे."

---

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**उप सभापती** : यानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सुरु करण्यात येईल्.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज रात्री 8.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवावे. कारण या चर्चेसाठी उद्याचा एकच दिवस आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी विनंती करतो की, त्यांनी आज आपले एक-दीड तास दणकेबाज भाषण करावे. त्यानंतर आज दुसऱ्या एखाद्या सदस्याचे भाषण पूर्ण झाले तर बरे होईल. राज्याचे माननीय वित्त मंत्री माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण ऐकण्यासाठी या ठिकाणी उपस्थित आहेत. ते विधानसभेतील विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथ खडसे यांचे भाषण ऐकून आलेले आहेत.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सभागृहामध्ये जे ठरेल ते आम्हाला मान्य आहे.

**उप सभापती** : ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी सूचना केली आहे ती सभागृहाला मान्य आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय सभापतींच्या दालनात असे ठरले की, आज माननीय विरोधी पक्ष नेते पंधरा मिनिटे बोलतील.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आताच अत्यंत महत्वाचा विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. राज्यात 15 वर्षे काम करणारे कर्मचारी अजूनही टेम्पररी आहेत. हा अतिशय महत्वाचा विशेष उल्लेख आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

15-15 वर्षे म्हणजे अर्धे आयुष्य जर ते तात्पुरत्या स्वरुपामध्ये काम करीत असतील तर ते कर्मचारी आपले आयुष्य कसे जगत असतील ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आपले मत मांडावयाचे असेल तर त्यांनी स्वतंत्र विशेष उल्लेखाची सूचना दिली पाहिजे. सभागृहामध्ये असा पायंडा पडता कामा नये.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**उप सभापती** : आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. दिनांक 25 व 26 मार्च तसेच दिनांक 1 एप्रिल, 2013 असे एकूण 3 दिवस चर्चा होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी माननीय वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांसाठी, निम्मा वेळ विरोधी पक्षाच्या सदस्यांसाठी व स्वतंत्र पक्षाच्या सदस्यांसाठी देण्यात येईल. ज्यांना या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे व ते ज्या दिवशी बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावीत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आताच आपण अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा दिनांक 25 व 26 मार्च व दि.1 एप्रिल, 2013 होणार असल्याचे घोषित केलेले आहे. परंतु आजची चर्चा काही वेळानंतर थांबविली जाणार आहे आणि त्यानंतर दि.26 मार्च व दि.1 एप्रिल, 2013 रोजी ही चर्चा होणार आहे. या चर्चेसाठी किती वेळ निश्चित करण्यात आलेला आहे त्याची आपण माहिती दिली तर बरे होईल.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : उद्या सकाळी 10 ते 11 वाजेपर्यंत एका विषयावर चर्चा होणार आहे. त्यानंतर संध्याकाळी 4-5 वाजेपर्यंत अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा करण्याचे ठरलेले आहे. उद्या प्रश्नोत्तरे होणार नाहीत.

सभापती महोदय, दिनांक 20 मार्च, 2013 रोजी राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री व वित्त मंत्री यांनी अर्थसंकल्प मांडलेला आहे. या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला प्रारंभ करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या चर्चेला माननीय उप मुख्यमंत्री दिनांक 1 एप्रिल, 2013 रोजी उत्तर देणार आहेत. ते एप्रिल फूल करणार नाहीत अशी जनतेची अपेक्षा आहे. परंतु गेली 2-3 वर्षे जनतेला एप्रिल फूल करीत आहेत हा अनुभव आहे. दिनांक 20 तारखेला विधानसभेत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडला व विधानपरिषदेत माननीय वित्त राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी मांडला. माननीय उप मुख्यमंत्र्यांना मला या निमित्ताने एक सूचना करावयाची आहे. आपण अर्थसंकल्पीय भाषणामध्ये ना.धो.महानोरांच्या कवितांचा समावेश करु नका. त्या कवितांमुळे त्यांची अडचण होते. आपल्या पुणे जिल्ह्यातील ते नाहीत. पुणे हे विद्येचे माहेर घर आहे. परंतु माननीय वित्त राज्यमंत्री हे विदर्भातील आहेत. परंतु त्यांनी जी काही कविता म्हटली होती ती आम्ही छापील भाषणातून वाचली. ती कविता समर्पक आहे. हे मला येथे नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, विधानसभेत माननीय वित्त मंत्री बजेटचे भाषण वाचत होते त्यावेळी त्यांचे भाषण इयत्ता नववीचा विद्यार्थी टी.व्ही.वरुन पहात होता. त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक 21 तारखेला माझ्या ई-मेल बॉक्समध्ये त्या विद्यार्थ्याने एक कविता पाठविली. त्या कवितेतील ओळी मी वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की,

मांडला मांडला शासनाने अर्थसंकल्प मांडला,
तुटीचा नव्हे तर लुटीचा संकल्प मांडला
मांडला अर्थसंकल्प या दादांनी मोठ्या त्वेषाने
हुंकार भरला त्यास बाबांनीही तितक्याच जोशाने
वाजवुनि बाके आबांनी दिली जोमाने त्यांसी साथ

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

दादा, बाबा, आबा मिळून शासनाने केला जनतेचा मोठा घात
पडला राज्यात दुष्काळ, झाली धरणीठाय लेकरं
दुष्काळ निधीची चाखूनी फळे दिला सत्ताधा-यांनी ढेकर
विसर पडला त्या नेत्याचा ज्याच्यामुळे चाखता आज ही सत्तेची फळे

यशवंतराव चव्हाण जन्म शताब्दी महोत्सवासाठी 100 कोटी रु. देण्याबाबत मी शासनाला पत्र दिले होते. माझ्या पत्रामुळे शासनाला जाग आली.

जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या, घातला निधीचा मोठा घोळ
येणार नाही सर कधी तुम्हा त्या यशवंत कीर्तिवानाची
गरज आहे त्याकरिता अंगी असलेली माणुसकी जपण्याची
वाचताना अर्थसंकल्प होती नजर दादांची पुस्तकावरी
जनतेच्या नजरेस नजर देण्याची वाटते का त्यांना भीती
मांडताना अर्थसंकल्प जाणवली शासनाच्या दूरदृष्टीची उणीव
जनतेचे भले करण्याची या सत्ताधा-यांना आहे कुठे जाणीव
अर्थसंकल्पातील अर्थ सांगून आपल्या पदरी नुसता संकल्प मांडला
मांडला मांडला शासनाने लुटीचा अर्थसंकल्प मांडला.

महोदय, ही नववीमधील विद्यार्थ्यांची शासनाच्या अर्थसंकल्पाबाबतची मानसिकता आहे. अर्थसंकल्पामधून राज्याला पुढच्या काळात एक योग्य दिशा मिळेल, एक योग्य धोरण अंगीकारलेले असेल असे अपेक्षित असते. राज्यात 35 टक्के सिंचित शेती आणि 65 टक्के कोरडवाहू शेती आणि 47 टक्के नागरीकरण झाले आहे. या गोष्टी समोर ठेवून या अर्थसंकल्पामध्ये काही प्रॉयॉरिटी ठरविलेल्या आहेत काय ? कोरडवाहू शेतीसाठी पाच वर्षामध्ये 10 हजार कोटी रुपये खर्च करण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली. परंतु शासन फक्त 100 कोटी रु. देते. मग कोरडवाहू शेतीच्या बाबतीत राज्याचा दृष्टीकोन हाच आहे का ?

या राज्याच्या जीडीपीमध्ये, वस्तूनिर्मितीमध्ये गेल्या 10 वर्षात जास्तीत जास्त घट झालेली आहे. आपण 35 वरुन 28 टक्क्यावर आलो आहोत. मॅन्युफॅक्चरिंगमुळे सर्वात जास्त रोजगार निर्मिती होते. उद्योगासाठी आवश्यक अशा पायाभूत सुविधांचा अभाव आहे, मॅन्युफॅक्चरिंगकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

दुर्लक्ष होत आहे. महाराष्ट्राचा जीडीपी हा चालू किंमती प्रमाणे 11 लक्ष 99 हजार कोटी पर्यंत गेलेला आहे. सर्व राज्यात आपला जीडीपी जास्त आहे. असे असताना सुध्दा आपले राज्य दिवाळखोरीमध्ये गेलेले आहे. या राज्याचा जीडीपी इतर राज्यापेक्षा जास्त असताना सुध्दा सिंचित शेती, कोरडवाहू शेती आणि शहरातील गरीब या गोष्टीकडे पुरेसे लक्ष दिलेले आहे असे या अर्थसंकल्पावरुन वाटत नाही. खरे तर सेक्टोरियल प्रायॉरिटी दिल्याचे कोठे दिसून येत नाही. हे ख-या अर्थाने रेव्हेन्यू सरप्लस बजेट असले तरी हे लिडरशीप डेफिसिट बजेट म्हणून याकडे पाहिले जात आहे. आपल्याकडे महसूल जादा आहे पण राजकीय नेतृत्वाची तूट या अर्थाने हा अर्थसंकल्प आणि राज्याची अवस्था आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आपण सन 2011-12ला 8.5 टक्के इतके जीडीपीचे लक्ष्य ठरविले होते.

...नंतर श्री.गिते...

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 18:30

श्री.विनोद तावडे...

परंतु प्रत्यक्षात 7.1 टक्के एवढीच वाढ जी.डी.पी.मध्ये झाली आहे.

सभापती महोदय, परवा मी केंद्रीय वित्तमंत्री श्री.चिदंबरम यांचे अर्थसंकल्पीय भाषण ऐकले. त्यांनी 5.1 टक्के ग्रोथ रेट ठेवलेला आहे. सर्व्हीस सेक्टरमधला मेजर पार्ट बिल्डींग कन्स्ट्रक्शन आहे. तो मेजर पार्ट आज स्लो-डाऊन आहे. यात शासनाने स्टॅम्प डयुटी वाढविलेली आहे यामुळे तो पार्ट अजून स्लो-डाऊन होईल व यातील इन्व्हेस्टमेंट बाद होईल. ग्लोबल इकॉनॉमी स्लो झाली आहे. त्यामुळे सर्व्हीस सेक्टरमधील मधील उत्पन्न आपोआपच कमी झाले आहे. जी.डी.पी.ची गती 7.1 टक्क्यांपर्यंत आली आहे, ती कशा पध्दतीने वाढविली जाणार आहे याचा खुलासा या ठिकाणी झ ाला पाहिजे. आपण एकूण जी.डी.पी.च्या 17 टक्केच कर्ज घेतले आहे. आपल्याला 25 टक्के कर्ज काढण्याची अनुमती आहे, अशा प्रकारचे उत्तर आम्हाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी वारंवार दिलेले आहे. 2 लाख 85 हजार रुपयांचे कर्ज काही जास्त नाही. ते 18 टक्के आहे, त्यामुळे तेवढे कर्ज आम्ही काढू शकतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब, 25 टक्क्यांपर्यंतचे लिमिट असेल तर शासनाने ज्या बँक गॅरंटया दिल्या आहेत, आपण त्या बाबतीत वेगळया जबाबदाऱ्या उचलल्या आहेत. आता आपण 26 टक्क्यांपर्यंत पोहोचलो आहे हे खरे आहे किंवा नाही. प्रत्यक्षात 17 टक्के पैसे हातात घेतले असले तरी शासनाने ज्या जबाबदाऱ्या स्वीकारलेल्या आहेत. त्या 26 टक्क्यांपर्यंतच्या आहेत. आपण 25 टक्के कर्जाची लिमिट ओलाडंली आहे. हे कर्जाचे प्रमाण राजकोषीय धोरणाप्रमाणे मर्यादित आहे या म्हणण्याला पुरेसा आधार नाही असे माझे स्पष्ट मत आहे. या बाबतचा देखील शासनाने खुलासा करावा.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 95339 रुपये आहे. हे दरडोई उत्पन्न राज्याचे आहे काय अशी शंका माझ्या मनात येते आहे. परवा सत्ताधारी पक्षाच्या एका नेत्याने महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न खरोखरच आहे काय अशी शंका व्यक्त केली. मी या ठिकाणी राष्ट्रीय दरडोई उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या जिल्हयाची माहिती सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. उस्मानाबाद 54,833, लातूर 59,396, बीड 55,139, नांदेड 52,139, परभणी 58,512, जालना 55,067, बुलढाणा, 50ख772,हिंगोली 46,190, वाशिम 55,200, अकोला 61,423, यवतमाळ 54,497, गोंदिया 53,802, गडचिरोली 48,311, नंदुरबार 46,156, आणि भंडारा 60,764 असे या जिल्हयांचे दरडोई उत्पन्न आहे. दरडोई स्थूल राज्य उत्पन्न 1.05,626 एवढे

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आहे. स्थूल जिल्हा उत्पन्न मुंबईचे 2,57,819 कोटी रुपये एवढे आहे. ठाणे 1,36,818 कोटी व पुणे जिल्हयाचे 1,37,651 कोटी रुपये एवढे उत्पन्न आहे. एकूण 5 लाख 32 हजार 288 कोटी रुपये एवढे आहे. या राज्याचे उत्पन्न 11,99,547 कोटी 3 जिल्हयांचे उत्पन्न वजा केले तर 6,67,259 कोटी रुपये एवढेच उत्पन्न येते. उर्वरित जिल्हयाचा जी.डी.पी कमी आहे. या तीन जिल्हयात नागपूर आणि औरंगाबाद जिल्हयांचा समावेश केला तर या पाच जिल्हयाचा एकूण जी.डी.पी.56 टक्के आहे. बाकीचे उर्वरित जिल्हे हे तरंगत आहेत.

सभापती महोदय, समतोल विकासाची गप्पा शासनातर्फे केल्या जातात. समतोल विकासासाठी केळकर समितीची नियुक्ती केली होती. ती समिती संपूर्ण राज्यात फिरली की नाही याची मला माहिती नाही. बारामतीचा जेवढा विकास झाला, तेवढाच विकास गडचिरोली जिल्हयाचा होईल. जेवढा विकास नागपूर जिल्हयात होईल तेवढाच विकास नंदुरबार जिल्हयात होईल. जेवढा कऱ्हाडमध्ये विकास झाला असेल, तेवढाच विकास धुळे तालुक्यात झालेला असेल. परंतु प्रत्यक्षात काहीच विकास केला गेला नाही. समतोल विकासाची भाषा करणाऱ्या सरकारचे हे वास्तव आहे. पाच जिल्हयाचा जी.डी.पी.56 टक्के आहे. बाकीच्या जिल्हयांचा जी.डी.पी.मात्र खूपच कमी आहे. हे सरकार जाणीवपूर्वक समतोल विकास करीत नाही. उद्योगाच्या बाबतीत मी नंतर माझे विचार व्यक्त करणार आहे. मोठ-मोठ्या इंडस्ट्रीज्ना 98 टक्के इन्सेटीव्ह दिले. ज्या लहान इंडस्ट्रीज आहेत त्यांना फक्त 2 टक्के इन्सेटीव्ह दिले आहेत. मोठया कंपन्यांना 98 टक्के आणि लहान कंपन्याना फक्त 2 टक्के इन्सेटीव्ह दिले गेले. मुंबई, पुणे, नाशिक याच पट्टयातील मोठया कंपन्यांना इन्सेटीव्ह दिले गेले. उर्वरित जिल्हयांना मात्र अतिशय कमी प्रमाणात इन्सेटीव्ह दिला गेला. समतोल विकासाची भाषा हे सरकार कसे काय करु शकते हा खरा प्रश्न आहे. तीन जिल्हयात दरडोई उत्पन्न जास्त असले तरी प्रत्यक्षात इतर जिल्हयांची अवस्था वाईट आहे. या गोष्टीचा देखील सरकारने खुलासा केला पाहिजे.

सभापती महोदय, आपल्या राज्यावर दरडोई कर्ज 2,80,000 कोटी रुपये एवढे आहे. त्या कर्जाला 11.24 टक्के लोकसंख्येने विभागले तर जवळ जवळ 19662.92 रुपये माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार यांच्या कृपेने प्रत्येक व्यक्तींच्या डोक्यावर कर्ज आहे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

सभापती महोदय, मला सगळ्यात चिंतेची बाब वाटते ती म्हणजे कृषी क्षेत्राचे उत्पन्न जीडीपीच्या 12.4 टक्के आहे, त्याच वेळी शेतकऱ्यांचे पुत्र या राज्याच्या गादीवर उप मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून बसलेले असताना देशातील कृषी क्षेत्राचे प्रमाण 17.5 टक्के आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था पूर्णपणे कृषी व संलग्न क्षेत्रावर अवलंबून असताना राज्याचे कृषी आणि संलग्न क्षेत्राचे उत्पन्न घटत आहे ही चिंताजनक बाब आहे. यावर उपाय योजल्याचे आपल्याला दिसून येत नाहीत. कृषी आणि संलग्न क्षेत्र निगेटिव्ह वाढ असताना मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातही वाढ दिसत नाही. गेल्या दहा वर्षात वाढ 10 टक्के कमी झाली आहे. वस्तू निर्मिती क्षेत्रात सन 2007-08 मध्ये 32.4 टक्के वाढ होती, ती 2011-12 मध्ये 28 टक्क्यापर्यंत खाली घसरली आहे. नाशिक जिल्हयात सगळ्यात जास्त मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रावर परिणाम झालेला आहे. सभापती महोदय, सेवा क्षेत्राची वाढ देशाच्या तुलनेत चांगली असली तरी सेवा क्षेत्रात निर्माण होणारा रोजगार कृषी आणि संलग्न क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगारापेक्षा कमी असल्यामुळे आपल्याला नक्की कशावर भर द्यायचा याचा विचार बजेटमध्ये केल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे उत्पन्न देशात सर्वाधिक असताना नियोजित खर्च मात्र कमी कमी होत आहे. आपली पंचवार्षिक योजना 2.55 लाख कोटी रुपयाची असताना ती पूर्ण होऊ शकत नाही. 55 हजार कोटी रुपयांचे टार्गेट आपण गाठलेले नाही. दिनांक 20 मार्च, 2013 रोजी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये नमूद केलेल्या आकडेवारीमध्ये मागील योजना 46,938 कोटी रुपयांची असताना योजनेतर खर्च 1,25,647 कोटी रुपये इतका झालेला आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर नियोजित खर्चाचे प्रमाण 25 टक्क्याच्या दरम्यान असताना नियोजन बाह्य खर्चाचे प्रमाण 55 टक्क्यापर्यंत गेलेले आहे. हा असमतोल कसा दूर करणार आहात? मी मघाशी म्हटल्याप्रमाणे जे सहज शक्य आहे ते लक्षात घेतले जात नाही. मघाशी लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. राज्यातील शारीरिक शिक्षण महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत आणली गेली तर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वेतनाचा खर्च मिळू शकतो. 10 कोटी रुपयांची बचत होऊ शकते. परंतु राज्य शासनालाच हौस आहे, त्यामुळे ही महाविद्यालये क्रीडा विभागाच्या अखत्यारित आणली आहेत. असे बरेच बारकाईने पाहण्यासारखे मुद्दे आहेत. ज्यामुळे मोठया प्रमाणात केंद्राकडून निधी मिळू शकतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

सभापती महोदय, भांडवली खर्च घटत चालला आहे. अर्थसंकल्पामध्ये योजनांतर्गत खर्चापैकी 22,373 कोटी व योजनेतर खर्चापैकी 2,755 कोटी रुपये एवढा भांडवली खर्च दाखविण्यात आलेला आहे. भांडवली खर्च हा केवळ 25,128 कोटी रुपये एवढाच दाखविला आहे. एकूण उत्पन्नाच्या तुलनेत भांडवली खर्चाचे प्रमाण 13.88 टक्के एवढेच आहे, हे माननीय उप मुख्यमंत्र्यांना माहिती आहे. थोडक्यात म्हणजे रुपयापैकी केवळ 13.88 पैसे एवढीच रक्कम भांडवल निर्मितीसाठी वापरणार असाल तर स्व.यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी केल्यानंतर उर्वरित पैशातून महाराष्ट्र एक पाऊल पुढे गेला आहे की अनेक पाऊले मागे आला आहे?

सभापती महोदय, सन 2001-2012 मध्ये 19,969 कोटी रुपये असणारी वित्तीय तूट यावर्षी 24,118 कोटी रुपयांवर पोहोचली आहे. खर्चाच्या वाढत्या प्रमाणात हे वित्तीय तुटीचे प्रमाण सतत वाढत आहे. खर्च वाढत असताना भांडवली निर्मिती न करता योजनेतर खर्चात सतत वाढ होत आहे. कर्ज घेतले तरी ते भांडवली निर्मितीसाठी वापरणार की नाही? काढलेले कर्ज आणि वित्तीय तुटीचा विचार केल्यामुळे अधिक चिंता वाटते. आज प्रामाणिकपणे राज्याची आर्थिक स्थिती पहावयाची झाली तर फ्रिडमनने जी इकॉनॉमिक कन्सेप्ट मांडली आहे त्यानुसार एका बाजूला स्टॅग्नेशन आहे. स्टॅग्नेशन आले की आपोआप बाजारातील सगळ्या वस्तूंचे भाव उतरतात. परंतु स्टॅग्नेशन आहे आणि इन्फ्लेशन देखील आहे. त्याला फ्रिडमनने टर्म दिली आहे स्टॅग्फ्लेशन. आपले राज्य या स्टॅग्फ्लेशनमधून जात आहे. हे कोणत्याही अर्थव्यवस्थेला हानीकारक आहे.

नंतर 3पी.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

स्टॅगफलेशनमध्ये ज्या राज्यकर्त्यांकडे सत्ता असेल त्यांच्यावर भविष्यातील पिढी बोट ठेवेल की, हे राजकीय व्यवस्थेमध्ये होते,त्यांच्यामुळेच स्टॅगफलेशन आले व त्यामुळेच आमच्या पिढीचा विकास होऊ शकला नाही असे बोलले जाईल. आपले राज्य स्टॅगफलेशनमधून जात असतांना राज्याला स्टॅगफलेशनमधून बाहेर काढण्याची हिंमत शासनाने दाखववावयास पाहिजे होती. परंतु तशा प्रकारची हिंमत शासनामध्ये दिसत नाही. एरवी दादा बाहेरच्या भाषणात जी हिंमत दाखवतात तशी हिंमत यामध्ये आम्हाला दिसली नाही. आम्हाला वाटले दादा काही तरी आर्थिक शिस्त लावतील परंतु तसे काही झाले नाही. ज्यावेळेस अर्थखाते माननीय श्री. तटकरे साहेबांकडे आले तेव्हा मला असे वाटले की, ते कोकणातील असल्यामुळे त्यांना कोणीही दाबतो परंतु दादा सांगतील की, नाही, महाराष्ट्राची आर्थिक अवस्था अशी अशी आहे त्यामुळे ही ही कामे करणार नाही. असे खणखणीत सांगण्याची हिंमत दादाच करु शकतात.परंतु बजेटची आकडेवारी बघितली तेव्हा मला दादांचा कणखरपणा कोठेच दिसला नाही.

सभापती महोदय, महसुली जमेशी व्याज प्रदानाच्या रकमेचे प्रमाण सन 2004-2005 मध्ये 25.01 टक्के असतांना सन 2012-2013 मध्ये हे प्रमाण कमी होत होत 13.28 टक्के इतके झाले होते परंतु सन 2013-2014 मध्ये हेच प्रमाण 13.53 टक्के एवढे झाले. निवडणुका आल्या की, हे प्रमाण वर जाते व निवडणुका संपल्या की, हे प्रमाण खाली जाते. आता पुढील वर्षी निवडणुका असल्यामुळे हे प्रमाण एक पाऊल वर गेले आहे. याचाच अर्थ महसुली जमेच्या तुलनेत व्याज प्रदानांच्या रकमेवरील वाढ झाली आहे.

सभापती महोदय,महसुली जमेशी कर्जाचे असणारे प्रमाण सन 2004-2005 मध्ये 266.18 टक्के एवढे होते. हे प्रमाण कमी होत होत सन 2012-2013 मध्ये 170.41 टक्क्यापर्यंत आले होते. परंतु सन 2013-2014 मध्ये हे प्रमाण आणखी कमी न होता 173.44 टक्क्यापर्यंत वाढले आहे. याचाच अर्थ महसूली जमेच्या कर्जाचे असणारे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत वाढले आहे.

सभापती महोदय, सेल्स टॅक्समध्ये चांगले अधिकारी होते म्हणून वसुलीमध्ये प्रचंड वाढ झ ाली असे सांगितले जाईल परंतु यामध्ये 8-10 टक्के भाववाढ झालेली असल्यामुळे सेल्सटॅक्स तेवढा वाढला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

आहे. म्हणजे 8-10 टक्के भाववाढीचा आणि एफिशियंट भाटींयाचा 5-7 टक्के म्हणजे 17 टक्के सेल्स टॅक्स जास्त झाला पाहिजे होता. परंतु सेल्स टॅक्स केवळ 5.5 टक्केच जमा झाला. त्यामुळे मधील 10 टक्के कोणत्या हवालात गेले याची चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वार्षिक योजनेचे आकारमान दिवसेंदिवस घटत चालले आहे. परंतु सन 2011-2012 मध्ये 40 हजार कोटींची असणारी वार्षिक योजना सन 2012-2013 मध्ये केवळ 45 हजार कोटींवर थांबली आहे. हीच रक्कम सन 2013-2014 मध्ये केवळ 46,938 कोटी रुपये एवढीच आहे. दरवर्षी होणारी चलन वाढ व अर्थव्यवस्थेचा विस्तार लक्षात घेतल्यास, वार्षिक योजनेचा आकार देखील त्या प्रमाणात वाढणे आवश्यक आहे. यामध्ये रुपयाचे अवमूल्यन इ ाल्यामुळे वार्षिक योजना 45 हजार कोटींची दाखवली असली तरी ती प्रत्यक्षात 40 हजार कोटींचीच आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

या वर्षी म्हणजे सन 2013-14 चे वार्षिक योजनेचे आकारमान 46938 असले तरी सन 2011-12 च्या तुलनेत आपल्याला प्रत्यक्ष आकारमान 38021 इतकेच मिळाले आहे. चलनवाढ होत असल्यामुळे आपण अधिकचा निधी देऊ शकणार नाही. त्यामुळे पंचवार्षिक योजनेतील 2 लाख 55 हजारचा आकडा पूर्ण करणे दूरच राहिले आहे. येथे काहीही होताना दिसत नाही. त्यामुळे आपण विकासाकडे जात आहोत की, अधोगतीकडे जात आहोत हे काही मी सांगण्याची गरज नाही.

सन 2009 नंतर पहिल्यांदा 26 कोटी रूपयांचे अधिक्य दाखविण्यात शासनास यश आले आहे. सदर महसुली अधिक्य गतवर्षी योजनांतर्गत खर्चाला लावलेल्या 20 टक्के कपातीच्या पार्श्वभूमीवर होते. गतवर्षी 45,000 कोटी रूपयांची वार्षिक योजना असताना 20 टक्के कपात केल्यामुळे आपणास साधारणत: 5000 कोटी रूपये मिळाले. हे पाच हजार कोटी रूपये आपण कुठे खर्च केलेत याचा हिशोब तर आम्ही विचारणार आहोतच. हे पाच हजार कोटी रूपये आपण खर्च केल्यानंतर देखील आपले खरेच महसुली अधिक्य आहे काय ? हे आपण प्रामाणिकपणे सांगितले पाहिजे. आपण एका बाजूला महसुली अधिक्य कपात लावून दाखविले आहे. ते पैसे आपण पकडले तर आपण खरेच अधिक्यमध्ये जात आहोत काय, या संबंधातील माहिती आपण सभागृहाच्या माध्यमातून जनतेला देणे आवश्यक आहे.

आता आपण वार्षिक योजनेची इतर राज्यांशी तुलना करू या. आपले स्थूल राज्य उत्पन्न सर्वात जास्त असले तरी योग्य नियोजन न केल्यामुळे वार्षिक योजनेमधील 1 लक्ष लोकसंख्येसाठी उपलब्ध असलेला निधी इतर राज्यांच्या तुलनेत बरेच कमी आहे. आपला जीडीपी सर्वात जास्त आहे. त्याचे नीट नियोजन केले नाही तर सामान्य लोकांपर्यंत किती पैसे पोहोचतात ? मी गुजरातचे नाव घेतले तर यांना कोणत्या मिर्च्या झोंबतात हेच मला कळत नाही. त्यामुळे मी गुजरातचे नाव वगळतो. सन्माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांच्या इच्छे खातर मी गुजरात राज्याची माहिती देतो. गुजरात राज्याचे सन 2013-2014 चे वार्षिक योजनेचे आकारमान 58500 कोटी एवढे असून त्या राज्याची लोकसंख्या 6.03 कोटी इतकी आहे म्हणजे 1 लक्ष लोकसंख्येमागे उपलब्ध असलेला निधी रूपये 97.01 कोटी आहे. गुजरातची सत्ता भाजपकडे आहे. माननीय श्री.नरेंद्र मोदी हा माणूस सध्या जोरातच आहे. तो काही नुसते बोलणारा नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

आता आपण राजस्थान राज्याचा विचार करू या. येथे तर काँग्रेसचे राज्य आहे. राजस्थान राज्याचे सन 2013-14 चे वार्षिक योजनेचे आकारमान 40500 कोटी रूपयांचे असून राज्याची लोकसंख्या 6.86 कोटी इतकी असून 1 लक्ष लोकसंख्येमागे उपलब्ध असलेला निधी रूपये 59.03 इतका आहे. कर्नाटक राज्याचे सन 2013-14 चे वार्षिक योजनेचे आकारमान 42030 कोटी रूपयांचे असून राज्याची लोकसंख्या 6.11 कोटी इतकी असून 1 लक्ष लोकसंख्येमागे उपलब्ध असलेला निधी रूपये 68.78 इतका आहे. हिमाचल प्रदेश वेगळेच राज्य आहे. हिमाचल प्रदेशचे सन 2013-14 चे वार्षिक योजनेचे आकारमान 21767 कोटी रूपयांचे असून राज्याची लोकसंख्या 68 लाख इतकी असून 1 लक्ष लोकसंख्येमागे उपलब्ध असलेला निधी रूपये 320.10 इतका आहे. हिमाचल प्रदेश मध्ये लोकसभेचे फक्त चार मतदार संघ आहेत. आपल्याकडे एकूण 48 मतदार संघ आहेत. हिमालच प्रदेशसाठी केंद्र शासनाचा जास्त निधी येत असेल असा माझा अंदाज आहे. महाराष्ट्र राज्याचे सन 2013-14 चे वार्षिक योजनेचे आकारमान 46938 कोटी रूपयांचे असून राज्याची लोकसंख्या 11.23 कोटी इतकी असून 1 लक्ष लोकसंख्येमागे उपलब्ध असलेला निधी रूपये 41.79 इतका आहे.

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना एकाच वेळी होत असलेली चिरफाड सहन होत नसावी, असे मला वाटते.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, मी खऱ्या अर्थाने राज्यातील आर्थिक आकडेवारीवरुन माझे प्रामाणिकपणे मत मांडलेले आहे. आकडेवारीवरुन मी जे मत मांडले तेच मत आणि विश्लेषण समोर बसलेले सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे किंवा चळवळीत काम करणारे सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी देखील केले असते. त्यामध्ये वेगळे मत मांडले नसते. तेव्हा समोर बसणारी मंडळी या आकड्यांना नाकारु शकणार नाही हे वास्तव आहे आणि हेच वास्तव मी अभ्यास करुन समोर आणले आहे. हे वास्तव समोर आणताना सरकारचे काय चुकते आहे हे आम्हाला दाखवावयाचे नाही तर यातून आपण कोणता मार्ग काढणार आहात, कोणती सेक्टरल प्रॅयॉरीटी ठरविणार आहोत, राज्याला कोणत्या दिशेला न्यावयाचे आहे त्याबद्दल कोणत्या उपाय योजना किंवा आराखडा तयार करणार आहोत या विचारासाठी मी हे मांडत आहे.

सभापती महोदय, या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेले मुंबई शहर महाराष्ट्रात असून देखील राज्यातील नागरिकांच्या विकासाकरिता इतर राज्यांच्या तुलनेत आपणास कमी रक्कम उपलब्ध होते ही एक चिंतेची बाब आहे. त्यामुळे प्रत्यक्ष ध्येयप्राप्ती बाबत या अर्थसंकल्पात काही उल्लेख नाही.

सभापती महोदय, दरवर्षीच्या अर्थसंकल्पाप्रमाणे या वर्षी देखील विविध विभागांना वाटप केलेल्या रकमेची आकडेमोड दिलेली आहे. गेल्या वर्षी मी हे कक्ष अधिकाऱ्यांनी केलेले बजेट आहे असे म्हटल्यावर दादा माझ्यावर रागावले होते. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात माध्यमिक उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची संख्या दीड कोटीवरुन एकदम 57 लाखावर दाखविली आहे. तसे कदाचित नसेल, ती प्रिटींग मिस्टेक आहे किंवा कसे हे तपासून पहावे.

सभापती महोदय, दरवर्षी दोन हजार कि.मी.रस्ते करण्यात येतील, ग्रामीण आरोग्य केंद्राच्या 100 इमारती बांधण्यात येतील, शिक्षण निर्देशांक 15 पर्यंत असला तरी तो 10 पर्यंत आणण्यात येईल अशा व इतर कोणत्याही बाबींचा उल्लेख याच नव्हे तर गेल्या अनेक अर्थसंकल्पामध्ये नाही.

श्री.अजित पवार (बसून ) : माननीय विरोधी पक्ष नेते इतक्या जोशात का आहेत हे मला आता समजले. त्यांच्या पत्नी गॅलरीमध्ये बसलेल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते, प्रेक्षक गॅलरीमध्ये वहिनी साहेब असल्यामुळे मी आज तुम्हाला अजून एक तास बोलण्याची संधी देणार आहे. आपण आज 8 वाजेपर्यंत भाषण सुरु ठेवावे.

श्री.विनोद तावडे : महोदय, मी ज्यावेळी राज्यातील दुष्काळावर बोललो त्या वेळी माझी पत्नी गॅलरीमध्ये बसलेली नव्हती. माननीय श्री.अजितदादा मला उद्देशून 'मी जोरात आहे' असे बोलले. खरे म्हणजे दादांचे सोयीचे असते. मला वाटते 1 एप्रिलला त्यांनी श्रीमती सुनेत्रा वहिनींना आणावे. त्या गॅलरीत असताना दादा किती जोरात असतात हे आम्हाला बघायचे आहे. असो.

**उप सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, अर्थसंकल्प म्हणजे लक्ष्मीची पावले असतात. ती आलेली आहेत.

श्री.विनोद तावडे : महोदय, मी माझ्या पत्नीचे योग्य नाव ठेवलेले आहे. मुख्यमंत्री पदी विराजमान झाल्यानंतर ते ज्या बंगल्यावर जातात त्या बंगल्याचे जे नाव आहे तेच माझ्या पत्नीचे नाव आहे. अगदी परफेक्ट आहे. कोणी घाबरण्याचे कारण नाही. शिवाय माझे नाव देखील बरोबर आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांचे नाव 'अजित' आहे. परंतु त्यांचा पराभव झाला की नाही, राजीनामा दिल्यानंतर तो परत घ्यावा लागला की नाही, ते पुन्हा उप मुख्यमंत्री पदावर आले की नाही ?

(काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

महोदय, आपणच मला सांगा की, सन्माननीय सदस्य मला उद्देशून जे बोलतात त्यावर बोलू की अर्थसंकल्पावर बोलू ?

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते, आपण माझ्याकडे बघून बोला.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना मी सांगू इच्छितो की, मी ताठ मानेने चालणारा माणूस आहे. मी खाली मान घालण्यासारखे काही केलेच नाही. असो.

महोदय, यातील राजकारणाचा भाग सोडा. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सरकारने पुढील संकल्प केलेले आहेत. शिवाय प्रामाणिकपणे रस्ते, वीज आणि इतर विविध विषयांची मांडणी केली आहे. परंतु नियोजनकर्त्यांनी या गोष्टीची काळजी घेतली नसल्यामुळे ऑडीटच्या वेळी जसे खर्चाचे आकडे दाखविले जातात तशा प्रकारे ऑडिटचे काम नक्की केलेले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व माननीय श्री.जयंत पाटील अर्थमंत्री असताना डिसेंबर महिन्यात राज्याची योजना घेऊन वित्त आयोगाकडे जात होते. त्यानंतर त्या योजनेला मान्यता मिळत होती. परंतु गेल्या दोन-चार वर्षात बजेट फोरकास्टींगचा विषय संपला आहे असे वाटते. हम करें सो कायदा, अशी स्थिती निर्माण झाली आहे. बजेट फोरकास्टींग बंद झाल्यामुळे प्राधान्याने असलेल्या सेक्टरवर आपल्याला लक्ष द्यावयाचे आहे काय ? केंद्रातील वित्त आयोगाचे तज्ज्ञ योजनेतील आकडेवारी कमी-जास्त करण्यास सांगत होते. परंतु आता तसे होत नाही. पूर्वी वित्त आयोगाकडे पाठविलेल्या योजनेत बदल करण्यासाठी ती परत पाठविली जायची. त्यानंतर राज्याकडून सुधारित योजना मान्यतेसाठी वित्त आयोगाकडे पाठविली जात होती. वास्तविक पाहता अर्थसंकल्पाचा ढाचा तयार झाल्यानंतर तो मजबूत असतो आणि खऱ्या अर्थाने विकासाच्या दिशेकडे नेणारा असतो.

महोदय, गेल्या वर्षी 1 लाख 77 हजार कोटी रुपयांची योजना तयार केली आणि 1 लाख 65 हजार कोटी रुपये इतकाच खर्च दाखविला. त्यामुळे 17 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. त्या पुरवणी मागण्या आहेत की, वेगळे बजेट आहे असे वाटते. मागील अर्थसंकल्पातील पुरवणी मागण्यांचे आकडे पाहिले तर पूर्वीचे रेकॉर्ड ब्रेक झाले असे वाटते. यातून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे बजेटींग रिच्युअल आणि स्पेंडींग मिच्युअल हे नक्की पहावयास मिळते.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, सर्वात महत्वाचे म्हणजे आता 4964 कोटी रुपयांची एक ठोक तरतूद केलेली आहे. अर्थसंकल्पामध्ये ही ठोक तरतूद आहे. गेल्या दोन चार अर्थसंकल्पापासून ही पध्दत सुरु झालेली आहे. ही ठोक तरतूद कशासाठी आहे ? आम्ही पुरवणी मागण्यांमध्ये आणून तरतूद करु असे यामध्ये नाही. इतक्या मोठ्या रकमेची ही ठोक तरतूद म्हणजे तुम्हाला ज्या आमदाराच्या मतदारसंघात कामे करावयाची असतील त्यासाठी आहे. तुला पैसे घे, तू कामे करुन घे, यासाठी ही ठोक तरतूद आहे. म्हणजे या ठोक तरतुदीला एका योजनेचे नाव दिले पाहिजे आणि ते नाव 'इच्छुक मुख्यमंत्री अजित दादा ठोक तरतूद योजना' असे दिले पाहिजे. माझ्याकडून पैसे घे, आता तिकडे राहा, गरज पडली तर आणि वेगळे लढण्याचे ठरले तर माझ्याकडे ये, यासाठी 5 हजार कोटी रुपये ठोक तरतूद ठेवलेली आहे. अर्थसंकल्पामध्ये 5 हजार कोटी रुपये ठोक तरतूद ठेवण्याचे काही कारणच नाही. अर्थसंकल्प कशासाठी आहे ? आपण प्रत्येक गोष्ट स्पेसिफाय करावी यासाठीच हे बजेट आहे. तसे न करता मी अमुक आमदाराला हे देईन, अमुक आमदाराला ते देईन अशा प्रकारे इच्छुक मुख्यमंत्री अजित दादा पवार ठोक तरतूद योजनेसाठी 5 हजार कोटी रुपये ठेवलेले आहेत. त्याचे सगळे बाकी डिस्क्रीप्शन त्यांना सांगतो म्हणजे त्याचा फायदा होईल.

**उप सभापती** : आता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा येथे थांबविण्यात येत आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांचे भाषण अपूर्ण आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या मंगळवार, दिनांक 26 मार्च, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत सकाळी 10.00 ते 11.00 या वेळेत महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये कायदा व सुव्यवस्था या विषयावरील प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता पुन: भरेल. उद्याच्या कामकाजामध्ये प्रश्नोत्तरे ठेवावीच लागतील. तसेच लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वये सूचना व निवेदने इत्यादी कामकाज होईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 2 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक
26 मार्च, 2013 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही